CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २३ मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १७४ | पाने १२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



निःसमग्र समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली आहे. त्याला अनुसरून योग्य मनोधारणा निर्माण होण्यासाठी कामे आणि कार्यक्रम आखले गेले. समाजात ज्या ठिकाणी जसे असावे तसे नसेल तर त्या ठिकाणी आपण असावे हा हेतू. म्हणून एका वाक्यात गमतीने म्हणतो की, 'जिथे कमी तिथे आम्ही.'

**- स्व. प्रल्हादपंत अभ्यंकर**
रा. स्व. संघाचे माजी महाराष्ट्र प्रांत संघचालक

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात उसळी; गुंतवणूकदारांचा फायदा



**मुंबई** : गेल्या काही दिवसांतील चढ-उतारांनंतर शुक्रवारी शेअर बाजारात पुन्हा एकदा तेजीचे वातावरण पाहायला मिळाले. दिवसभरातील घसरण मागे टाकत सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी नफा कमावला. अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता करार होण्याच्या नव्या आशा निर्माण झाल्याने गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला आणि त्याचा सकारात्मक परिणाम बाजारावर दिसून आला. सत्राच्या अखेरीस मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 'सेन्सेक्स' २३२ अंकांच्या वाढीसह ७५,४१५.३५ वर स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा 'निफ्टी' ६५ अंकांनी वधारून २३,७१९.३० वर बंद झाला.

### मुंबई, पुणे, रायगडमध्ये पावसाची हजेरी

**मुंबई** : राज्यात सर्वत्र तापमान वाढले असताना उकाडयामुळे हैराण झालेल्या नागरिकांना शुक्रवारी काहीसा दिलासा मिळाला. पुणे, पिंपरी चिंचवडसह मुंबई, रायगड, रत्नागिरी, सातारा जिल्ह्यांतील अनेक भागात पावसाने हजेरी लावली. काही भागात वादळी तर काही भागात मेघगर्जनेसह जोरदार सरी बरसल्या. सातारा जिल्ह्यातील दुष्काळी खंडाळा तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. पुण्यातील कोंढवा परिसरात ज्योती चौकात पावसानंतर रस्त्यावर पाणी साचले होते. अचानक आलेल्या पावसामुळे निश्चित पुणेकरांची तारांबळ उडाली. मुंबईतही पावसाच्या हलक्या सरी झाल्या. पिंपरी चिंचवडमध्ये दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अंधारमय वातावरण झाले. जोरदार पाऊसही झाला. रायगड मधील दक्षिण भागात माणगाव, महाड म्हसळा श्रीवर्धन परिसरात पावसाच्या सरी कोसळल्या.



### सोलापूरसह अनेक जिल्ह्यांना आज 'यलो अलर्ट'?

**पुणे** : सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग, सांगली, सातारा आणि सातारा घाट विभाग, पुणे आणि पुणे घाट विभाग, अहिल्यानगर, बीड, धाराशिव, लातूर, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांना शुक्रवारी हवामान विभागाने पावसाचा 'यलो अलर्ट' दिला आहे. यादरम्यान विजांच्या कडकडाटासह तसेच ताशी ३० ते ४० किलोमीटर वादळीवाऱ्यांसह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. नांदेड आणि नाशिक घाट विभाग आदी भागात हलक्या सरींची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# वाघाच्या हल्ल्यात चार महिला ठार

## गुंजेवाहीनजीकच्या जंगलात भयावह घटना

### मृतांमध्ये एकाच कुटुंबातील दोन बहिणींचा समावेश

### चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही येथील घटना



मृतकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देताना वन अधिकारी



◆ **सिंदेवाही/चंद्रपूर, २२ मे**

चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही वन परिक्षेत्रातील गुंजेवाही उपक्षेत्रांतर्गत येणाऱ्या जंगलात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या १३ पैकी ४ महिलांवर वाघाने हल्ला केला आणि त्यांना जागीच ठार केले. ही भयावह घटना शुक्रवारी सकाळी घडली. मृत्यूमुखी पडलेल्यांमध्ये एकाच कुटुंबातील दोन बहिणींचा समावेश आहे. घटनेनंतर अवघे गुंजेवाही गाव शोकमग्न आहे.

गुंजेवाही गावातील कवडाबाई दादाजी मोहुर्ले, अनुबाई दादाजी मोहुर्ले, संगीता संतोष चौधरी, सुनीता कौशिक मोहुर्ले असे वाघाच्या हल्ल्यात ठार झालेल्या महिलांचे नाव आहे.

१३ महिला सकाळी गुंजेवाही बिट कक्षात तेंदूची पाने गोळा करीत होत्या.

(शेवटच्या पानावर) ▸

#### जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यात ५ वर्षांत २०० बळी



**» चंद्रपूर जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांत २०० माणसांचा वाघांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. अवघ्या पाच महिन्यांत १९ जणांना प्राण गमवावे लागले. यातील सर्वाधिक मृत्यू हे तेंदुपत्ता आणि मोहफुलांच्या मोसमातील आहेत. दरवर्षी या मोसमात १० ते १५ माणसे मृत्युमुखी पडत आहेत.**

#### मृतकांच्या वारसांना आर्थिक मदत

**» मृतांच्या वारसदारांना तातडीची आर्थिक मदत म्हणून प्रत्येकी २५ हजार रुपये देण्यात आले. कवडाबाइ व अनुबाई यांचे वारसदार भाऊ रमेश यांना ५० हजार रुपये, संगीता चौधरी यांचे वारसदार पती संतोष यांना २५ हजार रुपये तसेच सुनीता यांचे वारसदार दीर चंद्रकांत यांना २५ हजार रुपये देण्यात आले आहे.**

#### संतप्त गावकऱ्यांच्या मागण्या

**» ग्रामस्थांनी वन अधिकाऱ्यांना धारेवर धरत, वाघाचा तातडीने बंदोबस्त करावा, मृतांच्या वारसांना शासकीय नोकरी देण्यात यावी, तेंदूपत्ता संकलनावेळी वन कर्मचारी सोबत असावे, गावाभोवती नियमित गस्त वाढविण्यात यावी, जंगलात जाणाऱ्या गावकऱ्यांना वन विभागाने सुरक्षा पुरवावी आदी मागण्या लावून धरल्या.**

# पालक आयएएस असताना मुलांसाठी आरक्षणाची गरज का?

### सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण टिप्पणी

◆ **नवी दिल्ली, २२ मे**

आरक्षण आणि सामाजिक गतिशीलतेच्या मुद्यावर भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी कठोर भाष्य केले. ज्या कुटुंबांनी आधीच शैक्षणिक आणि आर्थिक प्रगती साधली आहे. त्यांच्याकडून आरक्षणाच्या लाभांची मागणी सातत्याने का केली जात आहे. ज्यांचे पालक आयएएस अधिकारी आहेत, त्यांना आरक्षणाची गरज का?, असे प्रश्न न्यायालयाने उपस्थित केले.

आरक्षणाच्या मुद्यावर भाष्य करताना सर्वोच्च न्यायालयाने यावर जोर दिला की, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीमुळे सामाजिक गतिशीलता येते. त्यामुळे, आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांतील मुलांसाठी आरक्षणाची मागणी करणे योग्य नाही. हा एक विचार करण्याजोगा मुद्दा आहे. अनेक सरकारी आदेशांमध्ये आधीच प्रगत वर्गांना आरक्षणाच्या लाभांमधून वगळण्यात आले आहे. परंतु, आता या वगळण्यांना आव्हान दिले जात आहे. ज्या कुटुंबांनी आरक्षण प्रणालीद्वारे आधीच सामाजिक आणि आर्थिक प्रगती साधली आहे. त्यांच्याकडूनही आरक्षणाच्या लाभांची मागणी सातत्याने केली जाते, हे आश्चर्यच आहे. विद्यार्थ्यांचे पालक चांगल्या नोकऱ्या करत आहेत, चांगले उत्पन्न मिळवत आहेत, तरीही त्यांची मुले आरक्षणाची मागणी करतात, असेही न्यायालयाने सांगितले.

◂(वृत्तसंस्था)



#### पुढील पिढीच्या पात्रतेचे पुनर्मूल्यांकन करावे

**» खंडपीठाने असेही म्हटले की, जेव्हा कुटुंबे आरक्षणाच्या लाभांद्वारे शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या एका विशिष्ट स्तरावर पोहोचतात, तेव्हा पुढील पिढीच्या पात्रतेचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे.**

#### विशिष्ट पातळी गाठणाऱ्यांचा मुलांना वगळायला हवे

**» आरक्षणाच्या मुद्यावर काही संतुलनाची गरज आहे. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले असणे ठीक आहे. परंतु, एकदा पालकांनी आरक्षणाचा लाभ घेऊन एक विशिष्ट पातळी गाठली की त्यांच्या मुलांना आरक्षणातून वगळायला हवे, असेही न्यायालयाने सांगितले.**

### शांतता कराराचा अंतिम मसुदा तयार

◆ **तेहरान, २२ मे**

अमेरिका-इराण यांच्यातील शांतता कराराचा अंतिम मसुदा तयार झाला असून, लवकरच याची घोषणा केली जाईल. यात दोन्ही देशातील करारात शस्त्रसंधीचा उल्लेख करण्यात आला आहे.

तत्काळ प्रभावाने जमिनीवरील, समुद्रमार्गे आणि हवाईमार्गे युद्धविराम लागू करण्याचेही त्यात नमूद असल्याची माहिती पाकिस्तानचे मंत्री मोहसीन नख्वी यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना दिली. ◂(वृत्तसंस्था)

## शिराळ टें पाटीजवळ भीषण अपघात; एकाचा मृत्यू, चौघेजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २२ मे-**

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महा मार्गावरील शिराळ टें पाटीजवळ शुक्रवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून चौघेजण जखमी झाले आहेत. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी बालाजी वाल्मिकी रणदिवे (वय ३४, रा. अरण ता. माढा) हे हरीदास लक्ष्मण ठाकरे (वय ४३, रा. करनखेड ता. महागाव जि. यवतमाळ) व दत्तात्रय बबन जाधव यांच्यासह बजाज कंपनीची डिस्कवर मोटारसायकल (४५५५०७) वरून इंदापूरहून अरणकडे येत होते. दि. २२ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजून ५० मिनिटाच्या सुमारास ते शिराळ टें पाटीजवळील कट पॉईंट परिसरात आले असता, इलेक्ट्रिक स्कुटी (४५२३१४) वरील चालक सुनिल दिगंबर मुळे (रा. शिराळ टें, ता. माढा) हा आपल्या स्कुटीवरून महामार्ग ओलांडून शिराळ गावाकडे जात होता. त्यावेळी त्याने निष्काळजीपणे, अविचाराने व भरधाव वेगाने स्कुटी चालवून डिस्कवर मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात हरीदास लक्ष्मण ठाकरे हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. तसेच फिर्यादी बालाजी रणदिवे, दत्तात्रय बबन जाधव, सुनिल दिगंबर मुळे व सुरेखा संतोष मुळे हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातात दोन्ही वाहनांचे सुमारे २२ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३५६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () कलम २८१, १०६(१), १२५(), १२५(), ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

#### नीट पेपरफूट प्रकरण

# तिसऱ्या 'मनीषा'ला बेड्या

## भौतिकशास्त्राचा पेपर फोडला

◆ **पुणे, २२ मे**

देशभरात गाजत असलेल्या नीट प्रश्नपत्रिका फूट प्रकरणी पुण्यातील सेठ हिरालाल सराफ प्रशाला भौतिकशास्त्राच्या शिक्षिका आणि मुख्याध्यापिका मनीषा संजय हवालदार (रा. लक्ष्मी निवास बिल्डिंग) हिला केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) शुक्रवारी अटक केली. प्रश्नपत्रिका फुटीच्या साखळीत सहभागी असलेल्या 'मनीषा' नावाच्या तिसऱ्या आरोपीला अटक करण्यात आल्याने या प्रकरणात आणखी मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



सीबीआयच्या तपासात मनीषा हवालदारने भौतिकशास्त्राचा पेपर मॉडर्न महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्राच्या शिक्षिका मनीषा मांढरेला पुरवल्याचे समोर आले. त्यानंतर, सखोल चौकशी करून सीबीआयने तिला अटक केली. शनिवारी सीबीआयच्या वतीने शाळेत झडती घेतली. हार्ड डिस्क व अन्य गोष्टी जप्त करण्यात आल्या आहेत.

सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, मनीषा हवालदार नीट-यूजी २०२६ परीक्षेच्या प्रक्रियेत सहभागी होती. एनटीएनी तिची तज्ज्ञ म्हणून नियुक्ती केली होती. त्यामुळे तिला भौतिकशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकांशी संबंधित सर्व माहिती आणि प्रवेश उपलब्ध होता. एप्रिल २०२६ मध्ये तिने भौतिकशास्त्र विषयातील काही प्रश्न सहआरोपी मनीषा मांढरेसोबत शेअर केले होते. तपासादरम्यान दिलेले प्रश्न आणि प्रत्यक्ष परीक्षेतील प्रश्न जुळल्याचे स्पष्ट झाले आहे.

**जून महिन्यात निवृत्ती**

मनीषा संजय हवालदार ही बुधवार पेठ येथील सेठ हिरालाल सराफ प्रशाला येथे मुख्याध्यपिका असून जून महिन्यात निवृत्त होणार होती. मनीषा मांढरे तिला शाळेत जाऊन भेटली होती. ◂(तभा वृत्तसेवा)

# राज्यात २० वर्षांनंतर एसआयआर

### ३० जूनपासून बीएलओ जाणार घरोघरी

◆ **मुंबई, २२ मे**

भारतीय निवडणूक आयोगाने राज्यात तब्बल वीस वर्षांनंतर मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीम हाती घेतली आहे. वाढते शहरीकरण आणि स्थलांतरामुळे मतदार याद्यांमध्ये वाढलेली दुबार नावे, मृत मतदार आणि त्रुटी दूर करण्यासाठी ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. या अत्यंत महत्त्वाच्या प्रक्रियेत राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांची माहिती तपासली जाणार आहे.

देशात यापूर्वी २००२-२००४ मध्ये सखोल पुनरीक्षण झाले होते. गेल्या दोन दशकांत केवळ संक्षिप्त पुनरीक्षण घेतले गेले. या काळात मोठ्या प्रमाणावर झालेल्या शहरीकरणामुळे नागरिकांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर झाले. अनेक मतदारांनी आपल्या नव्या वास्तव्याच्या जागी नाव नोंदवले, मात्र जुन्या ठिकाणाहून नाव वगळले नाही. यामुळे मतदार याद्यांमध्ये दुबार नावे वाढल्याची दाट शक्यता आहे. प्रामुख्याने गैरहजर, स्थलांतरित, मृत आणि दुबार मतदारांची नावे यादीतून वगळून याद्या निर्दोष करण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

# राज्यसभेच्या २४ जागांसाठी १८ जूनला निवडणूक

### महाराष्ट्रातील एका जागेचा समावेश

◆ **नवी दिल्ली, २२ मे**



१० राज्यातील राज्यसभेच्या २४ जागांसाठी १८ जूनला निवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाने या द्विवार्षिक निवडणुकीची घोषणा केली. यासोबतच महाराष्ट्र आणि तामीळनाडुतील राज्यसभेच्या दोन जागांसाठीच्या पोटनिवडणुकीच्या कार्यक्रमाचीही आयोगाने घोषणा केली.

गुजरात, कर्नाटक, आणि आंध्रप्रदेशातील प्रत्येकी चार, मध्यप्रदेश आणि राजस्थानमधील प्रत्येकी तीन, झारखंडमधील दोन तसेच मणिपूर, मेघालय, मिझोराम आणि अरुणाचल प्रदेशमधील प्रत्येकी एका जागेसाठी ही निवडणूक होणार आहे. या २४ सदस्यांचा कार्यकाळ जून आणि जुलै महिन्यात संपत आहे. या निवडणुकीची अधिसूचना १ जूनला जारी केली जाईल, ८ जूनपर्यंत अर्ज भरता येतील. ९ जूनला अर्जांची छाननी होईल तर ११ जूनपर्यत अर्ज मागे घेता येईल. आवश्यकता पडली तर १८ जूनला मतदान घेतले जाईल आणि त्याचदिवशी सायंकाळी निकाल जाहीर केला जाईल.ज्या राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यात राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, कॉंग्रेसचे दिग्विजयसिंह, शक्तिसिंह गोहील, माजी पंतप्रधान एच.डी. देवगौडा आणि केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि रवनीतसिंह बिट्टू यांचा समावेश आहे. खडगे आणि देवेगौडा कर्नाटकातुन राज्यसभेवर निवडून आले आहेत. निवडणूक होत असलेल्या राज्यसभेच्या २४ जागांत भाजपाच्या ११ आणि कॉंग्रेसच्या ४ खासदारांचा समावेश आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

#### महाराष्ट्र, तामिळनाडूत पोटनिवडणूक

**» उपमुख्यमंत्रिपदी निवड झाल्यामुळे सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला, त्यामुळे या जागेसाठी १८ जूनला पोटनिवडणूक होणार आहे. पवार यांनी आपल्या राज्यसभेच्या जागेचा ६ मे रोजी राजीनामा दिला होता. पवार यांचा कार्यकाळ ४ जुलै २०२८ पर्यंत होता. अण्णाद्रमुकचे नेते षण्मुगम यांनी ७ मेला राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला, त्यामुळे तामिळनाडूतील या जागेसाठीही १८ जूनला मतदान होणार आहे. षण्मुगम यांचा कार्यकाळ २९ जून २०२८ पर्यंत होता.**

# ७२१ वर्षांनंतर भोजशालेत वाग्देवीचे पूजन

### हजारो भाविकांची गर्दी; चोख पोलिस बंदोबस्त

◆ **धार, २२ मे**

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर न्यायासनाने १५ मे रोजी भोजशालेला मंदिर घोषित केल्यानंतर ७२१ वर्षांच्या दीर्घ संघर्षानंतर शुक्रवारी हिंदू समाजाने स्वाभिमान आणि सन्मानाने वाग्देवीचे पूजन आणि महाआरती केली. मंदिरात भोज उत्सव समितीने विशेष मूर्ती स्थापित केली. भाविकांनी आज दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत भक्तीमय वातावरणात हवन-पूजन आणि महाआरती केली. विशेष म्हणजे गेल्या शुक्रवारीच(ता. १५) न्यायासनाने भोजशालेला मंदिर घोषित केले होते. या दिवशी मुस्लिमांनी परिसरात नमाज अदा केली होती.



भोजशाला मंदिरात दर्शनासाठी जाताना भाविक

महाआरतीच्या पार्श्वभूमीवर धारमध्ये सुरक्षा व्यवस्था राखण्यासाठी पोलिस-प्रशासन पूर्णपणे सतर्क होते. सुमारे दोन हजार अधिकारी आणि जवान शहरभर तैनात आहेत. पोलिसांची एक विशेष टीम सोशल मीडियावरही लक्ष ठेवून होती. जिल्हाधिकारी राजीव रंजन मीना यांनी नागरिकांना शांतता आणि जातीय सलोखा राखण्याचे आवाहन केले होते. गुरुवारी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक सचिन शर्मा यांच्या नेतृत्वाखाली पायी फ्लॅग मार्चही काढण्यात आला होता.

उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे निराश झालेले मुस्लीम पक्ष गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. आदेश एकतर्फी असल्याचे सांगत काझी मोइनुद्दीन यांनी गुरुवारी रात्री सुमारे ८:३० वाजता विशेष परवानगी याचिका (एसएलपी) दाखल केली आहे. सदर अब्दुल समद म्हणाले, कमाल मौला मशिदीत ७०० वर्षांपासून जुम्माची नमाज अदा केली जात आहे. या परंपरेवर परिणाम झाल्याने समाजात दुःख आहे. परंतु, ही लढाई कायदेशीर चौकटीतच लढली जाईल.

#### हिंदूंसाठी आजचा दिवस ऐतिहासिक

**» भोज उत्सव समितीचे संरक्षक अशोक जैन म्हणाले, आजचा दिवस खूप ऐतिहासिक आहे. ७२१ वर्षांच्या दीर्घ संघर्षानंतर आज हिंदू समाजाने स्वाभिमान आणि सन्मानाने भोजशाळेत माँ सरस्वतीचे पूजन आणि महाआरती केली. सन १३०५ मध्ये मुघल आक्रमक अलाउद्दीन खिलजीने या मंदिरावर कब्जा करून ते अपवित्र केले होते. सात शतकांनंतर भोजशालेत शुक्रवारी मुस्लिमांनी नमाज अदा केली नाही.**



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### अतिरिक्त संचालक एसीबीच्या जाळ्यात!

**गुवाहाटी** : गुवाहाटीमध्ये आसाम दक्षता आणि भ्रष्टाचारविरोधी विभागाने मोठी कारवाई करत आसाम नागरी सेवेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहाथ अटक केली आहे. लचित कुमार दास, असे अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव असून ते भूमी अभिलेख विभागात अतिरिक्त संचालक म्हणून कार्यरत होते.मिळालेल्या माहितीनुसार, जमीन विक्रीसाठी आवश्यक असलेला परवाना (एनओसी) देण्याच्या बदल्यात संबंधित अधिकाऱ्याने १ लाख रुपयांची लाच मागितल्याची तक्रार दक्षता विभागाकडे करण्यात आली होती. तक्रारदाराने लाच देण्यास नकार देत थेट भ्रष्टाचारविरोधी विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली. त्यानंतर विभागाने प्राथमिक चौकशी आणि पडताळणी केल्यानंतर गुवाहाटीतील रूपनगर येथील भूमी अभिलेख संचालनालयात सापळा रचला या कारवाईदरम्यान अधिकारी आपल्या कार्यालयात ४५ हजार रुपये लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडला गेला. ही रक्कम मागितलेल्या एकूण १ लाख रुपयांच्या लाचेचा भाग असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



### छत्तीसगडमध्ये २०० वनवासींची घरवापसी!

**कवर्धा** : छत्तीसगडमधील कवर्धा जिल्ह्यातील पांडरिया येथे एक मोठा धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात एका पाद्रीसह सुमारे २०० वनवासी समाजातील सदस्य मूळ धर्मात परतले आहेत. घरवापसीचा हा संपूर्ण सोहळा पारंपरिक विधी आणि धार्मिक परंपरेनुसार पार पडल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे. या प्रसंगी स्थानिक आमदार भावना बोहरा यांनी उपस्थित राहून कार्यक्रमात सहभागी झालेल्या लोकांचे स्वागत केले. आयोजकांच्या मते, हा कार्यक्रम सामाजिक एकता आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचे प्रतीक आहे. स्थानिक स्तरावर गेल्या काही काळापासून अशा प्रकारच्या 'घरवापसी' कार्यक्रमांची संख्या वाढत असल्याचेही सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर सुमारे ७०० हून अधिक लोक मूळ धर्मात परतले आहेत. दरम्यान, या घडामोडीमुळे परिसरात विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. काही सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, आदिवासी समाजात त्यांच्या परंपरा आणि संस्कृतीबद्दल जागरूकता वाढत आहे, तर अशा कार्यक्रमांवरून सामाजिक स्तरावर चर्चाही सुरू आहे.

### मोदींना झालमुरी खाऊ घालणाऱ्या विक्रेत्याला धमक्या

**कोलकाता** : पंतप्रधान मोदी यांनी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक प्रचारावेळी झालमुरी विक्रेत्याकडे थांबले होते. ही घटना समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाली होती. यानंतर आता विक्रम साऊ या झालमुरी विक्रेत्याला पाकिस्तान, बांगलादेशातून जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत. यासंदर्भात त्यांनी पोलिसात तक्रार केली. धमकीच्या फोनमुळे विक्रम यांचे कुटुंब धास्तावले असून, त्याच्यावर दुकान बंद ठेवण्याची वेळ आली आहे. झारग्राम जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पंतप्रधान मोदी यांना स्वतः बनवलेली झालमुरी खाऊ घालणाऱ्या विक्रमच्या मोबाईलवर पाकिस्तान आणि बांगलादेशसारख्या देशांमधील आंतरराष्ट्रीय क्रमांकांवरून सतत फोन आणि व्हॉट्सअॅप व्हिडीओ कॉल्स येत आहेत. या कॉल्समधून त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला गंभीर परिणामांची आणि जीवे मारण्याची थेट धमकी दिली जात आहे. तक्रारीनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. आंतरराष्ट्रीय क्रमांकांवरून येणाऱ्या या धमकीच्या फोनमुळे परिसरात चिंता आणि घबराट निर्माण झाली आहे.

# अफवा पसरविल्यास कठोर कारवाई

## मुख्यमंत्री फडणवीस, छगन भुजबळ यांचा साठेबाजांना इशारा

◆ **मुंबई, २२ मे**

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा कोणताही तुटवडा नसून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून गोंधळून जाऊ नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. तसेच, या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन इंधनाची साठेबाजी करणाऱ्या किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सज्जड इशाराही सरकारकडून देण्यात आला आहे.



गेल्या काही दिवसांपासून इंधन पुरवठ्याबाबत समाजमाध्यमांवर उलटसुलट चर्चा आणि अफवा पसरल्याने अनेक पेट्रोल पंपांवर नागरिकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी उच्चस्तरीय बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात डिझेल आणि पेट्रोलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. पुरवठा साखळीत कोणताही खंड पडलेला नाही. नागरिकांनी घाबरून जाण्याचे किंवा पंपांवर गर्दी करण्याचे अजिबात कारण नाही. जर कोणी या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन साठेबाजी करण्याचा प्रयत्न केला, तर प्रशासन त्यांच्यावर कडक पावले उचलेल. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आपापल्या भागातील इंधन पुरवठ्यावर वैयक्तिक लक्ष ठेवण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. कोणत्याही अनधिकृत मेसेज किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच गरजेपुरतेच इंधन खरेदी करा, जेणेकरून पंपांवरील गर्दी टळेल.साठेबाजी किंवा काळ्याबाजाराची माहिती मिळाल्यास तात्काळ स्थानिक प्रशासनाला कळवा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. ◂(तभा वृत्तसेवा)

### अफवा पसरविणाऱ्यांवर पोलिसांची नजर



अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनीही नागरिकांना धीर दिला आहे. काही समाजकंटकांकडून इंधन टंचाईच्या खोट्या अफवा पसरवल्या जात आहेत. तेल कंपन्यांशी आमचा सातत्याने संपर्क सुरू असून पुरवठा सुरळीत आहे. पेट्रोल पंपांवर विनाकारण गर्दी करू नका, असे आवाहन भुजबळ यांनी केले.

### साठेबाजांची खैर नाही!

काही ठिकाणी इंधनाचा काळाबाजार किंवा साठेबाजी होत असल्याच्या तक्रारी आल्यास तात्काळ छापे टाकले जातील. वैध मापनापेक्षा जास्त दराने विक्री करणे किंवा साठा दडवून ठेवणे हा गंभीर गुन्हा असून, अशा साठेबाजांवर कडक कारवाई करण्याचे आदेश पुरवठा विभाग आणि पोलिसांना देण्यात आले आहेत, असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

# ईडीचे ९९ टक्के खटले प्रलंबित

## ७२ टक्के जप्त मालमत्ता परत करण्याची नामुष्की

◆ **नवी दिल्ली, २२ मे**

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मागील २० वर्षांत केलेल्या कारवाईतील ९९ टक्के खटले न्यायालयात प्रलंबित आहे. केवळ ६० प्रकरणांमध्येच न्यायालयाने निकाल दिले असून, यात ७२ टक्के जप्त केलेली मालमत्ता परत करण्याची नामुष्की ईडी अधिकाऱ्यांवर आली.

ईडी मनी लॉंड्रिंग प्रकरणात दोन दशकात देशभरात केलेल्या कारवाईची आकडेवारी सादर केली. या काळात ईडीने शेकडो ठिकाणी छापे टाकत गुन्हे दाखल केले. तपास करून व्यायालयात आरोपपत्र सादर केले, मात्र यातील अनेक प्रकरणे न्यायालयातच प्रलंबित आहे. गेल्या २० वर्षांत केवळ ६० प्रकरणांवर न्यायालयाने निकाल दिला, तर ७२ टक्के जप्त मालमत्ता परत करण्याचे आदेश न्यायालयाने ईडीला दिले. या प्रकरणांपैकी ५६ मध्ये १२४ लोकांना दोषी ठरवण्यात आले आणि ४ मध्ये आरोपी निर्दोष सुटले. याउलट, जर एकूण नोंदवलेल्या प्रकरणांशी तुलना केली, तर यशाचा हा वास्तविक दर केवळ ०.६८ टक्के आहे. मालमत्ता जप्त करण्याच्या बाबतीतही असेच स्वरूप दिसते. या काळात ईडीने २,३६,०१६ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त केल्या, त्यापैकी कायदेशीर प्रक्रियेनंतर केवळ ६५,८७२.७२ कोटी रुपयांच्या मालमत्ताच कायमस्वरूपी जप्त होऊ शकल्या. तपास आणि जप्तीची कारवाई मोठ्या प्रमाणावर झाली आहे, परंतु कायदेशीररित्या अंतिम निकालापर्यंत पोहोचलेल्या प्रकरणांची संख्या केवळ २८ टक्के राहिली. ◂(वृत्तसंस्था)




### दोषसिद्धीची स्थिती

| | |
|---|---|
| २००५-२०१४: | कोणतीही दोषसिद्धी नाही |
| २०१४-२०२४: | ३८ प्रकरणांमध्ये शिक्षा |
| २०२४-२५: | ९ प्रकरणांमध्ये शिक्षा |
| २०२५-२६: | ९ प्रकरणांमध्ये शिक्षा |

**२०२५-२६ मध्ये ६८५ प्रकरणे बंद करण्यात आली**

# संघ शिक्षा वर्गाचा आज समारोप

## पथसंचलनाने होणार सांगता

◆ **वर्धा, २२ मे**


वर्धा येथील अग्निहोत्री अभियांत्रिकी महाविद्यालय, नागठाणा येथे ८ मेपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने आयोजित संघ शिक्षा वर्गाचा समारोप शनिवार, २३ रोजी सायंकाळी ७.३० वाजता केसरीमल कन्या शाळा, सुदामपुरी येथे संपन्न होणार आहे. पंधरा दिवस चाललेल्या या प्रशिक्षण वर्गात विदर्भातील विविध जिल्ह्यांतील १९२ स्वयंसेवकांनी शारीरिक, बौद्धिक तसेच संघटनात्मक प्रशिक्षण घेतले. संघ शिक्षा वर्गाचा समारोप पथसंचलनाने होणार आहे.

समारोपीय कार्यक्रमाला जनहित मंच, वर्धाचे उपाध्यक्ष डॉ. जयंत मकरंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच, सेवाभारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनिल सप्रे यांचे प्रमुख मार्गदर्शन उपस्थितांना लाभणार आहे. मान्यवर स्वयंसेवकांना समाजकार्य, राष्ट्रसेवा आणि संघटनात्मक बांधिलकी याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वयंसेवकांचे भव्य पथसंचलनही आयोजित करण्यात आले आहे. शिस्तबद्ध गणवेशात स्वयंसेवक शहरातून पथसंचलन करणार आहे. पथसंचलनाचा प्रारंभ केसरीमल शाळेपासून होईल. त्यानंतर डॉ. अग्रवाल हॉस्पिटल मार्गे श्री छत्रपती संभाजी महाराज उद्यान, आर्वी नाका परिसरातून पुन्हा केसरीमल शाळेपर्यंत संचलन होणार आहे. नागरिकांनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वर्धा नगरचे नगर संघचालक डॉ. प्रसाद देशमुख यांनी केले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### उल्हासनगरमध्ये गोळीबारात दोन ठार

**ठाणे** : उल्हासनगर कॅम्प- ५ मधील कैलास कॉलनी परिसरात झालेल्या गोळीबाराच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला आहे, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.प्राथमिक माहितीनुसार, जुन्या वैरातून दोन गट आमोरासमोर आले आणि त्यानंतर हा हिंसक प्रकार घडला. या गोळीबारात सुमारे सात राउंड फायरिंग झाल्याचे सांगितले जात आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 'अक्कांच्या निधनाने आमच्या भावनाविश्वात पोकळी'



◆ **नागपूर, २२ मे**

मातृसमान व्यक्तिमत्त्व असलेल्या रुक्मिणी अक्का यांच्या निधनाने आमच्या भावनाविश्वात एक पोकळी निर्माण झाली आहे. ज्ञान आणि अनुभवाने समृद्ध असलेले रुक्मिणीजींचे जीवन आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व हे राष्ट्राला समर्पित अर्थपूर्ण जीवनाचे एक तेजस्वी उदाहरण होते. राष्ट्र सेविका समितीच्या माध्यमातून हिंदू समाजाचे संघटन करण्याच्या आणि स्त्रियांना संस्कार देण्याच्या उदात्त कार्यात त्या नेहमीच सक्रियपणे सहभागी होत्या. त्यांच्या नैसर्गिक, मातृसमान आत्मियता आणि अविरत सक्रियतेने सर्वांना प्रभावित केले. त्यांच्या निधनाने सेविकांसह सर्व मातृत्वाच्या ममतेला मुकले आहेत. संघाच्या आदर्शांचा मेरूसमान आधारस्तंभ असलेल्या सूर्यनारायण राव घराण्याच्या त्या पिढीतील शेवटचा दुवा आता आपल्यात नाही. रुक्मिणी अक्का आता केवळ स्मृतींमध्येच आहेत. मी त्यांच्या कुटुंबीयांना आणि समितीच्या सर्व भगिनींना माझ्या मनःपूर्वक संवेदना व्यक्त करतो. या पुण्यवान आत्म्याला देव मोक्ष देवो हीच प्रार्थना, अशा शब्दात सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या. ◂(तभा वृत्तसेवा)




मुंबईतील वांद्रे पश्चिम येथील रेल्वेच्या जागेवरील अतिक्रमण काढण्याचे काम तिसऱ्या दिवशीही सुरू होते. आता मलबा हटविण्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले आहे. याठिकाणी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे

### स्वतंत्र कुणबी अन् मराठा मंत्रालय स्थापन करा

◆ **जालना, २२ मे**

मराठा आंदोलनाचा केंद्रबिंदू असणाऱ्या आंतरवाली सराटीत शुक्रवारी मराठा आंदोलक मनोज जरांगे व भाजपा आमदार प्रसाद लाड यांच्यात चर्चा झाली. लाड यांनी जरांगेंना त्यांचे ३० मेपासून सुरू होणारे संभाव्य आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. यावर जरांगेंनी सध्या कोणतीही भूमिका स्पष्ट केली नाही. पण सरकारने मराठा समाजाला अद्याप सरसकट कुणबी प्रमाणपत्र का दिले नाही? असा सवाल करत लाड यांची कोंडी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.



स्वतंत्र कुणबी अन्मराठा मंत्रालय स्थापन करा, या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी ३० मेपासून आंतरवाली सराटीत उपोषण सुरू करण्याची घोषणा केली आहे. या घोषणेनंतर पुन्हा एकदा राज्यात मराठा आरक्षणाचे रान पेटले आहे. जरांगेंनी दोन दिवसांपूर्वी नुकतीच प्रसाद लाड यांना भेटीचे निमंत्रण दिले होते. त्यानुसार लाड यांनी शुक्रवारी त्यांची आंतरवाली सराटीत जाऊन भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये दीर्घ काळ चर्चा झाली. त्यात लाड यांना जरांगे यांना सध्याचा उन्हाचा कडाका व शेतीच्या मशागतीची कामे पाहता त्यांचे आगामी उपोषण लांबणीवर टाकण्याचे आवाहन केले. ◂(वृत्तसंस्था)

# त्विषाच्या मृत्यूचा तपास सीबीआयकडे

## मध्य प्रदेश सरकारचा निर्णय; कुटुंबाचा पुरावे नष्ट केल्याचा आरोप

◆ **भोपाळ, २२ मे**

३३ वर्षीय मॉडेल आणि अभिनेत्री त्विषा शर्मा मृत्यू प्रकरणाचा तपास आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्याचा निर्णय मध्य प्रदेश सरकारने घेतला आहे. यासंदर्भात शुक्रवारी अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली.



त्विषाच्या कुटुंबीयांनी तिची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला होता, तसेच स्थानिक पोलिसांवर पुरावे नष्ट केल्याचा आरोप केला होता. या पृष्ठभूमीवर मुख्यमंत्री मोहन यादव यांनी कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर हा तपास सीबीआयकडे देण्याचा निर्णय घेतला. त्विषाचा विवाह निवृत्त जिल्हा न्यायाधीश गिरीबाला सिंह यांचे पुत्र समर्थ सिंह यांच्याशी झाला होता. लग्नानंतर अवघ्या ६ महिन्यांच्या आत, १२ मे रोजी भोपाळमधील कटारा हिल्स भागातील तिच्या सासरच्या घरी त्विषाचा संशयास्पद मृत्यू झाला. तिच्या कुटुंबीयांनी हे आत्महत्येचे प्रकरण नसून हुंड्यासाठी केलेली हत्या असल्याचा थेट आरोप केला आहे. आत्महत्येसाठी वापरलेले साहित्य आणि इतर महत्त्वाचे पुरावे जप्त करण्यात पोलिसांनी जाणीवपूर्वक दिरंगाई केल्याचा आरोप तिच्या पालकांनी केला आहे. सुरुवातीच्या तपासात पोलिसांकडून चुका झाल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मान्य केले. त्यानंतर सरकारने या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्याचा निर्णय घेतला. ◂(वृत्तसंस्था)

### आरोपींवर गुन्हे दाखल

या प्रकरणी कटारा हिल्स पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ८०(२), ८५, ३(५) (घरगुती हिंसाचार, छळ आणि हुंडाबळी) तसेच हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल आहे. आता सीबीआय या गुन्ह्यासोबतच याच्याशी संबंधित कट रचणे आणि इतर सह-गुन्ह्यांचाही तपास करणार आहे. मध्यप्रदेश सरकारने सीबीआयला राज्यात तपासाचे पूर्ण अधिकार दिले आहेत.

# अपघातात एकाच कुटुंबातील तीन ठार

◆ **हिंगणघाट, २२ मे**

वडनेर-हिंगणघाट राष्ट्रीय महार्गावरील सगुणा कंपनीजवळ ओव्हरटेकच्या नादात झालेल्या भीषण अपघातात तालुक्यातील कुर्ला येथील वानखेडे कुटंबातील तीन जण ठार झाले. हा अपघात शुक्रवारी सकाळी ९ वाजता झाला.

गजानन वानखेडे हे वडनेरकडून हिंगणघाटकडे दुचाकीने येत होते. दरम्यान, समोरच्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या नादात मागाहून येणाऱ्या पिवळ्या रंगाच्या टिप्परने दुचाकीला जोरदार धडक दिली. यात गजानन वानखेडे, पत्नी पल्लवी आणि मुलगी आर्या यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ते जागोना येथून सासुरवाडीवरून आपल्या गावी दुचाकीने जात असताना हा अपघात झाला. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. ◂(तभा वृत्तसेवा)



अपघातग्रस्त दुचाकी

# वाघाच्या हल्ल्यात चार महिला ठार

(पान १ वरून) ▸

तेव्हा वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. महिलांनी जीवाच्या आकांताने गावाकडे धाव घेतली. मात्र, त्यातील चौघींवर वाघाने झडप घातली.

या भीषण घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी वन विभाग आणि प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय मृतदेह उचलू देणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतल्याने घटनास्थळी तणाव निर्माण झाला होता. दरम्यान, सिंदेवाहीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी अंजली सायंकार-बोरावार, क्षेत्र सहायक मानकर, गुंजेवाहीचे वनरक्षक अमर गेडाम व अधिनिस्त परिक्षेत्रातील वनकर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्या पोठापाठ ब्रह्मपुरीचे उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी, सहायक वनसंरक्षक गायकवाड, सहायक वनसंरक्षक अरविंद पोहोचले. सिंदेवाही पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारीदेखील घटनास्थळी आले आणि त्यांच्या मागण्या मान्य केल्या. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सिंदेवाही ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले.

गेल्या वर्षी याच सिंदेवाही तालुक्यात तेंदुपत्ता तोडायला गेलेल्या चार महिलांवर वाघाने हल्ला केला. यात तीन महिला ठार झाल्या होत्या. यातील शुभांगी चौधरी व कांता यांच्यात सासूसूनेचे नाते होते. या घटनेला एक वर्ष पूर्ण होत होत नाही, तोच आता वाघाच्या हल्ल्यात चार महिला ठार झाल्या. ◂(तभा वृत्तसेवा)

# सिंगापूर, युएईला मागे टाकणार महाराष्ट्र

## 'वन ट्रिलियन डॉलर'ची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल

◆ **मुंबई, २२ मे**

तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) प्रभावी वापर करून महाराष्ट्र २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. आगामी दोन ते तीन वर्षांत महाराष्ट्र अर्थव्यवस्थेच्या बाबतीत सिंगापूर आणि युएईसारख्या देशांनाही मागे टाकेल, असा ठाम विश्वास राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. रिपब्लिक भारततर्फे आयोजित इमॅजिन नेक्स्ट २०२६ या समिटमध्ये पत्रकार अर्णब गोस्वामी यांच्याशी विशेष संवाद साधताना त्यांनी महाराष्ट्राच्या विकास आराखड्यावर सविस्तर भाष्य केले.



फडणवीस यांनी नुकत्याच मंजूर झालेल्या महाराष्ट्र एआय पॉलिसी २०२६ बाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, हे धोरण राज्याला तंत्रज्ञान क्षेत्रात देशातच नव्हे तर जगात आघाडीवर नेईल. या धोरणांतर्गत १०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक आणि २०२१ पर्यंत १.५ लाखांहून अधिक रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी आरोग्य, शिक्षण, कृषी, नगरविकास, मराठी भाषा व संस्कृती आणि वित्त या क्षेत्रांसाठी ६ एआय सेंटर्स ऑफ एक्सलन्स, ५ एआय इनोव्हेशन सिटीज आणि ५०० कोटी रुपयांचा एआय स्टार्टअप फंड उभारण्यात येणार आहे. कृषी क्षेत्रात एआयच्या वापराबाबत बोलताना फडणवीसांनी महाविस्तार अॅपचा विशेष उल्लेख केला. आतापर्यंत महाराष्ट्रातील ५० लाख शेतकऱ्यांनी हे अॅप डाऊनलोड केले आहे. हे अॅप शेतकऱ्यांसाठी वन स्टॉप सोल्यूशन असून, भिल्लीसारख्या आदिवासी भाषेतूनही शेतकरी यावर प्रश्न विचारून माहिती मिळवू शकतात. चिप मॅन्युफॅक्चरिंगच्या (सेमीकंडक्टर) स्पर्धेत महाराष्ट्र फॅब्रिकेशनमध्ये मागे असला तरी आणि (पॅकेजिंग आणि डिझायनिंग) या चिप मूल्य साखळीमध्ये महाराष्ट्र देशात मोठी आघाडी घेत असल्याचेही फडणवीस यांनी अधोरेखित केले. ◂(तभा वृत्तसेवा)

### परकीय गुंतवणुकीतील वाटा ३१ टक्के

**२०१४-१५ मध्ये राज्याची अर्थव्यवस्था १४ लाख कोटींची होती, ती आज वाढून ५४ लाख कोटींवर पोहोचली आहे. महाराष्ट्र आज ६६० अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था असून देशातील एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी (एफडीआय) ३१% वाटा एकट्या महाराष्ट्राचा आहे. दावोसमध्ये झालेल्या सामंजस्य करारांचे प्रत्यक्षात गुंतवणुकीत रूपांतर होण्याचे प्रमाण राज्यात तब्बल ८५% इतके राहिले आहे.**

# ब्रह्मपुरी ४७.२, वर्धा ४७

## विदर्भात तापमानाचा कहर

◆ **नागपूर, २२ मे**

विदर्भावर सूर्याचा प्रकोप अधिकच वाढला असून, उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. गुरुवारी ४७.१ अंशांवर असलेले ब्रह्मपुरीचे तापमान शुक्रवारी ४७.२ अंशांवर पोहोचले. तिथेच, वर्धा शहरानेही आज ४७ अंशाचा आकडा गाठला. दोन दिवसांनंतर नवतपा सुरू होणार असल्याने तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.



या दोन्ही शहरांच्या खालोखाल अमरावती आणि चंद्रपूर शहरात ४६.४ इतक्या तापमानाची नोंद झाली. तर. गडचिरोलीत ४६ अंश तापमान होते. त्यानंतर नागपूर नगरित ४५.९ अंश इतके तापमान नोंदविण्यात आले. त्या खालोखाल यवतमाळात ४५.४ तापमान होते. गोंदियात ४४.९, अकोला शहरात ४४.८, वाशिममध्ये ४२.६, भंडाऱ्यात ४२ आणि बुलढाण्यात ४१ अंश तापमानाची नोंद करण्यात आली.

दरम्यान, शुक्रवारी पुण्यासह राज्यातील काही भागांमध्ये पाऊस झाला. विदर्भात मात्र उष्णतेची प्रखर लाट असल्याने उष्माघाताच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. ◂(तभा वृत्तसेवा)



देशातील तरुण वर्ग कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून व्यवस्थेविरोधातील आपले मत व्यक्त करत आहे. त्यामुळे त्यांचे ट्विटर हँडल बॅन केले जाते किंवा थांबवले जाते. याचा अर्थ असा आहे की, सरकारच्या मनात भीती आहे.
- **विजय वडेट्टीवार**, काँग्रेस नेते


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शनिवार, २३ मे २०२६ ३


लोकांच्या कामांसाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना भेटावेच लागते. त्यामुळे या भेटीचा दुसरा अर्थ काढण्याची गरज नाही. मी निवडून आल्यापासून ऑपरेशन टायगर सुरू आहे. जे लोक ऑपरेशन टायगर म्हणतात, त्यांनाच हे कधी संपणार ते विचारा.
- **नागेश पाटील आष्टीकर**, खासदार, उबाठा



# भारत-सायप्रस मैत्रीचे नवे पर्व सुरू

## ● पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन ● पाच सामंजस्य करारावर स्वाक्षरी



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे अध्यक्ष निकोस ख्रिस्तो यांच्या उपस्थितीत दोन्ही देशांमध्ये विविध करार झाले आहेत

### आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणांची गरज

**युक्रेन असो किंवा मध्यपूर्वेतील तणावाची परिस्थिती असो, शांततेच्या निराकरणासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना भारताचा पाठिंबा आहे. जागतिक शांतता काळाची गरज असून, युद्धाऐवजी संवादातून समस्या सोडविण्याला प्राधान्य द्यावे. जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. भारत-सायप्रस सामरिक भागीदारी दोन्ही देशांमधील संबंधांना नवीन ऊर्जा, नवीन महत्त्वाकांक्षा आणि नवीन गती देईल अशी आशा मोदी यांनी व्यक्त केली.**

### व्यापक सामरिक भागीदारीला प्राधान्य

**राष्ट्राध्यक्ष निकोस भारत भेटीच्या उद्देशावर बोलताना म्हणाले, भारत-युरोपियन युनियन सहकार्य अधिक दृढ करणे बदलत्या जागतिक परिस्थितीच्या अनुषंगाने आवश्यक आहे. मी आज येथे केवळ सायप्रस प्रजासत्ताकाचा राष्ट्राध्यक्ष म्हणून नव्हे, तर युरोपियन युनियनच्या परिषदेचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या सदस्य राष्ट्राचा प्रतिनिधी म्हणूनही उपस्थित आहे.**

◆ **नवी दिल्ली, २२ मे**

भारत-सायप्रस संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस ख्रिस्तोदौलिदेस यांच्यात शुक्रवारी राजधानी दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे द्विपक्षीय चर्चा झाली. दोन्ही देशांमधील मैत्री केवळ मजबूतच नाही, तर भविष्यातील गरजा आणि शक्यतांशी सुसंगत आहे. भारत-सायप्रस मैत्रीचे नवे पर्व सुरू झाले असून, द्विपक्षीय संबंध काळाच्या कसोटीवर उतरले असल्याचे पंतप्रधान मोदी संयुक्त संबोधनात म्हणाले.

बैठकीला परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्यासह दोन्ही देशांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर संरक्षण, ऊर्जा, शिक्षण, आरोग्य आणि औषध क्षेत्रात द्विपक्षीय करारावर स्वाक्षरी करण्यात आली. करारानंतर आयोजित संयुक्त पत्रपरिषदेत बोलताना मोदी म्हणाले, दोन्ही देशांमधील मैत्री मजबूत आणि भविष्याभिमुख आहे. गेल्या वर्षी सायप्रस दौऱ्यादरम्यान दिलेला सर्वोच्च नागरी सन्मान हा भारताचा सायप्रसप्रती असलेला आदर आणि दोन्ही देशांमधील घनिष्ठ संबंधांचे प्रतीक आहे. भारत-सायप्रस भागीदारी लोकशाही, कायद्याचे राज्य आणि सार्वभौमत्व व प्रादेशिक अखंडतेचा आदर यांसारख्या सामायिक मूल्यांवर आधारित आहे. भारत या तत्त्वांप्रति नेहमीच पूर्णपणे वचनबद्ध राहील. गेल्या दशकात सायप्रसकडून भारतात होणारी गुंतवणूक जवळपास दुप्पट झाली आहे, जे दोन्ही देशांमधील वाढत्या विश्वासाचे द्योतक आहे. भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार करारामुळे अनेक नवीन आर्थिक संधी निर्माण झाल्या आहेत आणि पुढील पाच वर्षांत ही गुंतवणूक पुन्हा दुप्पट करण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. *(वृत्तसंस्था)*

# दहशतवादाविरोधात ब्रिक्स देश एकवटले

## सीमापार हिंसाचारावर भारताने उपस्थित केला मुद्दा

◆ **नवी दिल्ली, २२ मे**

ब्रिक्स दहशतवादविरोधी कार्यगटाच्या ११ व्या वार्षिक बैठकीत, भारताने दहशतवादाविरोधात मजबूत आणि एकत्रित जागतिक कारवाईच्या गरजेवर भर दिला. सीमापार हिंसाचार आणि दहशतवादी हल्ल्याच्या मुद्यावर ब्रिक्स संघटनेच्या सदस्य देशांनी भारताला पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.



परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी बैठकीची माहिती देताना सांगितले की, परराष्ट्र मंत्रालयातील सचिव (पश्चिम) राजदूत सिबी जॉर्ज यांनी बैठकीला संबोधित करताना सीमापार दहशतवादाबाबत भारताची गंभीर चिंता अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, दहशतवाद हे कोणत्याही एका देशापुढील आव्हान नसून संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय आहे.

त्यांनी सर्व देशांना दहशतवादाच्या सर्व प्रकारांविरुद्ध संयुक्त कारवाई करण्याचे आवाहन केले. जे देश दहशतवाद्यांना आश्रय, पाठिंबा आणि संरक्षण देतात, त्यांनाही जबाबदार धरले पाहिजे, यावर ब्रिक्स देशांच्या प्रतिनिधींनी दहशतवादविरोधातील कारवाईवर भारताला पाठिंबा असल्याचे सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### निधी पुरवठा मोठे आव्हान

**बैठकीत दहशतवादाच्या बदलत्या स्वरूपाबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली. भारताने म्हटले की, दहशतवादी संघटना आता नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत, तसेच निधीपुरवठ्याच्या पद्धतीही वेगाने बदलत आहेत. कट्टरतावाद आणि ऑनलाइन कट्टरतावाद हे एक मोठे आव्हान असल्याचे वर्णन करून, भारताने मजबूत आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या गरजेवर भर दिला.**

### जागतिक चौकट मजबूत करण्यावर भर

**भारताने ब्रिक्स देशांना आवाहन केले की, त्यांनी विद्यमान जागतिक दहशतवादविरोधी चौकट अधिक प्रभावी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत. सिबी जॉर्ज यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय सहकार्याशिवाय दहशतवादाविरुद्धचा लढा अपूर्ण राहील. भविष्यातील धोक्यांना तोंड देण्यासाठी ब्रिक्स दहशतवादविरोधी कार्यगटाला अधिक मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला.**

# हमजाची हत्या करणारा अटकेत; दोघे पसार

◆ **इस्लामाबाद, २२ मे**

पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार दहशतवादी हमजा बुरहानच्या हत्येप्रकरणी मुझफ्फराबादच्या सुरक्षा दलाने एका आरोपीला अटक केली आहे. अब्दुल्ला कमाल असे आरोपीचे नाव असून, याप्रकरणाशी संबंधित दोन आरोपी अजून पसार आहे, त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

अब्दुल्ला कमाल पाकिस्तानच्या वाह कँटचा रहिवासी आहे. कारवाईदरम्यान आरोपीकडून शस्त्रही जप्त करण्यात आले. हत्या याच शस्त्राने झाली होती की नाही, याचा तपास तपास यंत्रणा करत आहेत. घटनेवेळी उपस्थित असलेले इतर दोन संशयित घटनास्थळावरून पळून गेले. सुरक्षा यंत्रणा त्यांचा शोध घेत आहेत. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### ‘देऊळ बंद २’ला जबरदस्त प्रतिसाद



**मुंबई** : २०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या सुपरहिट‘देऊळ बंद’ या चित्रपटाने श्रद्धा आणि विज्ञान यातील संघर्षावर आधारित कथानकामुळे मराठी प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले होते. आता तब्बल ११ वर्षांनंतर त्याचा बहुचर्चित सिक्वेल ‘देऊळ बंद २’आता प्रदर्शित झाला असून पहिल्याच दिवशी चित्रपटाने प्रेक्षकांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळवत दमदार सुरुवात केली आहे. राज्यातील पुणे, मुंबई, नाशिक, जळगाव, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या सर्व भागांतील चित्रपटगृहांमध्ये पहिल्याच दिवशी अनेक शो हाऊसफुल्ल झाल्याचे चित्र दिसून आले. मुंबईतील भांडुप, कल्याण, नालासोपारा, अंधेरी, ठाणे आणि लोअर परळ परिसरातही चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. अनेक मल्टिप्लेक्समध्ये शो हाऊसफुल्ल झाल्याने तिकीट खिडक्यांवर आणि ऑनलाइन बुकिंग प्लॅटफॉर्मवर मोठी मागणी निर्माण झाली.

### कंगनाने गुपचूप केले लग्न?

**मुंबई** : बॉलिवूड अभिनेत्री आणि खासदार कंगना रणौत ही नेहमीच तिच्या स्पष्टवक्तेपणामुळे आणि वेगळ्या शैलीमुळे चर्चेत असते. मात्र यावेळी ती एका वेगळ्याच कारणामुळे सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. कंगनाचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यामध्ये ती गळ्यात मंगळसूत्र आणि हातात हिरव्या बांगड्या घालून दिसत आहे. त्यामुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, कंगनाने गुपचूप लग्न केल्याची चर्चा रंगू लागली आहे. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये कंगना तिच्या घराबाहेर पडताना दिसते. तिच्यासोबत सुरक्षा रक्षकांचा ताफाही होता. यावेळी तिने फिकट गुलाबी रंगाचा पारंपरिक सूट परिधान केला होता. कपाळावर टिकली, गळ्यात मंगळसूत्र आणि हातात हिरव्या बांगड्या असा तिचा पूर्णपणे विवाहित महिलेसारखा लूक पाहायला मिळाला. पापाराझींनी तिचे फोटो आणि व्हिडिओ टिपण्याचा प्रयत्न केला, मात्र कोणाशीही संवाद न साधता ती शांतपणे गाडीत बसून निघून गेली.



### ऐश्वर्या कान्समध्ये दाखल

**कान्स** : बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन पुन्हा एकदा प्रतिष्ठित कान्स फिल्म फेस्टिवलमध्ये आपल्या उपस्थितीची छाप उमटवण्यासाठी सज्ज झाली आहे. ऐश्वर्या कान्समध्ये दाखल झाली असून सोबत तिची मुलगी आराध्या बच्चनही दिसून आली. दोघींचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून ऐश्वर्या यंदा कान्समध्ये सहभागी होईल किंवा नाही, याबाबत चर्चा सुरू होत्या. विमानतळावरून मुक्कामी दाखल झालेली ही मायलेकीची जोडी क्लासी लुकमध्ये दिसली. त्यांनी ऑल-ब्लॅक पोशाख परिधान केला होता आणि सौम्य स्मितहास्य करत माध्यमांना अभिवादन केले. ऐश्वर्याच्या या प्रवासाकडे केवळ तिच्या चाहत्यांचेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय फॅशन आणि फिल्म इंडस्ट्रीचेही लक्ष लागले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही त्या कान्सच्या रेड कार्पेटवर कोणत्या लुकमध्ये दिसतील, याबाबत मोठी उत्सुकता आहे. गेल्या दोन दशकांपासून ऐश्वर्या राय कान्स फिल्म फेस्टिवलच्या नियमित उपस्थितांपैकी एक आहे आणि तिच्या प्रत्येक लुकची आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा होत असते. ऐश्वर्या राय बच्चनने २००२ मध्ये ‘देवदास’ चित्रपटाच्या प्रीमियरसाठी पहिल्यांदा कान्स फिल्म फेस्टिवलमध्ये सहभाग घेतला होता.

# आरबीआयने सरकारला दिला २.८७ लाख कोटींचा लाभांश

## भू-राजकीय आव्हानांच्या काळात अर्थव्यवस्थेला पाठबळ

◆ **मुंबई, २२ मे**

भारतीय रिझर्व्ह बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सरकारला २.८७ लाख कोटी रुपयांचा विक्रमी लाभांश जाहीर केला आहे. या मोठ्या आर्थिक हस्तांतरणामुळे भू-राजकीय आव्हानांच्या काळात सरकारला महत्त्वपूर्ण आर्थिक पाठबळ मिळेल. केंद्रीय बँकेच्या या निर्णयामुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल, अशी अपेक्षा आहे. हा लाभांश मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील २.६९ लाख कोटी रुपयांच्या अतिरिक्त हस्तांतरणापेक्षा २७.४% अधिक आहे.

गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आरबीआयच्या केंद्रीय संचालक मंडळाच्या ६२३ व्या बैठकीत लाभांश देण्याचा हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. आरबीआयने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, जोखीम तरतुदी आणि वैधानिक निधीमध्ये हस्तांतरण करण्यापूर्वीचे निव्वळ उत्पन्न २०२५-२६ या आर्थिक वर्षात ३९५,९७२.१० कोटी होते. मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये हे उत्पन्न ३१३,४५५.७७ कोटी होते. ही केंद्रीय बँकेच्या उत्पन्नातील एक लक्षणीय वाढ दर्शवते.३१ मार्च २०२६ पर्यंत केंद्रीय बँकेचा ताळेबंद २०.६१ टक्क्यांनी वाढून ९१९७,१२१.०८ कोटी झाला आहे. ही वाढ आरबीआयची मजबूत आर्थिक स्थिती दर्शवते. बँकेच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाल्यामुळे सरकारला अधिक अतिरिक्त निधी (लाभांश) वितरित करणे शक्य झाले आहे. हे देशाच्या आर्थिक स्थिरतेसाठी एक सकारात्मक संकेत आहे.

**सरकारला मोठा दिलासा मिळेल**

हा विक्रमी लाभांश अशा वेळी आला आहे, जेव्हा सरकारला विविध विकास प्रकल्प आणि कल्याणकारी योजनांसाठी निधीची आवश्यकता आहे. ही रक्कम वित्तीय तूट नियंत्रित करण्यासही मदत करू शकते. *(वृत्तसंस्था)*

### बँकिंग प्रणालीमध्ये ८१,५९० कोटींची तरलता

**भारतीय रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी बँकिंग प्रणालीमध्ये ८१,५९० कोटी रुपयांची तात्पुरती तरलता (लिक्विडिटी) देखील ओतली. ही रक्कम तीन दिवसीय व्हेरिएबल रेट रेपो लिलावाद्वारे वितरित करण्यात आली. वित्तीय प्रणालीतील रोख प्रवाहातील तात्पुरते चढउतार व्यवस्थापित करणे हा या निर्णयाचा उद्देश आहे.**

# बजरंग दलाची बाबा बुढा अमरनाथ यात्रा १६ ऑगस्टपासून

◆ **नवी दिल्ली, २२ मे**

पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या जम्मू काश्मिरातील पुंछ जिल्ह्यातील श्री बाबा बुढा अमरनाथ यात्रेचा शुभारंभ १६ ऑगस्टला होणार असल्याचे विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय संघटनमंत्री मिलिंद परांडे यांनी एका पत्रपरिषदेत जाहीर केले.

गुरुवारी राजधानी दिल्लीत एका पत्रपरिषदेत परांडे म्हणाले की, १६ ऑगस्टला जम्मूच्या भगवती नगर बेस कॅम्प येथे सायंकाळी एका कार्यक्रमात या यात्रेचे औपचारिक उदघाटन होईल. १७ ऑगस्टला पहाटे पाच वाजता बजरंग दल कार्यकर्त्यांचा जत्था जम्मूवरुन बुढा अमरनाथ यात्रेसाठी निघेल. १८ ऑगस्टला सकाळी ६ वाजता हा जत्था पुंछवरुन बाबा बुढा अमरनाथसाठी निघेल आणि दोन तासात तेथे पोहोचून सकाळी १० वाजता दर्शन घेऊन परतीच्या प्रवासाला लागेल. परत येतांना शिवखेडी दर्शन घेत कटरा येथे या यात्रेचा समारोप होईल. रोज याप्रमाणे अनेक जत्थे जातील. २७ ऑगस्टपर्यंत ही यात्रा चालणार आहे.

२००५ मध्ये अतिशय प्रतिकूल परिस्थितीत बजरंग दलाने ही यात्रा सुरु केली होती, आज या यात्रेला २१ वर्ष पूर्ण झाली, राष्ट्रीय एकात्मतेत या यात्रेचे मोठे योगदान आहे, याकडे लक्ष वेधत परांडे म्हणाले की, बाबा बुढा अमरनाथचा भाग हा सीमा सुरक्षा दलाच्या ताब्यात आहे. दहशतवाद आणि सीमेपलिकडून होणाऱ्या गोळाबारामुळे ही यात्रा बंद झाली होती, बजरंग दलाच्या प्रयत्नाने ही यात्रा सुरु झाली. *(वृत्तसंस्था)*

# होंडुरासमध्ये गोळीबार, २५ जणांचा मृत्यू

### बंदूकधाऱ्यांचा मजूर, पोलिसांवर हल्ला; १२ नागरिक जखमी

◆ **तेगुसिगाल्पा, २२ मे**

मध्य अमेरिकन देश होंडुरासमध्ये गुरुवारी झालेल्या दोन वेगवेगळ्या हल्ल्यांमध्ये २५ लोकांचा मृत्यू झाला. यामध्ये १९ मजूर आणि ६ पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. दोन्ही हल्ल्यात बंदुकधाऱ्यांनी बेछूट गोळीबार केला.

पहिला हल्ला उत्तर होंडुरासमधील त्रुजिलो शहरात एका प्रकल्पावर झाला. पोलिस विभागाचे प्रवक्ते युरी मोरा यांनी सांगितले की, सशस्त्र हल्लेखोरांनी प्रकल्पाच्या आवारात प्रवेश करीत मजुरांवर गोळीबार केला. दुसरा हल्ला ग्वाटेमाला सीमेजवळील ओमोआ शहरात झाला, जिथे बंदूकधाऱ्यांनी पोलिस पथकावर हल्ला केला. यात ६ पोलिस कर्मचारी मारले गेले. होंडुरासच्या सुरक्षा मंत्रालयाने सांगितले की, दोन्ही हल्ल्यांच्या तपासासाठी उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. सरकारने प्रभावित



भागांमध्ये सुरक्षा मोहीम तीव्र करण्याची घोषणा केली. हल्ल्याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. दरम्यान नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध असलेला हा प्रदेश अनेक दशकांपासून शेतजमिनीच्या वादाचे केंद्र राहिला आहे. अमेरिकन मानवाधिकार आयोगाने यापूर्वी या प्रदेशातील काही कार्यकर्त्यांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना जारी केल्या होत्या. हा देश पर्यावरणवाद्यांसाठी सर्वात धोकादायक देशांपैकी एक म्हणून सातत्याने गणला जातो. २०२४ मध्ये पाच पर्यावरणवाद्यांची हत्या झाली आणि त्याच्या आधीच्या वर्षी १८ जणांची हत्या झाली होती. *(वृत्तसंस्था)*

# भारतानंतर पाकिस्तानात कॉकरोच अवामी पार्टी

◆ **इस्लामाबाद, २२ मे**

भारतानंतर आता पाकिस्तानातही कॉकरोच अवामी पार्टीची धूम असून समाज माध्यमावर तरुणांची मोठी पसंती मिळत आहे. समाज माध्यमावर कॉकरोच अवामी पार्टी आणि कॉकरोच अवामी लीग सारखे अनेक गट तयार झाले असून, त्यांनी नागरिकांना पक्षात सहभागी होण्याचे आवाहन केले.

इंस्टाग्रामवर कॉकरोच अवामी पार्टी नावाचे पेज समोर आले. या पेजमध्ये उघडपणे मान्य केले की ते भारतीय आंदोलनाने प्रेरित आहे. आम्ही भारतातील कॉकरोच जनता पार्टीची कॉपी केली, तरी आमचा उद्देश सारखाच आहे.

पाकिस्तानच्या तरुणाईच्या समस्या मांडण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. त्यांचा लोगो भारतीय पक्षासारखाच आहे, परंतु रंग हिरवा आणि पांढरा ठेवण्यात आला आहे. हे स्वतःला इम्रान खानच्या पीटीआय, पीएमएल-एन आणि पीपीपी सारख्या मुख्य प्रवाहातील पक्षांना पर्याय म्हणून सादर करत आहे. तर, कॉकरोच अवामी लीग पाकिस्तान नावाच्या दुसऱ्या अकाउंटने स्वतःला अधिकृत घोषित केले आहे. *(वृत्तसंस्था)*



मध्यप्रदेशातील धार येथील भोजशालेत तब्बल ७२१ वर्षांनंतर अखंड पूजा करण्यात आली. यावेळी हजारो भाविकांनी वाग्देवीचे दर्शन घेतले. तसेच महाआरती करण्यात आली. सात शतकांनंतर भोजशालेत शुक्रवारी नमाज पठन झाले नाही. मंदिर परिसरात प्रशासनाने मोठा बंदोबस्त ठेवला आहे

# कच्च्या तेलाची दरवाढ भारतासाठी संकट

◆ **न्यू यॉर्क, २२ मे**

अमेरिका-इराण यांच्यातील तणावामुळे आंतरराष्ट्रीय होर्मुझ जलमार्गातून होणारा कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला असून, जागतिक बाजारात तेलाचे दर विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. तेलाच्या दरात सातत्याने होणारी दरवाढ भारताच्या आर्थिक संकटात भर घालणारी ठरू शकते. परिस्थिती कायम राहिल्यास अर्थव्यवस्थेत घसरण होण्याची आणि जीडीपीचा दरात देखील घट होण्याची शक्यता असल्याचा इशारा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) नुकत्याच जारी केलेल्या अहवालातून दिला आहे.

होर्मुझ जलमार्ग अजून काही काळ बंद राहिल्यास तेल आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या देशांच्या समस्या वाढणार आहेत.

### आयएमएफचा अहवाल, अर्थव्यवस्थेत घसरण होण्याची शक्यता




### महागाई भडकण्याचा धोका

**पेट्रोल, डिझेलचे वाढते दर, व्यापारातील अडथळे आणि गुंतवणुकीसाठी प्रतिकूल वातावरण याचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या वाढीवर होईल. महागाई वाढण्याचा धोका वाढला असून, ग्राहक खरेदी क्षमता कमकुवत होण्याचा धाका अधिक आहे. चालू खात्यातील तूट, चलनवाढ आणि रुपयात घसरण होण्याची शक्यता बळावली असल्याचे अहवालात म्हटले आहे. ऊर्जेच्या किमतींमधील चढ-उतारामुळे भारतीय कुटुंबांची खर्च करण्याची क्षमता लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते.**

### दीर्घकालीन वित्तीय दबाव राहणार

**या समस्यांवर तातडीने उपाययोजना केली नाही, तर अधिक लोक गरिबीत ढकलले जाऊ शकतात. यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना आर्थिकदृष्ट्या खर्चिक ठरू शकते. ज्यामुळे महागाई, सार्वजनिक कर्ज वाढेल आणि दीर्घकालीन वित्तीय दबाव निर्माण होईल. जागतिक ऊर्जा संकट पाहता, पूर्वीपेक्षा अधिक महागाई नियंत्रण आणि वित्तीय दबाव यांच्यात संतुलन साधावे लागणार असल्याचा सल्ला देण्यात आला.**

कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढ अशीच सुरू राहिल्यास भारतासाठी मोठे आर्थिक धोके निर्माण होऊ शकते असे आयएमएफने अहवालात म्हटले आहे. अमेरिका-इराण युद्ध सुरू झाल्यापासून कच्च्या तेलाच्या किमतीत जवळपास ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. कच्च्या तेलाचे वाढते दर भारताच्या चलनवाढीच्या दृष्टिकोनासाठी आणि वित्तीय गणितांसाठी धोका निर्माण करत आहेत. तेलाच्या किमती सतत वाढत राहिल्यास भारतासाठी आर्थिक धोके निर्माण होऊ शकतात. हे केवळ भारतासाठीच नव्हे, तर इतर विकसनशील अर्थव्यवस्थांसाठीही धोकादायक आहे. अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी ही परिस्थिती अनुकूल नाही आणि याचा परिणाम जीडीपीच्या दरावर होऊ शकतो. *(वृत्तसंस्था)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# 'झुरळां'च्या उद्रेकाचे अर्थ

'झुरळ' या विषयावरील मराठी विश्वकोशातील नोंदीचा सारांश म्हणतो की, उब, मुबलक अन्न, अस्वच्छता व ओलावा असलेल्या ठिकाणी झुरळांचे वास्तव्य असते. रात्री ते अधिक सक्रिय होतात आणि अंधारात अन्न शोधण्यासाठी बाहेर पडतात. ते सर्वभक्षी असून अन्नपदार्थ, कागद, कापड, चामडे इ. खाऊन तसेच कुरतडून त्यांची हानी करतात. झुरळे पटकी, कावीळ, पोलिओ, क्षय व विषमज्वर या रोगांचा फैलाव करतात. झुरळांची उत्पत्ती सुमारे २५ कोटी वर्षांपूर्वी झाली; मात्र त्यांच्या शरीररचनेत फारसा बदल झालेला नाही. म्हणून त्यांना 'जिवंत जीवाश्म' म्हणतात. सर्व कीटकांमध्ये झुरळे ही काटक समजली जातात. त्यांच्या काही जाती महिनाभरसुद्धा अन्नपाण्याशिवाय सक्रिय राहतात आणि अत्यंत मर्यादित अन्नपुरवठ्यावर तग धरू शकतात. काही तर हवेशिवाय ४५ मिनिटे जगू शकतात. कडाक्याच्या थंडीतही ती टिकाव धरतात. घरातील झुरळांच्या संख्येवर नियंत्रण राखण्यासाठी घर कोरडे व स्वच्छ ठेवावे. त्यांना लपण्यासाठी अडगळ साचू देऊ नये इ. इ. ही नोंद शोधण्याचे निमित्त होते आभासी जगतात अचानक उद्‌भवलेल्या कॉक्रोच जनता पार्टी अर्थात झुरळ जनता पार्टी या पक्षाचे.

नावात 'पार्टी' असले तरी हा व्यावहारिक अर्थाने राजकीय पक्ष नाही. त्याची नोंदणी झालेली नाही आणि त्याचे कॅडर देखील तयार झालेले नाही. पदाधिकारी नियुक्त होत असल्याच्या बातम्या सोशल मीडियावर दिसू लागल्या आहेत हे खरे. आभासी का असेना, अशा एखाद्या प्रवाहाचे आकस्मिक उद्‌भवणे दुर्लक्ष करता येण्यासारखे नाही. झुरळ पक्ष जन्माला आला आणि त्याला लक्षावधी फॉलोअर्स मिळाले, हे कुठेतरी खदखद असल्याचे लक्षण मानले पाहिजे. अण्णा हजारे यांच्या आंदोलनानंतर अचानकच अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पार्टी (आप) हा पक्ष उदयाला आला होता. तो पक्ष पुढे दिल्लीच्या सत्तेत आला. सध्या तो पंजाबात सत्ताधारी पक्ष आहे. अनेक पक्ष किंवा संघटना सुरुवातीला 'गंमत' वाटल्या, पण पुढे त्यांनी सत्तेच्या केंद्रावर कब्जा केला किंवा वाटा मिळविला हा इतिहास आहे. समाजात अस्वस्थता साचत जाते, तेव्हा व्यवस्था लोकांच्या मनातील विश्वास गमावू लागते. अशा स्थितीत विचित्र किंवा अगदी हास्यास्पद वाटणाऱ्या गोष्टीही अचानक गंभीर बनू शकतात. झुरळ पार्टीने सरन्यायाधीशांच्या वक्तव्यानंतर अल्पशा काळात सोशल मीडियावर प्रचंड प्रतिसाद मिळविला. लोकांनी त्याचे मीम्स केले, व्हिडीओ बनवले, घोषवाक्ये लिहिली आणि काहींनी तर त्याला एक प्रकारे प्रतिरोधाचे प्रतीक मानायलाही सुरुवात केली. सरन्यायाधीशांच्या वक्तव्यानंतर अभिजित दीपके या तरुणाने या पक्षाची घोषणा केली. तसे हे नावच उपहासात्मकच. झुरळ हे घाण, अस्वच्छता, रोगराई यांचे लक्षण मानले जाते. सोशल मीडियावर या आभासी पक्षाला मिळालेला पाठिंबा एकीकडे सरन्यायाधीशांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त करणारा आणि दुसरीकडे विद्यमान व्यवस्थेबद्दल राग व्यक्त करणाराही आहे, हे लक्षात घ्यावे लागते. कुणी काहीही म्हणत असले, तरी आपली व्यवस्था अकार्यक्षम आहे आणि तीत सुधारणा झालेली नाही हे दिसतेच. भ्रष्टाचार संपत नाही. सरकारी टेंडर व्यवस्थेत सारे काही टक्केवारीवर चालते आणि सर्वांचे 'चांगभले' होत असते, हे उघड गुपित आहे. बेरोजगारी कमी होत नाही, नीटसारख्या परीक्षेचे पेपर फुटतात, गावे-शहरे घाणीत बुडालेली आहेत, सामान्य माणूस कर्जात सापडला आहे, पुढारी-अधिकारी आणि सरकारी कर्मचारी चैनीत जगत आहेत, महागाई वाढत आहे, अन्याय-अत्याचार आणि हिंसाचार वाढतोय याचा अनुभव लोक घेत आहेत. अशा स्थितीत झुरळाकडे फक्त सामाजिक व्यंगाचे नव्हे तर व्यवस्थेवरच्या रागाचे प्रतीक म्हणून पाहिले पाहिजे.

आज भारतात राजकीय स्थैर्य आहे, मजबूत नेतृत्व आहे, मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभ्या राहत आहेत, डिजिटल क्रांती झाली आहे. भारताची जागतिक प्रतिमा उंचावली आहे. पण त्याच वेळी बेकारी वाढली आहे. तरुणांना संधी आणि सन्मान हवा आहे. तरुण वर्ग सोशल मीडियामुळे जगाशी जोडलेला आहे. त्यामुळे त्याच्या अपेक्षाही बदलल्या आहेत. पूर्वी सामान्य लोक राजकारण्यांच्या भाषणांनी प्रभावित व्हायचे. आता ते त्यांच्या जुन्या व्हिडीओंची तुलना करतात. विरोधाभास शोधतात. ट्रोल करतात. कुणाला मान्य असो वा नसो, ही नवी मानसिकता आहे. त्यामुळे कॉक्रोच पार्टीचा आकस्मिक उदय हे डिजिटल युगातील सामाजिक अस्वस्थतेचे लक्षण मानले पाहिजे. त्याच्या मागे विशिष्ट लोक आहेत आणि त्यांचा उद्देश भारतात अनागोंदी माजविण्याचा आहे, असे सकृद्दर्शनी दिसते. त्याला कोणत्या देशातील फॉलोअर्स अधिक आहेत वगैरे विषयही आहेतच. भारतात अस्वस्थता निर्माण करण्यासाठी काही शक्ती सतत प्रयत्नशील असतात. त्यांचा यात हात आहे काय, हेही कालांतराने कळेल. सध्या एकच लक्षात ठेवले पाहिजे की, जसे हवा आल्याशिवाय पान हलत नाही, तसे नाराजी असल्याखेरीज लोक अशा आभासी पर्यायांना प्रतिसाद देत नसतात. लोकशाही ही कायम समाधानाची अवस्था नसतेच; ती सतत प्रश्न विचारणारी व असमाधानी असलेली व्यवस्था असते. आपली व्यवस्था संचालित करणारी मंडळी आणि तळागाळातल्या वास्तवाचा संबंध यात अंतर पडले आहे. वरच्या स्तरापर्यंत खरी नाराजी पोहोचत नाही. त्यांच्याभोवती डेटा दाखवणारे लोक असतात, पण समाजातील अस्वस्थता समजावून सांगणारे लोक नसतात. निवडणुकीच्या निकालावर लोकप्रियता किंवा अप्रियता ठरविणे सर्वांत सोपे आहे. निकाल काही ना काही लागणारच असतो. त्यामुळे धुसफूस संपत नाही. लोकांच्या मनातली चिड कायम राहते. ती चिड अशा एखाद्या प्रतीकात्मक उद्रेकात व्यक्त होते. कोणत्याही असंतोषाची सुरुवात छोटी असते. त्याकडे दुर्लक्ष केल्यास तो मोठा सामाजिक प्रवाह बनू शकतो. जेपी आंदोलन सुरुवातीला विद्यार्थ्यांचे आंदोलन होते. पुढे त्याने इंदिरा गांधींची सत्ता हादरवली. मंडलविरोधी आंदोलन सुरुवातीला काही शहरांपुरते होते. पुढे त्याने भारतीय राजकारणाची धाटणीच बदलली. निर्भया आंदोलनाने देशातील कायदे बदलले. लोकांना भावनिक विषय आवडतात. पण, त्याहून अधिक त्यांना हवे असते पुरेसे शुद्ध पाणी, चांगले शिक्षण, चांगली आरोग्य व्यवस्था. त्यांना अंतराळ मोहिमांचा अभिमान आहे; त्याच वेळी त्यांना रोजगाराची चिंता आहे. राष्ट्राभिमान आणि व्यवस्थेबद्दलचा राग अशा दोन्ही भावना एकाच वेळी समाजात अस्तित्वात राहू शकतात, हे राजकारण्यांना समजायला हवे. लोकशाहीत लोकभावना नेहमी एकरेषीय नसतात. त्या गुंतागुंतीच्या असतात. त्यांचे सरसकटीकरण केल्याने समस्या उद्‌भवतात. एखाद्या तरुणाला रोजगार मिळत नसेल, तर कितीही जाहिराती प्रसिद्ध करून त्याचा राग कमी होऊ शकत नाही. एखाद्या शेतकऱ्याला उत्पादनाचा योग्य भाव मिळत नसेल, तर नेत्यांच्या भाषणांनी त्याची अस्वस्थता कमी होत नाही. विविध प्रकारच्या असंतोषांना एक प्रतीक मिळते, तेव्हा झुरळ पार्टीसारखे काही तरी अकस्मात उद्‌भवते. आभासी जगतात तर हे सहज घडू शकते. कॉक्रोच पार्टी कदाचित उद्या नाहीशी होईल. कदाचित ती फक्त सोशल मीडिया ट्रेंडपुरती मर्यादित राहील. अशातलेच आणखी काही तरी उद्‌भवेल. आजची पिढी उपरोधात्मक बोलते. ती मीम्समधून राजकारण समजते. त्यामुळे झुरळ पार्टीसारखे नाव डिजिटल पिढीला 'रिबेलियस' वाटू शकते. ही समाजकारणाची नवी भाषा समजून घेतली पाहिजे. लोकशाहीत कधीही असंतोष पूर्णपणे नष्ट होत नाही. तो किती सन्मानाने ऐकला जातो, यावर व्यवस्था टिकत असते. त्यामुळे नव्या काळातील राजकारणात अशा डिजिटल विश्वातील अशा प्रतीकात्मक उद्रेकांना कमी लेखणे धोकादायक असते. सारांश असा की, झुरळ संपवावे लागतीलच. पण, घरापुढे तोरण लावून किंवा फक्त रोषणाई केल्याने घरातले झुरळ संपत नसतात. स्वयंपाकघर आणि माजघरही आवरत राहावे लागते. न्हाणीघरही स्वच्छ करावे लागते. झुरळ व्यवस्थेच्या विरुद्ध आहेत, एवढे म्हणून जबाबदारी आपली संपत नाही. घराच्या आरोग्यासाठी झुरळ तर संपवावे लागतीलच; सोबतच त्यांच्या वाढीची कारणेही संपवावी लागतील.

## प्रासंगिक

**श्यामकांत जहागीरदार**

# मंत्रिपरिषदेच्या बैठकीचा अन्वयार्थ

केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक सामान्यपणे दर आठवड्यात होत असते. मात्र, मंत्रिपरिषदेची बैठक ही वर्षातून एखाद-दोन वेळाच होत असते. कोणत्याही मंत्रिमंडळात मग ते राज्याचे असो की केंद्राचे, त्यात कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार आणि राज्यमंत्री असतात. मंत्रिमंडळाच्या दर आठवड्यात होणाऱ्या बैठकीला फक्त कॅबिनेट मंत्रीच उपस्थित राहू शकतात. राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार यांच्या खात्याचा विषय असेल तरच त्यांना मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपस्थित राहता येते. राज्यमंत्र्यांचा तर प्रश्न उद्‌भवत नाही. मंत्रिपरिषदेची बैठक असेल तर त्यात कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री स्वतंत्र प्रभारसोबत राज्यमंत्र्यांनाही उपस्थित राहात येते. मात्र, अशी संधी राज्यमंत्र्यांना वर्षातून एखाद-दोन वेळाच मिळत असते. ही सुवर्णसंधी गुरुवारी झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत सगळ्यांना मिळाली. २०२४ मध्ये मोदी सरकार सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आले. त्यानंतर झालेली मंत्रिपरिषदेची ही दुसरी बैठक होती. याआधीची बैठक जून २०२५ मध्ये झाली होती. यावेळची बैठक अनेक अर्थाने वेगळी म्हणायला पाहिजे. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक पातळीवर अस्थिर आणि अशांततेचे वातावरण आहे. जगात ऊर्जेचे, वायूचे आणि इंधनाचेही गंभीर असे संकट निर्माण झाले आहे. जगाचा गाडा डिझेल आणि पेट्रोलवरच ओढला जात असतो. डिझेल आणि पेट्रोलअभावी जग ठप्प होऊन जाते. महागाई वाढते. याचा फटका नोकरदार वर्गाच्या तुलनेत तळहातावरचे जीणे असलेल्या लोकांना जास्त बसतो.

विशेष म्हणजे या युद्धाचा फटका फक्त युद्धात उतरलेल्या इस्रायल आणि अमेरिकेसोबत फक्त इराण आणि आखातातील अमेरिकेच्या काही मित्रदेशांनाच बसला असे नाही, तर युद्धभूमीपासून काही हजार किमी दूर असलेल्या देशांनाही बसला आहे. या युद्धाशी काहीही देणेघेणे नसलेले देशही या युद्धामुळे भरडले गेले आहेत. त्यात भारताचाही समावेश आहे. त्यामुळेच काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधनाचा वापर जपून करण्याचे तसेच सोन्याची किमान वर्षभर तरी खरेदी न करण्याचे आवाहन केले. इंधनाच्या संभाव्य तुटवड्यामुळे काटकसर करण्याचे तसेच मंत्र्यांनी आणि सरकारी अधिकाऱ्यांनी परदेश दौऱ्यावर न जाण्याचे आवाहनही मोदी यांनी केले. मोदी यांनी एखादे आवाहन केले आणि देशातील जनतेने ते ऐकले नाही, असे होऊच शकत नाही. मोदींचे वाक्य हे देशवासीयांसाठी ब्रह्मवाक्य असते. मोदींवर देशातील जनतेचे जेवढे प्रेम आणि विश्वास आहे, तेवढे ते देशातील याआधीच्या पंतप्रधानांवर खचितच असेल. याबाबतीत मोदी यांची तुलना लालबहादूर शास्त्री यांच्याशी करता येईल. देशातील अन्नधान्याच्या दुष्काळामुळे शास्त्री यांनी तेव्हा देशवासीयांना एकवेळ भात न खाण्याचे आवाहन केले होते. त्याला देशातील जनतेने भरभरून प्रतिसाद दिला. काही जणांनी तर आयुष्यभर भात खाणे सोडून दिले. मोदी यांच्या सोने खरेदी न करण्याच्या तसेच परदेश दौऱ्यावर न जाण्याच्या आवाहनाला देशवासीयांनी भरभरून प्रतिसाद दिला. देशातील इंधनाच्या तसेच वायूच्या गरजेची पूर्तता करण्यासाठी मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर गेले. त्याठिकाणी करण्यात आलेल्या काही करारांमुळे देशाला ऊर्जेच्या आणि इंधनाच्या संकटातून काही प्रमाणात दिलासा मिळण्याचा मार्ग प्रशस्त झाला.

सेवातीर्थ या नवीन पंतप्रधान कार्यालयात केंद्रीय मंत्रिपरिषदेची बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित बैठक झाली. मोदी यांनी आपल्या पाच देशातील दौऱ्याची उपलब्धी या बैठकीत अपेक्षेप्रमाणे सांगितली. मोदींनी १२ वर्षांपूर्वी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. तेव्हापासून त्यांनी देशातील लोकांच्या सेवेत स्वतःला झोकून दिले. २०१४ च्या आधीही मुख्यमंत्री म्हणून मोदी गुजरातच्या जनतेची सेवा करीत होते. जनतेची सेवा करणे हे मोदी यांचे व्यसन झाले आहे. आपल्या या सेवाभावाची सांगड त्यांनी कर्तव्याशी घातली. मोदींसाठी सेवा आणि कर्तव्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हटल्या पाहिजे. जनतेप्रति असलेला सेवाभाव सतत जागृत राहावा म्हणून मोदी यांनी नवनिर्मित पंतप्रधान कार्यालयाचे नाव 'सेवातीर्थ' ठेवले. राजपथचे 'कर्तव्यपथ' केले. एवढेच नाही, तर सर्व मंत्रालयाचे जे संकुल उभारण्यात आले, त्याला 'कर्तव्य भवन' असे नाव दिले. कर्तव्य भवनात येणारे केंद्र सरकारी अधिकारी आणि कर्मचारी यांना जनतेप्रति असलेल्या आपल्या कर्तव्याची सतत जाणीव राहावी म्हणून मोदी यांनी या मंत्रालयाच्या इमारतींना कर्तव्य भवन एक, दोन आणि तीन अशी नावे दिली. कर्तव्य भवन इमारतींची ही साखळी दहा-बारापर्यंत जाणार आहे. जनतेला कमीत कमी त्रास होईल, असा मोदी यांचा प्रयत्न आणि आग्रह असतो. त्यामुळे मंत्र्यांनी त्यादृष्टीने आपल्या मंत्रालयाच्या कामांचे नियोजन करावे, असे आवाहन मोदी यांनी केले. मोदींची वागणूक आधी केले मग सांगितले, अशी असते. गोरगरिबांच्या समस्यांची आणि वेदनांची मोदी यांना जाणीव आहे. अतिशय संवेदनशील असे त्यांचे नेतृत्व आहे. आज दुसऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसणाऱ्यांची संख्या कमी होत आहे, तर अश्रू आणणाऱ्यांची संख्या वाढली आहे. मोदी यांचा याला अपवाद म्हणावा लागेल. समाजातील दलित, पीडित, शोषित, वंचित वर्गाचे दु:ख पाहून मोदी यांना वेदना होतात. त्यामुळे अशा वर्गाच्या डोळ्यातील अश्रू तर मोदी पुसतातच; पण आपल्या मंत्र्यांनीही तसेच वागावे, हा त्याचा आग्रस असतो. त्याचेच आवाहन त्यांनी मंत्रिपरिषदेच्या बैठकीत सर्व मंत्र्यांना केले. काही मंत्रालयाच्या कामगिरीचा आढावाही या बैठकीत घेण्यात आला. आपण आतापर्यंत जनतेच्या कल्याणासाठी काय केले, काय करणार आहे आणि आपल्या हातून काय सुटले याचा आढावा मंत्र्यांना सादर करावा लागला. हे आवश्यक होते. आपल्या कामावर कोणी नजर ठेवून आहे, याची जाणीव झाल्यावर संबंधित व्यक्ती मग ती सरकारी अधिकारी वा कर्मचारी असो की मंत्री ती अधिक जबाबदारीने वागते, काम करते. एकप्रकारे मोदी यांनी सर्व मंत्र्यांना आत्मपरीक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. मोदी स्वतःला पंतप्रधान नाही तर प्रधानसेवक म्हणवतात; त्यामुळे आपल्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी सेवक बनून जनतेची सेवा करावी, असा त्यांचा आग्रह असतो; तो चूक म्हणता येणार नाही.

मंत्रिपरिषदेच्या या बैठकीचा संबंध काही माध्यमांनी मंत्रिमंडळातील फेरबदलाशी जोडला आहे. मंत्रिमंडळाचा फेरबदल वा विस्तार आवश्यक असला, तरी तो कधी करावा आणि कसा करावा, हा पंतप्रधानांचा विशेषाधिकार आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी आपली राष्ट्रीय कार्यकारिणीही अद्याप जाहीर केली नाही. भाजपाची नवी कार्यकारिणी आणि मोदी मंत्रिमंडळाचा विस्तार याचा परस्पर संबंध नाकारता येणार नाही. मंत्रिमंडळातील काही जणांना पक्षसंघटनेत पाठविण्याची परंपरा आहे. त्यामुळे आधी मंत्रिमंडळाचा विस्तार की आधी भाजपाची राष्ट्रीय कार्यकारिणी याबाबत उत्सुकता राहणार आहे. जून २०२४ मध्ये मोदी मंत्रिमंडळाने शपथ घेतल्यानंतर आतापर्यंत मंत्रिमंडळात एकही फेरबदल झाला नाही. आपल्या मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्याचा वा त्याचे मूल्यमापन करण्याचा पंतप्रधान म्हणून मोदी यांना अधिकार आहे. त्यांच्या अपेक्षांना न उतरणाऱ्या मंत्र्यांच्या हातात ते नारळही देऊ शकतात आणि त्यांच्या जागेवर नवीन चेहऱ्यांचा समावेश करू शकतात. भाकरी जर वेळीच फिरवली नाही तर ती करपते. त्यामुळे माध्यमांनी यासंदर्भात आपल्या पतंग जरूर उडवाव्या, तो त्यांचा अधिकार आहे. मोदी यांचा प्रत्येक निर्णय हा देशातील लोकांच्या व्यापक कल्याणाच्या दृष्टीने घेतलेला असतो. मोदी यांची काम करण्याची आणि निर्णय घेण्याची एक पद्धत आहे. काही जणांना ती मान्य नसली, तरी देशातील लोकांनी ती मान्य केली आहे; मनापासून स्वीकारली आहे. विशेष म्हणजे मोदी यांच्या शैलीचा राष्ट्रीयच नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही देशाला फायदाही झाला आहे. देशातील प्रत्येक प्रश्नावर मोदी यांच्याकडे उत्तर आहे. त्यामुळेच 'मोदी है तो मुमकिन है' असे उगीच म्हटले जात नाही.

९८८१७१७८१७

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# गाजर गवत धोक्याचे जलपर्णीचे संकट मरणाचे!



भारताने अमेरिकेतून सन १९५५ मध्ये गव्हाची आयात केली होती. तेव्हा त्याच्यासोबत पार्थेनियम हिस्टेरोफोरस अर्थात गाजर गवत आले होते. भारतात त्याचे आगमन झाल्यावर ते खूपच वेगाने वाढले. म्हणूनच उपरोधिकपणे त्याला लोकांनी काँग्रेस गवत नाव ठेवले. आता गाजर गवत धोक्याचे ठरले असताना जलपर्णीचे संकट जलचर प्राण्यांच्या मृत्यूला आमंत्रण देत आहे. एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या पत्नीने इंग्लंड येथून जलपर्णी वनस्पती १८९० च्या दशकात आणली होती. तिने सर्वप्रथम पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे त्याची बगिचात लागवड केली. त्यानंतर येथील पोषक वातावरण तिला भावले अन् आज जलपर्णी प्रत्येकाच्या मानगुटीवर बसली आहे. जलपर्णीचा विस्तार कसा झपाट्याने होतो, याचे प्रत्यक्ष उदाहरण पाहायचे झाल्यास नागपुरातील जनतेने अंबाझरी, कोराडी तलावाची पाहणी करावी. पुण्याची मुळा-मुठा नदी, ठाण्याची उल्हास नदी यासह महाराष्ट्रातील बहुतांश शहरातील तलाव, नद्यांना जलपर्णीने आपल्या कवेत घेतले आहे. गाजर गवताची खासियत म्हणजे ते अमेरिकेच्या मेक्सिकोतून भारतात आल्यावर सर्वप्रथम दुर्दैवाने पुण्यातच आढळले होते. दरम्यान, जलपर्णी ही वायुवेगाने वाढणारी वनस्पती जलचर प्राण्यांसाठी कर्दनकाळ ठरत आहे. तिचे साम्राज्य असेच वाढत राहिल्यास भविष्यात पूरक अन्न म्हणून आपण ज्या मासोळ्यांकडे पाहतो त्या नामशेष होतील. हो, ही बाब शंभर टक्के सत्य असून जलपर्णी जेव्हा वायुवेगाने वाढते तेव्हा पाण्यावर आच्छादन तयार करते. ज्यामुळे सूर्यप्रकाश आणि ऑक्सिजन आत जाऊ शकत नाही. परिणामी जलचर प्राणी तडफडून मरतात. आता सर्वत्र जलपर्णीच राहील तर मासोळ्या, कासव, खेकडे, मगरांसह लाखो जलचर प्राण्यांनी जगावे तरी कसे, हा प्रश्न उद्‌भवला आहे. भीतिदायक म्हणजे जलपर्णी केवळ नागपुरातच नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात तिचा वायुवेगाने विस्तार करीत आहे. जलपर्णी ही दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील वनस्पती आहे. सांडपाण्यातील नायट्रोजन, फॉस्फरसमुळे जलपर्णीचा विळखा वाढला आहे. जलपर्णीसाठी सांडपाणी आणि त्यातील मानवी मलमूत्र, साबण पोषक असतात. जलपर्णीचे बीज तयार झाल्यावर ते चिखलात ३० वर्षांपर्यंत टिकून राहते. जलपर्णी दाट प्रमाणात पाण्यावर आच्छादन तयार करते. यामुळे मासोळ्यांना लागणारे अन्न मिळेनासे झाल्याने जलचर प्राणी घटतात. नदीचा प्रवाह खुंटतो. डासांचा प्रादुर्भाव वाढत जातो. डास वाढल्याने मलेरिया, हत्तीपाय, डेंग्यूसारखे आजार मानवासाठी कर्दनकाळ ठरतात. हे धोके असताना काही फायदेही आहेत. त्यानुसार जलपर्णीचा उपयोग कागद तयार करण्यासाठी होऊ शकतो. त्यापासून सेंद्रिय खतही तयार होते. शिवाय त्यापासून चटया, पिशव्या, विविध गृहोपयोगी शोभेच्या वस्तू बनविता येतात. जलपर्णीचा उपयोग बायोगॅस निर्मितीसाठी होऊ शकतो. इराण युद्धामुळे भारतात एलपीजीचा तुटवडा कायम असल्याने बायोगॅसकरिता शासनाने पुढाकार घ्यायला हवा. आता लाभ आणि तोटे समोर आल्याने यासंदर्भात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली जलपर्णीने घातलेला मृत्यूचा वेढा आपण संधीत परावर्तित करू शकतो. याकरिताच आता शासनाने संकटातूनही संधी शोधून जलपर्णीचा उपयोग करून घ्यायला हवा. सरकारला शक्य नसल्यास खाजगी कंपन्यांना तिचा उपयोग करण्याची परवानगी द्यायला हवी. ज्या पद्धतीने सापाच्या विषापासूनच औषध तयार करून मानवाचे संरक्षण केले जाते. सापाचे जीवघेणे विष उपयोगी पडू शकते, मग त्याच धर्तीवर जलपर्णीचा सदुपयोग वाढवायलाच हवा. कुठल्याही गोष्टीला विरोध करून लाभ होत नसतात. त्यातील चांगले वाईट गुण हेरून त्यानुसार दिशा ठरवावी लागते. पुढील काळात हीच दिशा ठरविल्यास जलपर्णीचा विळखा लाभदायक ठरेल, जेव्हा चारही बाजूने जलपर्णीची मागणी वाढेल तेव्हा ती वनस्पती आपोआपच संपुष्टात येईल. त्यापूर्वी नदी, नाले आणि तलावात सोडले जाणारे पाणी स्वच्छ असायला हवे. सांडपाणी हे जलपर्णीसाठी पोषक आहे. पण शुद्ध पाण्यात जलपर्णी वाढतच नाही. समजा आपण सांडपाणी तलावात आणि नद्यांमध्ये सोडलेच नाही तर त्याही स्वच्छ राहतील. पर्यायाने जलपर्णी वाढणार नाही. शेवटी, आपण निसर्गाप्रति काही देणे लागतो ना, त्यानुसार जलपर्णीच्या भीतिपोटी कृतीही आपल्या हातून घडेल. गाजर गवत लोकाश्रयातून कमी झाले; तद्वतच जलपर्णीचाही विळखा आपण सहजतेने संपुष्टात आणू शकतो, याची खात्री आहे. कारण जेव्हा केव्हा या भारतात लोकचळवळ सुरू झाली, तेव्हा येथील समस्यांनीच पळ काढला आहे.

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# देशहितापेक्षा 'मोदीद्वेष' मोठा!



मध्यपूर्वेतील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे संपूर्ण जग आर्थिक अस्थिरतेच्या उंबरठ्यावर उभे आहे. कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठे चढ-उतार सुरू आहेत. अशा वेळी प्रत्येक देश आपली अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा आणि महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी सावध पावले उचलत आहे. त्या-त्या देशातील जनतादेखील आपल्या सरकारला सहकार्य करत आहे. भारतात मात्र काही विरोधी पक्ष आणि त्यांची विचारसरणी चालवणारी माध्यमे या गंभीर परिस्थितीकडे केवळ राजकीय संधी म्हणून पाहताना दिसत आहेत. आज विरोधक ज्या पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करीत आहेत, ते पाहता जणू इंडिया आघाडीचे सरकार सत्तेत असते तर देशात पेट्रोल, डिझेल आणि गॅस मोफत मिळाले असते, असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. काही जण तर अशा थाटात बोलत आहेत की मनमोहन सिंह किंवा राहुल गांधी पंतप्रधान असते तर पेट्रोल पाण्याच्या भावात मिळाले असते. प्रत्यक्षात मनमोहन सिंह यांच्या काळात पेट्रोलचे दर ९० टक्के तर डिझेलचे दर ९६ टक्के वाढले होते, तर मोदी सरकारच्या ९ वर्षांच्या काळात ही वाढ अनुक्रमे ३३ टक्के आणि ७४ टक्के राहिली आहे. गॅस सिलेंडरच्या बाबतीत, २०१४ मध्ये विना-सबसिडी सिलेंडरचा दर १ हजार २४१ रुपये या ऐतिहासिक उच्चांकावर होता; जो २०२४ मध्ये ८०३ आणि २०२६ च्या सुरुवातीला ९१३ च्या आसपास आहे. महागाई नियंत्रणासाठी युपीए सरकारने 'ऑईल बाँड्स'द्वारे १.३४ लाख कोटींचे कर्ज घेतले होते; ज्यामुळे तत्कालीन किमती कृत्रिमरीत्या कमी ठेवल्या गेल्या, परंतु शेवटी त्याचा भार तिजोरीवर पडला. तो पुढे आलेल्या सरकारवर भुर्दंड ठरला. यांचीच उष्टी सावडताना या सरकारची कसरत होत आहे आणि ज्यांनी घाण करून ठेवली तेच महागाई महागाई म्हणून ऊर बडवत आहेत. याला चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात.

वास्तव आणि इतिहास या दोन्ही गोष्टी विरोधकांच्या या खोट्या दाव्यांना पूर्णपणे उघडे पाडतात. देश विसरलेला नाही की काँग्रेसच्या काळात महागाईने कसा उच्चांक गाठला होता. मनमोहन सिंह सरकारच्या काळात पेट्रोल-डिझेलच्या किमती सातत्याने वाढत होत्या. घरगुती गॅस सिलेंडर सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात होता. डाळींपासून इंधनापर्यंत प्रत्येक गोष्टीचे दर वाढले होते. त्यावेळी अर्थशास्त्रज्ञ म्हणून गौरविले जाणारे मनमोहन सिंह महागाई रोखण्यात पूर्णपणे अपयशी ठरले होते. देशाच्या अर्थव्यवस्थेवर भ्रष्टाचार, धोरणात्मक अकार्यक्षमता आणि निर्णयहीनतेचे सावट होते. आज तेच लोक मोदी सरकारला अर्थशास्त्र शिकवण्याचा प्रयत्न करीत आहेत, हीच सर्वात मोठी विसंगती आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने कोरोना महामारी, रशिया-युक्रेन युद्ध, जागतिक मंदी आणि आता मध्यपूर्वेतील संघर्ष अशा अनेक संकटांना सामोरे जाताना तुलनेने स्थिर अर्थव्यवस्था टिकवून ठेवली. जगातील अनेक देशांमध्ये इंधन दरांनी विक्रमी पातळी गाठली, महागाईने जनतेचे कंबरडे मोडले; पण भारतात परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने वेळोवेळी उत्पादन शुल्क कमी केले, गरिबांना मोफत धान्य दिले, उज्ज्वला योजनेतून गॅस अनुदान दिले आणि पुरवठा साखळी मजबूत ठेवली. विरोधक जाणीवपूर्वक एक गोष्ट लपवतात, पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये राज्य सरकारांच्या करांचाही मोठा वाटा असतो. अनेक विरोधकशासित राज्यांनी व्हॅट कमी करण्यास नकार दिला, पण या प्रश्नांवर विरोधक गप्प राहतात. कारण त्यांचे लक्ष्य जनतेचे हित नाही, तर फक्त मोदींवर टीका करणे एवढेच आहे.

राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचे इतर नेते नेहमीच भावनिक आणि अवास्तव आश्वासने देण्यात पुढे असतात. कधी मोफत वीज, कधी अमर्याद सवलती, कधी थेट रोख मदतीच्या घोषणा पण त्या योजनांसाठी पैसा कुठून आणणार, अर्थव्यवस्थेवर त्याचा काय परिणाम होणार, याचे उत्तर त्यांच्याकडे नसते. देश चालवणे आणि सभेत घोषणाबाजी करणे यात जमीन-अस्मानाचा फरक असतो. मोदी सरकारने गेल्या दशकात भारताला जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवले. एक्सप्रेसवे, बंदरे, विमानतळ, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, संरक्षण उत्पादन, हरित ऊर्जा आणि पायाभूत सुविधा यामध्ये अभूतपूर्व गुंतवणूक झाली. भारताची जागतिक प्रतिमा मजबूत झाली. आज जगातील महासत्ता भारताकडे विश्वासाने पाहतात. हे सर्व स्थिर नेतृत्व, स्पष्ट धोरण आणि कठोर निर्णयक्षमतेमुळे शक्य झाले आहे. युद्धकाळात कोणतेही जबाबदार सरकार दीर्घकालीन आर्थिक परिणामांचा विचार करून निर्णय घेत असते. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढत असताना देशाच्या महसुलाचा, आयातीच्या खर्चाचा, चलनाच्या स्थैर्याचा आणि महागाईच्या दबावाचा विचार करावा लागतो. अशा वेळी केवळ राजकीय लोकप्रियतेसाठी अवास्तव निर्णय घेणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेशी खेळ करण्यासारखे आहे; पण विरोधकांना या वास्तवाशी काही देणेघेणे नाही. आज देशाला सकारात्मक आणि जबाबदार विरोधकांची गरज आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे की, विरोधक प्रत्येक मुद्यावर केवळ नकारात्मक राजकारण करीत आहेत. पंतप्रधान परदेश दौऱ्यावर गेले तरी टीका, भारताचे जागतिक संबंध मजबूत झाले तरी टीका, अर्थव्यवस्था वाढली तरी टीका आणि संकटाच्या काळात सावध भूमिका घेतली तरी टीका. हा विरोध नाही तर आंधळा 'मोदीद्वेष' आहे.

जनतेलाही आता या दुटप्पी राजकारणाचा कंटाळा आला आहे. कारण लोकांना माहिती आहे की, कठीण काळात मजबूत नेतृत्व कोण देऊ शकते. भावनिक भाषणे, खोटे आश्वासने आणि सतत भीतीचे वातावरण निर्माण करून देश चालत नाही. त्यासाठी निर्णयक्षमता, जागतिक समज आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व लागते. आज भारत ऊर्जा सुरक्षेसाठी पर्यायी उपायांवर काम करीत आहे. हरित हायड्रोजन मिशन, इलेक्ट्रिक वाहन धोरण, सौर ऊर्जा, इथेनॉल मिश्रण यांसारख्या योजनांद्वारे भविष्यातील इंधन संकटांपासून देशाला सुरक्षित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण विरोधकांना या दीर्घकालीन योजनांपेक्षा फक्त तात्कालिक राजकीय फायदा महत्त्वाचा वाटतो. देश संकटात असताना जनतेला संभ्रमात टाकणे, चुकीची माहिती पसरवणे आणि अवास्तव तुलना करून सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न करणे हे जबाबदार राजकारणाचे लक्षण नाही. भारताची जनता आता अधिक जागरूक झाली आहे. ती घोषणांपेक्षा काम पाहते, प्रचारापेक्षा परिणाम पाहते आणि भावनिक नाटकांपेक्षा स्थिर नेतृत्वावर विश्वास ठेवते. म्हणूनच आज विरोधकांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. प्रत्येक राष्ट्रीय प्रश्नावर राजकीय फायदा शोधण्याऐवजी देशहिताला प्राधान्य दिले पाहिजे. अन्यथा जनतेच्या न्यायालयात त्यांना नकारच मिळत राहील.

९२७०३३३८८६

## भूतकाळाच्या पलीकडे...

कधी कधी शांत बसलं की मन नकळत मागच्या वाटांवर फिरून येत आणि आपण स्वतःलाच समजावतो की भूतकाळाचा विचार करू नये. कारण भूतकाळ हा वर्तमानकाळासाठी त्रासदायक होऊ शकतो. मग विचार केल्यावर जाणवतं की, भूतकाळातल्या सर्वच गोष्टी वाईट होत्या का? आपल्या मनाची ती सवय झाली आहे की, आपण वाईट गोष्टींचा पहिले विचार करतो, कधीतरी आयुष्यातल्या चांगल्या गोष्टी आठवून बघा. आपण खूप चांगलंही केलं आहे, मेहनत केली आहे, मुलांवर चांगले संस्कार केले, त्यांची आणि कुटुंबाची जबाबदारी पेलली, प्रसंगी अपमान, मतभेद यालाही सामोरे गेलो, वेळ पडली तर संकटांना तोंड कसे द्यायचे हेही शिकलो. त्यातही एक गंमत आहे, प्रत्येकाला वाटतं, हे माझ्याच वाट्याला का आलं? माझंच आयुष्य संघर्षाचं झालं, मीच खूप मेहनत केली आहे. पण असं नसत. तुम्ही माणूस म्हणून जन्माला आले आहात. या सगळ्या गोष्टी सगळ्यांच्याच वाट्याला येतात; आपण फक्त आपल्यापुरता या गोष्टींचा विचार करतो, दुसऱ्याचा विचार आपण करीत नाही. हेच कशाला, कधी जेव्हा मित्र-मैत्रिणींमध्ये किंवा नातलगांकडे जातो तेव्हा अनेकदा गप्पांचा विषय आनंदापेक्षा संघर्षाभोवतीच फिरताना दिसतो. मी कसा संघर्ष केला, किती दुःख झेलले, किती कष्टामधून गेलो, सगळे जण यावर भरभरून बोलत असतात, पण कधी एकांतात बसून विचार करा, तुमच्या लक्षात येईल की, या गोष्टी तुम्ही एकट्यांनी सोसल्या नाहीत; प्रत्येक जण यातून गेलेला आहे. मनात कृतज्ञता आणि चेहऱ्यावर समाधान ठेवून जगायला शिकलो तर आयुष्य नक्कीच सुंदर आणि सुखद होईल.

**सरिता पुराडभट**/ नागपूर

## वाचक पत्रे

### विकसित भारताच्या स्वप्नाला ऊर्जाबळ

'ऊर्जासंकट पेलणारे ऊर्जाबळ!' हे संपादकीय पंतप्रधानांच्या नॉर्डिक देशांच्या परिषदेतील उपस्थितीचे फलित समर्पक शब्दांत सांगणारे आहे. ऊर्जाबचतीचे आवाहन करून लगेच स्वतः परदेश दौऱ्यावर जाण्याविषयी विरोधी पक्षांनी केलेल्या टीकेला उत्तर देण्यापेक्षा 'आधी केले मग सांगितले' या उक्तीनुसार संरक्षण सामग्री, दुर्मिळ खनिजेविषयक करार, हरित तंत्रज्ञान, स्वच्छ ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, आरोग्य व डिजिटल सेवा या सर्वच काळानुरूप महत्त्वाच्या गरजांच्या बाबतीत सहकार्याची मोट बांधण्याचं अत्यंत महत्त्वाचं काम केलं गेलं आहे. विरोधी पक्षनेते परदेश दौरे व्यक्तिगत कार्यक्रमांसाठी करतात आणि परदेशी जाऊन आपल्याच देशाविषयी गरळ ओकतात, हे कटू सत्य आहे. त्यापेक्षा पंतप्रधानांच्या एकाच दौऱ्यात आपल्या देशात सुमारे साडेतीन लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करण्याचे करार आणि सेमीकंडक्टर फॅब्रिकेशनसारख्या प्रकल्पांच्या उभारणीची आश्वासनं आदी गोष्टींची पायाभरणी होत असेल तर अशा सर्वंकष प्रयत्नांना सर्वपक्षीय नेत्यांनी विद्यमान सरकारला पाठबळ द्यायला हवं. एका विरोधी पक्षाचे बुजुर्ग नेते याबाबतीत 'पंतप्रधान भारताबाहेर देशाची प्रतिष्ठा जपतात' असं म्हणत असतील तर अशा समजूतदारपणाच्या ऊर्जेचं बळच विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करायला मदत करेल.

**श्रीपाद कुलकर्णी**/बिबवेवाडी-पुणे ९४२२५१५६४०

### ऑनलाईन पद्धत रुग्णहिताची

ऑनलाईन औषध विकण्याच्या पद्धतीवर औषध विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी बंद पाळून निषेध नोंदविला आहे. या पद्धतीत रुग्णांना घरी औषधे मिळत असतात तसेच ऑनलाईन औषधावर ३०-४० टक्के सूट मिळते. दुकानदार अशी सवलत देत नाहीत. हॉस्पिटलमधील औषध दुकानदारही कोणतीही सवलत देत नाहीत. गेली १० वर्षे मी ऑनलाईन औषधे मागवत आहेश परंतु एकदाही बनावट औषधे मिळालेली नाहीत. हल्ली औषधांच्या किमतीमध्ये भरमसाट वाढ झालेली आहे. काही ऑनलाईन विक्रेते ५१ टक्क्यांपर्यंत सवलत देण्यास तयार आहेत. औषध त्याच कंपनीचे आहे, याची खात्री ग्राहक गुगलवरून तसेच आपल्या डॉक्टरांना दाखवून स्वतःच करू शकतात. ग्राहकहिताची ऑनलाईन औषध विक्रीची पद्धत बंद करू नये.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे

### पिसाळलेल्या श्वानांचा हैदोस

रिसोड शहर व तालुक्यातील बिबखेडा येथे मोकाट श्वानांनी २० मे रोजी हैदोस घालत तब्बल २५ जणांना चावा घेतल्याची धक्कादायक बातमी वाचण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाने पिसाळलेल्या, अत्यंत आजारी किंवा मानवी जीवनास धोकादायक भटक्या श्वानांबाबत दयामरणाचा पर्याय वापरण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्देश दिल्याच्या पृष्ठभूमीवर ही घटना चर्चेचा विषय ठरत आहे. विकसित देशांत बेवारस व भटकी श्वाने आढळत नाहीत. याबाबत तेथील नियम अत्यंत कठोर आहेत. आपल्या देशातही असे नियम लावावयास हरकत नाही.

**शशिकांत दलाल**/नागपूर/९८२२३६५१९०

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**

**विविध अभियांत्रिकी कामे**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर हे खालील कामांसाठी कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवित आहेत. निविदा सूचना क्रमांक : 07-2026-SrDENC, दिनांक: 21/05/2026 कामाचे नाव: आरडीएसओ/लखनऊच्या फेब्रुवारी-2023 च्या अद्ययावत तपशिलानुसार आणि नवीन सुधारणांसह 65 मिमी आकाराचा मशीनद्वारे क्रश केलेला दगडी गिट्टीचा रेल्वे मैदानावर पुरवठा करणे आणि ढीग रचणे; यामध्ये रॉयल्टी आणि शुल्क इत्यादींचा समावेश आहे, तसेच उपविभागीय रेल्वे अभियंता यांच्या सूचनेनुसार केत्तूर डेपो येथे रेल्वे हॉपर्स/वॅगन्स इत्यादींमध्ये खडी भरणे. एकूण प्रमाण 50,000 घनमीटर आहे. कामाची अंदाजीत किंमत रु. 5,39,00,000/- असून बयाणा रक्कम रु. 10,78,000/- आहे. हे काम पूर्ण करण्याचा कालावधी 18 महिने असून देखभाल कालावधी लागू नाही. निविदा सूचना क्रमांक: 08-2026-SrDENC, दिनांक: 21.05.2026 कामाचे नाव: वरिष्ठ विभागीय अभियंता (सी) सोलापूर विभागांतर्गत विविध ठिकाणी एमएफडब्ल्यूपी द्वारे 52 किलो आणि 60 किलो रेल्वे रुळांचे फ्लॅश बट वेल्डिंग करणे. कामाची अंदाजीत किंमत रक्कम रु. 3,19,34,163.40 असून बयाणा रक्कम रु. 6,38,700/- आहे. हे काम पूर्ण करण्याचा कालावधी 12 महिने असून देखभाल कालावधी लागू नाही. निविदा ऑनलाइन अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ www.ireps.gov.in या संकेतस्थळावर टेंडर 07-2026 साठी दिनांक 05/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत आणि टेंडर 08-2026 साठी दिनांक 12/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत आहे. ही निविदा याच संकेतस्थळावर अनुक्रमे दिनांक 05/06/2026 आणि 12/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजता उघडण्यात येईल. संभाव्य निविदाधारकांनी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धीपत्रक पाहण्यासाठी वेळोवेळी www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्यावी.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर**

AK/Sur-33

**सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.**

---

**रोशन प्रशाला, अक्कलकोट** रोड, सोलापूर या शाळेसाठी शालेय पोषण आहार योजनेंतर्गत मध्यान्ह भोजन सन २०२६-२७ साठी पुरवठा करण्याकरीता इच्छुक स्वयंसेवी संस्था/ सेवाभावी संस्था/ महिला मंडळे/ बचतगट यांच्याकडून निविदा मागवण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपल्या निविदा मुख्याध्यापकांकडे समक्ष सादर करावी.

---

**श्रीदत्त विद्या मंदिर, अक्कलकोट रोड, सोलापूर** या शाळेसाठी शालेय पोषण आहार योजनेंतर्गत मध्यान्ह भोजन सन २०२६-२७ साठी पुरवठा करण्याकरीता इच्छुक स्वयंसेवी संस्था/ सेवाभावी संस्था/ महिला मंडळे/ बचतगट यांच्याकडून निविदा मागवण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपल्या निविदा मुख्याध्यापकांकडे समक्ष सादर करावी.

---

**अलहाज ए.डी. शेख उर्दू हायस्कूल, अक्कलकोट** रोड, सोलापूर या शाळेसाठी शालेय पोषण आहार योजनेंतर्गत मध्यान्ह भोजन सन २०२६-२७ साठी पुरवठा करण्याकरीता इच्छुक स्वयंसेवी संस्था / सेवाभावी संस्था / महिला मंडळे / बचतगट यांच्याकडून निविदा मागवण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपल्या निविदा मुख्याध्यापकांकडे समक्ष सादर करावी.

---

## चौकशीची जाहीर नोटीस

**अर्ज क्रमांक** : किरकोळ अर्ज क्रमांक ६०६/२०२५
**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव** : श्री मुक्तेश्वर मंदिर, प. मंगळवार पेठ, सोलापूर
**सार्वजनिक व्यवस्थेचा नोंदणी क्रमांक** : ए-४७० (सोलापूर)
**अर्जदार** : श्री. प्रदिप रेवणसिध्द काटकर, रा. १५१/२५, रविवार पेठ, कन्ना चौक, सोलापूर

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपआयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर हे वर नमूद केलेल्या अर्जात संस्थेच्या परिशिष्ट-१ पुनर्लेखन बाबत चौकशी करणार आहेत.

न्यासाचे परिशिष्ट-१ फाटलेले असल्यामुळे परिशिष्ट-१ चे पुनर्लेखन करण्यात येऊन ते तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे असा विनंती अर्ज अर्जदार यांनी सादर केलेला आहे. तरी सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कार्यालयाकडे उपलब्ध असलेले अभिलेखा व अर्जदारांकडून प्राप्त होणारे कागदपत्रांना अंतीम प्रमाण मानून परिशिष्ट-१ चे पुनर्लेखन करण्यात येणार आहे. तरी याबाबत कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी अथवा समक्ष येवून कैफियत/हरकत दाखल करावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत/कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपआयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दि. २१/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मिल्लत नगर येथील मिळकत यांसी जुना स.नं.३२६/१, नवीन स.नं. ११८/१ यापैकी:

१) **प्लॉट नं. ३४** याचे क्षेत्र २७८.७० चौ.मी., यांसी चतु:सिमा:- पूर्वेस - प्लॉट नं. ३३, पश्चिमेस - प्लॉट नं. ३५, दक्षिणेस - प्लॉट नं. ३२७, उत्तरेस - लेआऊट रस्ता असे आहे.
२) **प्लॉट नं. ३५** याचे क्षेत्र २७८.७० चौ.मी., यांसी चतु:सिमा :- पूर्वेस - प्लॉट नं. ३४, पश्चिमेस - प्लॉट नं. ३६, दक्षिणेस - स.नं. ३२७, उत्तरेस - रस्ता असे आहे.
३) **प्लॉट नं. ३६** याचे क्षेत्र २७८.७० चौ.मी., यांसी चतु:सिमा :- पूर्वेस - प्लॉट नं. ३५, पश्चिमेस - प्लॉट नं. ३७, दक्षिणेस - स.नं. ३२७, उत्तरेस - रस्ता असे आहे.

वर नमुद मिळकतीबाबतचे खरेदीखत अनुक्रमे दस्त क्र. ४४६/२०००, दि. ०२/०२/२००० व दस्त क्र. १३३८/१९९३, दि. ०३/०४/१९९३ आणि दस्त क्र. १३३७/१९९३, दि.१३/०४/१९९३ हे मुळ खरेदीखत अनावधानाने गहाळ झाले आहे. त्यामुळे आमचे अशिल अहमद शौकत शेख यांनी विजापूर नाका पोलीस स्टेशन, सोलापूर शहर या पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रार दिली असून त्याचे गहाळ ऑनलाईन रजिस्ट्रेशन गहाळ दि. ०९/०५/२०२६ रोजी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहू मिळकत आमचे अशिल हे विक्री करणार आहेत. तरी सदरहू मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिन, बक्षीस, बोजा, पोटगी, कब्जा वगैरे असल्यास त्यांनी ७ दिवसांच्या आत खाली नमुद आमच्या पत्यावर त्यांचे हक्काचे पृष्ठयर्थ कागदपत्रे आणून द्यावीत. जर कोणी मुदतीत हरकत घेतली नाही तर सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदर मिळकती विक्री करतील, तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २२/०५/२०२६.

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. एम.ए. नालवार**
**बी.ए., एल.एल.बी., (स्पे.) जी.डी.सी. ॲन्ड ए.**
**गाळा नं. ४, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, सिध्देश्वर पेठ, सोलापूर, मो. ९१७५४००४४४, ७०२०४०४४४८**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी बार्शी शहर व तालुका तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील ग.नं.५३७/१ पैकी प्लॉट नं.१५ क्षेत्र २१४.५० चौ.मी. यासी चतु:सिमा :- पुर्वेस - ९ मी. रुंदीचा रोड, दक्षिणेस - प्लॉट नं.१६, पश्चिमेस - प्लॉट नं.१४, उत्तरेस - १२ मी. रुंदीचा रोड येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक जागा आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे वापराचे हक्कासह जागा.

वर क.१ मध्ये नमूद मिळकत ही विजयशाला परमेश्वर जाधवर, रा. चुंब, ता. बार्शी यांचे मालकीची आहे. सदर विजयशाला परमेश्वर जाधवर यांनी वर नमूद मिळकत घर बांधकामासाठी आमचे अशिल सांगली अर्बन को. ऑप बँक लि., शाखा बार्शी यांचेकडे कर्ज मागणी केली असून त्याना रुपये ३१,९०,०००/- चे कर्ज आमचे अशिल बँकेने मंजूर केलेले आहे. सदर कर्जाकरीता विजयशाला परमेश्वर जाधवर यांनी कर्जदार म्हणून त्यांची वर नमूद मिळकत आमचे अशिल बँकेचे हक्कात गहाण तारण देण्याचे मान्य केले असून तसा दस्त नोंदवून देणेचेही त्यांनी कबुल केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेचा भरवसा त्यांनी आमचे अशिल बँकेस दिलेला असून सदर मिळकत अन्य कोणत्याही बँकेकडे अगर वित्तीय संस्थेकडे गहाण तारण दिलेली नाही, कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ठ नाहीत अशीही ग्वाही त्यांनी दिलेली आहे.

तरी या जाहीर नोटीसीने सर्वत्रास कळविण्यात येते की, वर नमूद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा व हस्तांतर अगर कर्जबोजाचे हक्क अधिकार असल्यास संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसांत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येवून आमची खातरजमा करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये व आमचे अशिलाचे हक्काची सर्वत्रास जाणीव व्हावी म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. २२/०५/२०२६

**सही/-**
**श्री. प्रसाद जे. कुलकर्णी,**
**बी.एस.एल., एलएल.बी.**
**लक्ष्मीनृसिंह, कासारवाडी रोड, सिध्देश्वर नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिलातर्फे पॅनल ॲडव्होकेट)**

---

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. ८८/२०२६

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. शफिक मो. जमीन मोमीन - अर्जदार**
रा. महेदी नगर, बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील महमद ए. लांडगे)
विरुद्ध
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी - गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. महेदी नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०७ एप्रिल १९८८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०७ एप्रिल १९८८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी ता. बार्शी, जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १९ मे २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **पासपोर्टचे वर्णन** : पासपोर्ट क्र. P3823093 हे आमचे अशिल अहमद शौकत शेख यांचे नावे आहे.

वर नमुद पासपोर्टची मुळ प्रत अनावधानाने गहाळ झाले आहे. त्यामुळे आमचे अशिल अहमद शौकत शेख यांनी विजापूर नाका पोलिस स्टेशन, सोलापूर शहर या पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रार दिली असून त्याचे गहाळ ऑनलाईन रजिस्ट्रेशन गहाळ दि. ०९/०५/२०२६ रोजी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहू पासपोर्ट कोणालाही मिळाल्यास ते आमचे अशिल अहमद शौकत शेख यांचे मो.नं. ९७३०३००४७३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावे अथवा खाली नमुद आमच्या पत्यावर त्यांचे हक्काचे मुळ पासपोर्टची प्रत आणून द्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २२/०५/२०२६.

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. एम.ए. नालवार**
**बी.ए., एल.एल.बी., (स्पे.) जी.डी.सी. ॲन्ड ए.**
**गाळा नं. ४, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, सिध्देश्वर पेठ, सोलापूर, मो. ९१७५४००४४४, ७०२०४०४४४८**

---

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. २५/२०२६

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. इलाई लतीफ शेख - अर्जदार**
रा. देशमुख प्लॉट, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील महमद ए. लांडगे)
विरुद्ध
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी - गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. देशमुख प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २८ मे १९९० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २८ मे १९९० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

---

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. ९०/२०२६

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. रेश्मा इसाक मुल्ला - अर्जदार**
रा. महेदी नगर, परंडा रोड बार्शी, ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील महमद ए. लांडगे)
विरुद्ध
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी - गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. महेदी नगर, परंडा रोड बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०२ जुन १९८९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ जुन १९८९ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी ता. बार्शी, जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १९ मे २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

---

## चौकशीची जाहीर नोटीस

**अर्ज क्रमांक** : किरकोळ अर्ज क्रमांक ६०५/२०२५
**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव** : साळुबाई विठोबाचे देऊळ, सोलापूर.
**सार्वजनिक व्यवस्थेचा नोंदणी क्रमांक** : ए-४०९ (सोलापूर)
**अर्जदार** : श्री.प्रदिप रेवणसिध्द काटकर, रा.१५१/२५,रविवार पेठ, कन्ना चौक, सोलापूर

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपआयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर हे वर नमूद केलेल्या अर्जात संस्थेच्या परिशिष्ट-१ पुनर्लेखन बाबत चौकशी करणार आहेत.

न्यासाचे परिशिष्ट-१ फाटलेले असल्यामुळे परिशिष्ट-१ चे पुनर्लेखन करण्यात येऊन ते तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे असा विनंती अर्ज अर्जदार यांनी सादर केलेला आहे. तरी सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कार्यालयाकडे उपलब्ध असलेले अभिलेखा व अर्जदारांकडून प्राप्त होणारे कागदपत्रांना अंतिम प्रमाण मानून परिशिष्ट-१ चे पुनर्लेखन करण्यात येणार आहे. तरी याबाबत कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी अथवा समक्ष येऊन कैफियत/हरकत दाखल करावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत / कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपआयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दि. २१/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर**

---

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः उपळाई (ठों.), ता. बार्शी, जि. सोलापूर व आसपासचे लोकांना आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व नोटीस देण्यास सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे - उपळाई (ठों.) ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ४५४ याचा जुना गट नं. ६१७ याचे एकूण क्षेत्र ०२ हे, ०३ आर, आकार ०० रू. ७५ पै. यापैकी पश्चिम बाजूचे क्षेत्र ०० हे. ८१.५ आर, आकार ०० रू. ३० पै. यापैकी पश्चिम पुर्व बाजूची जमीन याचे क्षेत्र ०० हे. २५ आर, आकार ०० रू. ०८ पै. यांसी चतु:सिमा :- पुर्वेस - सदर ग.नं. पैकी बाळू पांडूरंग गेळे यांची जमीन, दक्षिणेस - बार्शी-परंडा रस्ता, पश्चिमेस सदर ग.नं. पैकी मुळ मालकाची उर्वरीत जमीन व उत्तरेस - गट नं. ४५७/१ पैकी श्रीनिवास सुर्यकांत पतंगे, विजय शंकर पोफळे यांची जमीन, येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक शेतजमीन मिळकत आतील सर्व झाड, झडुपे, तदंगभूत वस्तु व वहीवाटीचे हक्कासह.

वर नमूद शेतजमीन मिळकत ही श्री. सच्चिदानंद संभाजी पवार यांचे खरेदी मालकी व प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीची असून महसूल दप्तरी ७/१२ हक्कसदरी त्यांचे नावे दाखल आहे. सदर शेतजमीन मिळकत ही श्री. सच्चिदानंद संभाजी पवार यांनी आमचे आशिलास खरेदी देणेचा ठराव केलेला आहे व आमचे आशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालकाने सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा आमचे आशिलास दिलेला आहे.

या उपरही वर नमूद शेतजमीन मिळकतीशी इतर कोणाचाही खरेदी, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा इजमेंटरी राईट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क, अधिकार, हिस्सा व हितसंबंध असल्यास प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत संबंधितांनी ॲड. महमद ए. लांडगे, ऑफीस ७०७, महेदी नगर, परंडा रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर - ४१३४११ मो.नं. ८४४६४६१६३२ यांचेकडे संपर्क साधून अथवा त्यांचे सदर नमुद पत्त्यावर त्याबाबत कागदपत्रानिशी शहानिशा करून दयावी अथवा तक्रार वा हरकत कळवावी.

मुदतीत कोणाचीही तक्रार वा हरकत न आलेस आमचे आशिल कोणाची काहीही हरकत अथवा तक्रार नाही असे समजून वर नमूद शेतजमीन मिळकतीबाबत ठरावाप्रमाणे वर नमूद शेतजमीन मिळकतीचे मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही व कसल्याही प्रकारची तक्रार वा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून प्रस्तुत जाहीर नोटीस दिली. ता. २२/०५/२०२६

**सही/-**
**ॲड. महमद ए. लांडगे**
**बीसीए., एलएल.एम.**
**मो. ८४४६४६१६६२**

---

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तांचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अन्वये नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीचे **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** ज्याचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ते **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले आहे. खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज कराराच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांचे खाते अनियमित झाल्यामुळे, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीचे **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** ज्याचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ते **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाते) देय असलेल्या रकमा खालील तक्त्यामध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या संबंधित जारी केलेल्या सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि सदर रकमांवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 113665539 | मालमत्तेवर कर्ज | 1. पितांबर संभाजी खेडकर<br>2. गोकुळ संभाजी खेडकर | 30/03/2026 | INR 9,71,199.00/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५८० चा सर्व भाग आणि तुकडा, क्षेत्रफळ २००० चौ. फूट आणि चटईक्षेत्र (कार्पेट एरिया) १४०० चौ. फूट, मुक्काम पोस्ट: शिरभावी, ग्रामपंचायत शिरभावीच्या हद्दीत, तालुका: सांगोला, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३१७, आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे : पूर्व - करण सिताराम खेडकर, पश्चिम - दत्त मंदिर, उत्तर - रमेश सहदेव खेडकर, दक्षिण - शिरभावी ते सांगेवाडी रस्ता.

याद्वारे तुम्हाला वर दिलेल्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसीएफर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीचे **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** ज्याचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ते **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी व्याजाच्या दरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रक्कम या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे; तसे न केल्यास, खालील स्वाक्षरीकर्त्यास वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे भाग पडेल, जेणेकरून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीचे **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** ज्याचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ते **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाते) कडील देय रक्कम वसूल करता येईल. पुढे, तुम्हाला उक्त कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये सदर सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंधित केले आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 23/05/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

---

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. ८९/२०२६

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. नियामत सिकंदर मोमीन - अर्जदार**
रा. महेदवी नगर, मस्जिद जवळ, परंडा रोड, बार्शी, ता. बार्शी मो. ९६१९३५४४९८
(असल्यास, तर्फे वकील महमद ए. लांडगे)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी - गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. महेदवी नगर, मस्जिद जवळ, परंडा रोड बार्शी ता. बार्शी मो. ९६१९३५४४९८ यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जुन १९६७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९६७ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १९ मे २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

---

## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयएन :L17111PN1907PLC000258

नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र -413 001 दूरध्वनी : 91 22 45782579 ईमेल आयडी : jammill1907@gmail.com वेबसाईट : www.jamshri.in

**31 मार्च 2026 रोजी संपलेल्या तिमाही आणि संपलेल्या वर्षाच्या कालावधी करिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण** (रु.लाख)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही 31.03.2026 (लेखापरिक्षित) | संपलेली तिमाही 31.12.2025 (अलेखापरिक्षित) | संपलेली तिमाही 31.03.2025 (लेखापरिक्षित) | संपलेले वर्ष 31.03.2026 (लेखापरिक्षित) | संपलेले वर्ष 31.03.2025 (लेखापरिक्षित) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिचलनातून एकूण उत्पन्न | 211.40 | 210.58 | 208.65 | 877.87 | 905.46 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/(तोटा) | (30.16) | 4.78 | (41.68) | (13.86) | (156.22) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्च्यात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (30.16) | 4.78 | (41.68) | (13.86) | (123.80) |
| 4 | कर पूर्वीच्या खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | 10.24 | (4.54) | (4.76) | (4.76) | - |
| 5 | कर पश्च्यात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | 10.24 | (4.54) | (4.76) | (4.76) | - |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश नफा /(तोटा) (करपश्च्यात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन्न ( करपश्च्यात)) | (10.19) | 0.24 | (34.28) | (8.88) | (111.64) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/- (अखंडित आणि खंडित परिचलनाकरिता) | 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- |
| | अखंडित परिचलन प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत | (0.43) | 0.07 | (0.60) | (0.20) | (1.77) |
| | खंडित परिचलन प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत | 0.15 | (0.06) | (0.07) | (0.07) | - |

टिप :अ) उक्त लेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरीक्षक समितीने आढावा घेतला आहे संचालक मंडळाने त्यांच्या **मे 21, 2026** रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांला मंजूरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टॅंडर्डस्) नियम, 2015 सुधारीत असल्या प्रमाणे आणि अधिनियमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचाव्यात कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचीत केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टॅंडर्डस् (आयएनडी एएस) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) **31 मार्च 2026** रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाच्या आर्थिक निष्कर्षाच्या बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

**तारीख : 21.05.2026**
**स्थान : सोलापूर**

**जामश्री रिअलटी लिमिटेड करिता**
**सही/ –**
**पी. आर. दामाणी**
**व्यवस्थापकीय संचालक**

---

## PRECISION CAMSHAFTS LIMITED

PRECISION
Regd. Office : D5, M.I.D.C. Chincholi, Solapur, MH, 413255
CIN: L24231PN1992PLC067126

**Extract of Audited Consolidated Financial Results for the Quarter and Year ended March 31, 2026 [(Regulation 47(1)(b) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015]**

(Rs. in lakhs),except Earnings Per Share)

| Sr. No. | Particulars | Consolidated: Quarter ended March. 31, 2026 ('Refer Note 5) | Consolidated: Year ended March. 31, 2026 (Audited) | Consolidated: Quarter ended March. 31, 2025 ('Refer Note 5) |
|---|---|---|---|---|
| 1. | **Revenue From Operations** | **20,101.00** | **77,287.57** | **19,042.76** |
| 2. | Profit Before Exceptional Item & Tax | 1,932.40 | 6,802.55 | 1,936.24 |
| 3. | Profit Before Tax | 2,194.12 | 7,859.33 | 5,305.64 |
| 4. | Profit for the Period | 1,005.80 | 5,124.53 | 4,044.30 |
| 5. | Total Comprehensive Income/(loss) (after tax) | 978.65 | 6,016.13 | 3,908.46 |
| 6. | Paid up Equity Share Capital (Equity Share of 10/- each) | 9,498.58 | 9,498.58 | 9,498.58 |
| 7. | Earnings per share (of Rs.10/- each) | | | |
| | Basic : | 1.06 | 5.40 | 4.26 |
| | Diluted : | 1.06 | 5.40 | 4.26 |

**Notes:**
1. The above financial results for the quarter and year ended March 31, 2026 have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Group at their respective meetings held on May 22, 2026, which have been subject to audit by the statutory auditors of the Group.
2. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the Securities and Exchange Board of India ('SEBI') (Listing Obligations and Disclosure Requirements ('LODR')) Regulations, 2015. The full format of the audited Standalone & Consolidated Financial Results of the Company are available on the Stock Exchange's website **(www.bseindia.com and www.nseindia.com)** and also on the Company's website - **www.pclindia.in**.
3. These financial results have been prepared in conformity with the recognition and measurement principles in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules issued there under and in terms of Regulation 33 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular no. CIR/CFD/FAC/62/2016 dated July 05, 2016.
4. The board of directors of the holding company have recommended the final dividend of Rs 1/. per equity share of the face value of Rs 10 per equity share for the year ended March 31, 2026. The payment of dividend is subject to approval of shareholders at the ensuing Annual General meeting of the holding company.
5. Figures for the quarter ended March 31, 2026 and March 31, 2025 are the balancing figures between the audited figures in respect of full year and published year to date figures of nine moths ended December 31, 2025 & December 31, 2024 respectively, which were subjected to limited review by the statutory auditors of the Group.
6. Key Standalone Financial information

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone: Quarter ended March. 31, 2026 ('Refer Note 5) | Standalone: Year ended March. 31, 2026 (Audited) | Standalone: Quarter ended March. 31, 2025 ('Refer Note 5) |
|---|---|---|---|---|
| 1 . | **Revenue From Operations** | **15,748.03** | **57,754.77** | **13,717.15** |
| | Profit Before Exceptional Item and Tax | 1,609.17 | 7,545.70 | 1,455.13 |
| | Profit Before Tax | 1,872.32 | 2,655.71 | (2,176.08) |
| | Profit for the period/Year | 1,322.63 | 578.39 | (3,436.74) |
| 2. | Total Comprehensive Income (after tax) for the period | 1,393.10 | 816.19 | (3,434.53) |

**Place : Mangalwedha**
**Date : May 23, 2026**

**For and on behalf of the Board of Directors**
**Sd/-**
**Ravindra R. Joshi**
**Whole-time Director & CFO**



महत्त्वाचे

### क्रेझी किया रे...



**हैदराबाद:** शुक्रवारी राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादविरुद्ध होणाऱ्या लीग-फेरीतील शेवटच्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा विराट कोहली प्रत्यक्ष मैदानात खेळताना पाहण्याची संधी मिळेल, या आशेने चाहते वाट पाहत आहे. हैदराबादमधील क्रिकेट चाहते अक्षरशः क्रेझी झाले असून त्यांनी हा संपूर्ण आठवडा तिकिटे मिळवून देणाऱ्या ॲप्सवरच डोळे लावून घालवला आहे. अनेक चाहत्यांसाठी, सुरुवातीचा तो उत्साह लवकरच निराशेमध्ये बदलला. तिकिटे विक्रीसाठी उपलब्ध होताच अवघ्या काही मिनिटांतच संपली आणि सोशल मीडियावर काळ्या बाजारातील तिकिटांच्या ऑफर्सचा पाऊस पडू लागला, त्यापैकी अनेक ऑफर्स फसवणूक असण्याची शक्यता होती. मी तिकिटे बुक करण्यासाठी अनेक तास प्रयत्न केले होते, असे एक चाहता म्हणाला. ■

# अभिषेक, ईशान, हेनरिकची अर्धशतके

**सनरायझर्स हैदराबाद ४ बाद २५५**

◆ **हैदराबाद, २२ मे**


१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी राजीव गांधी स्टेडियमवर गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात अभिषेक शर्मा (५६), ईशान किशन (७९) आणि हेनरिक क्लासेनच्या (५१) दमदार अर्धशतकी खेळींच्या बळावर यजमान सनरायझर्स हैदराबादने मर्यादित २० षटकांत ४ बाद २५५ धावा उभारल्या आणि बंगळुरूसमोर विजयासाठी २५६ धावांचे लक्ष्य ठेवले.

अव्वल दोन क्रमांकात स्थान मिळविण्याच्या उद्देशाने सनरायझर्स हैदराबाद संघाचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकताच घरच्या मैदानावर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

अभिषेक शर्मा व ट्रॅव्हिस हेडने हैदराबादच्या डावाची झकास सुरुवात केली. या दोघांनी ४२ चेंडूंत ४५ धावांची सलामी भागीदारी केली. रसिख सलामने हेडचा त्रिफळा उडविला. हेडने १६ चेंडूंत ५ चौकारांसह २६ धावांची भर घातली. त्यानंतर अभिषेक शर्मा व ईशान किशनने धुव्वाधार फलंदाजी केली.



अभिषेक शर्मा



ईशान किशन



हेनरिक क्लासेन

**तीन वेळा जीवदान; अभिषेकच्या २२ चेंडूंत ५६ धावा**

सलामीवीर अभिषेक शर्मा नशीबवान ठरला. त्याला या सामन्यादरम्यान तीनवेळा जीवदान मिळाले, याचाच फायदा घेत अभिषेकने २२ चेंडूंत ४ चौकार व ५ षट्कारांसह ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. अभिषेकचा सहाव्या षटकादरम्यान व्यंकटेश अय्यरने झेल सोडला, सातव्या षटकादरम्यान जॉर्डन कॉक्सने तर आठव्या षटकादरम्यान देवदत्त पडिक्कलने झेल सोडला. या संधीचा फायदा घेत अभिषेकने शेफर्डच्या चेंडूवर जोरदार फटका मारून २० चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. तो अखेरीस दहाव्या षटकात सुयश शर्माच्या गोलंदाजीवर बाद झाला. कॉक्सने त्याचा झेल घेतला. त्यामुळे ८.२ षटकांत हैदराबादची २ बाद ९७ झाली होती.

**ईशान किशन-क्लासेनची शतकी भागीदारी**

पुढे ईशान किशन व हेनरिक क्लासेनेही बंगळुरूच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत चौफेर फटकेबाजी केली. ईशान किशनने ३१ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावून संघाच्या धावसंख्येत आणखी भर घातली. दरम्यान, हेनरिक क्लासेननेही अर्धशतक साजरे केले, मात्र तो ५१ धावांवर खेळत असताना त्याला कृणाल पांड्याने अय्यरकडून झेलबाद केले. हेनरिक क्लासेनने २४ चेंडूंत २ चौकार व ५ षट्कारांच्या मदतीने ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली. त्याने ईशानसोबत तिसऱ्या गड्यासाठी ११३ धावांची भागीदारी केली. तोपर्यंत हैदराबादने १६.२ षटकांत ३ बाद २१० धावांचा टप्पा गाठला.

ईशान किशनची नितीश कुमार रेड्डीसोबत फटकेबाजी सुरूच होती, मात्र डावाच्या अखेरच्या चेंडूवर रसिख सलामने ईशानला आपले लक्ष्य केले. या दोघांनी ४५ धावांची भागीदारी करून सनरायझर्स हैदराबादला २५५ धावांचा डोंगर रचून दिला. ईशान किशनने ४६ चेंडूंत ८ चौकार व ३ षट्कारांसह ७९ धावांची, तर नितीश कुमारने १२ चेंडूंत १ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद २९ धावांची खेळी केली. ◂(वृत्तसंस्था)

# मलेशिया मास्टर्सच्या उपांत्यपूर्व फेरीत चालिहाचा प्रभावी प्रवास संपुष्टात

◆ **क्वालालम्पूर, २२ मे**

येथे शुक्रवारी पार पडलेल्या मलेशिया मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत महिलांच्या एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या अश्मिता चालिहाने अत्यंत जिगरबाज कामगिरी केली; मात्र डेन्मार्कच्या २३ व्या विश्वमानांकित लाईन होजमार्क कजेर्सफेल्ट हिच्याकडून तिला निसटता पराभव पत्करावा लागला.

उजव्या गुडघ्यात दुखापत झाल्यामुळे आठ महिने पुनर्वसन केल्यानंतर स्पर्धेत पुनरागमन करणाऱ्या ७१ व्या विश्वमानांकित अश्मिताने पहिल्या गेममध्ये मिळवलेला कष्टाचा व महत्त्वपूर्ण आघाडीचा फायदा गमावला. एका तासाहून अधिक काळ चाललेल्या या सामन्यात, आठवे मानांकन असलेल्या प्रतिस्पर्ध्याकडून अश्मिताला २३-२१, १८-२१, ११-२१ अशा गुणांनी पराभव स्वीकारावा लागला.

चालिहाने सामन्याची सुरुवात अत्यंत जोमाने केली आणि पहिल्या गेमच्या मध्यंतरापर्यंत ११-६ अशी आघाडी घेतली. मध्यंतरानंतर लाईनने जोरदार पुनरागमन करत गुणांमधील अंतर कमी केले आणि स्कोअर १३-१२ पर्यंत आणला; त्यानंतर ती १९-१८ अशी पुढेही गेली. मात्र, या अत्यंत चुरशीच्या लढतीत भारतीय खेळाडूने आपला संयम ढळू दिला नाही आणि हा पहिला गेम आपल्या नावावर केला.

दुसरा गेमही काहीसा याच धर्तीवर झाला; ज्यामध्ये चालिहा पुन्हा एकदा १०-५ अशी आघाडीवर गेली होती. मात्र, त्यानंतर डेन्मार्कच्या खेळाडूने १३-१३ अशी बरोबरी साधली. त्यानंतर १५-१५ अशा बरोबरीच्या स्थितीतून लाईनने निर्णायक आघाडी घेतली आणि सामना तिसऱ्या व निर्णायक गेमपर्यंत नेला.

मात्र, तिसरा आणि अंतिम गेम पूर्णपणे एकतर्फी ठरला. लाईनने सुरुवातीलाच ८-४ अशी आघाडी घेत सामन्यावर आपले वर्चस्व गाजवले. तिने चालिहाला सामन्यात परतण्याची कोणतीही संधी दिली नाही आणि हा सामना सहजपणे जिंकत स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. ◂(वृत्तसंस्था)



## १८ वर्षांखालील आशिया चषक हॉकीसाठी महिला संघ जाहीर

**नवी दिल्ली :** हॉकी इंडियाने शुक्रवारी १८ सदस्यीय भारतीय १८ वर्षांखालील महिला संघाची घोषणा केली. हा संघ आगामी महिला १८ वर्षांखालील आशिया चषक काकामिगाहारा २०२६ स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करेल. जपानच्या यजमानपदाखाली होणारी ही प्रतिष्ठित खंडीय स्पर्धा २९ मे ते ६ जून या कालावधीत पार पडेल. स्वीटी कुजूरच्या नेतृत्वाखालील या युवा भारतीय संघासाठी ही स्पर्धा स्वतःची कसोटी पाहण्याची एक उत्तम संधी ठरेल. या स्पर्धेत भारतीय संघाला आशियातील काही सर्वात बलाढ्य संघांशी दोन हात करण्याची संधी मिळेल. गट अ मध्ये स्थान मिळालेला भारत, या स्पर्धेत कोरिया, मलेशिया आणि सिंगापूर या संघांशी भिडेल. भारत आपल्या मोहिमेची सुरुवात ३० मे रोजी मलेशियाविरुद्धच्या सामन्याने करेल; त्यानंतर ३१ मे रोजी त्यांचा सामना कोरियाशी होईल.

**भारतीय १८ वर्षांखालील महिला हॉकी संघ :** गोलरक्षक- महक परिहार, खिली कुमारी. बचावपटू : सुगन सांगा, नीलम टोपनो, रुबिना बक्सला, किरण एक्का, सुलोचनी. मध्यरक्षक : श्रुती कुमारी, दिया, स्नेहा दावडे, रश्मीन कौर, नाम्मी गीताश्री, पुष्पा मांझी. आक्रमक : नौशीन नाझ, स्वीटी कुजूर (कर्णधार), प्रियांका मिन्झ, संदीप कुमारी, नॅन्सी सरोहा.

## बहरीनमधील नियोजित विश्व कुस्ती स्पर्धा पुढे ढकलली

**बहरिन :** कुस्ती खेळाची शिखर संस्था असलेल्या युनायटेड वर्ल्ड रेसलिंगने (यूडब्ल्यूडब्ल्यू) बहरिनमधील सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे, बहरीनच्या राज्यामध्ये २४ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत मूळतः नियोजित असलेली २०२६ ची जागतिक अजिंक्यपद स्पर्धा पुढे ढकलली आहे. युनायटेड वर्ल्ड रेसलिंग (यूडब्ल्यूडब्ल्यू), बहरीन ऑलिम्पिक समिती आणि बहरीन कुस्ती महासंघाने समन्वय साधून ही स्पर्धा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला व तशी घोषणा केली. आखाती प्रदेशाशी संबंधित संभाव्य संघर्षाभोवती असलेली अनिश्चितता आणि त्याचा प्रादेशिक स्थिरता व आंतरराष्ट्रीय प्रवासावर होणारा व्यापक परिणामकाळजीपूर्वक आणि जबाबदारीने विचार केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ■



## समाज कल्याण क्लबच्या यशवंतराजे पवारला विजेतेपद

**मुंबईतील चॅम्पियन सीरिज लॉन टेनिस स्पर्धेतील कामगिरी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मे -**

मुंबई येथे संपन्न झालेल्या प्रतिष्ठित 'लॉन टेनिस चॅम्पियन सीरिज' स्पर्धेत येथील समाज कल्याण लॉन टेनिस क्लबचा खेळाडू यशवंतराजे पवार याने चमकदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. यापूर्वी त्याने २०२५ च्या महाराष्ट्र राज्यातील १२ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपदही मिळवले होते.

या दुहेरी यशाबद्दल मुंबई येथे 'महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना' आयोजित शिष्यवृत्ती समारंभात यशवंतराजेचा विशेष सत्कार करण्यात आला. संघटनेचे चेअरमन भारत ओझा, मानद सचिव सुंदर अय्यर आणि मानद सहसचिव राजीव देसाई यांच्या हस्ते त्याला गौरविण्यात आले.

यशवंतराजेच्या या यशाबद्दल समाज कल्याण लॉन टेनिस क्लबचे संगमनाथ नागोजी, तसेच प्रशिक्षक सुधीर सालगुडे आणि पूजा सालगुडे यांनी त्याचे कौतुक करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विजयाने निरोप घेण्याचा लखनौचा निर्धार

◆ **लखनौ, २२ मे**

इंडियन प्रीमियर लीग १९ व्या इंडियन प्रीमियर लीगच्या अखेरच्या टप्प्यात शनिवारी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकाना स्टेडियमवर यजमान लखनौ सुपर जायंट्स आणि पंजाब किंग्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौ संघ १७ मे रोजी राजस्थान रॉयल्सकडून सात गडी राखून पराभूत झाला व त्यांच्या प्लेऑफच्या आशा अधिकृतपणे संपुष्टात आल्या. ते सध्या गुणतालिकेत तळाशी असून, सातत्य राखण्यासाठी संघर्ष करीत आहे व आपल्या घरच्या प्रेक्षकांसमोर आपल्या मोहिमेचा शेवट चांगल्या प्रकारे करण्याच्या प्रयत्नात आहेत.

दरम्यान, श्रेयस अय्यर आणि त्याचा संघ आपली चूक सुधारण्याच्या तीव्र इच्छेत आहे. पंजाब किंग्स संघ सलग सहा सामन्यांतील पराभवाच्या कठीण मालिकेनंतर या सामन्यात उतरत आहे, यात बंगळुरूकडून नुकत्याच झालेल्या पराभवाचाही समावेश आहे. सध्या गुणतालिकेत पाचव्या स्थानावर असलेला पंजाब संघ, लखनौविरुद्ध हंगामाच्या सुरुवातीला ५४ धावांनी मिळवलेल्या विजयाची पुनरावृत्ती करून आपल्या प्लेऑफच्या आशा मजबूत करण्याचा प्रयत्न करेल.

आयपीएल २०२६ मधील आमच्या शेवटच्या सामन्यात आम्ही पंजाब किंग्सशी दोन हात करू. या सामन्यात विजय नोंदवू आणि अभिमानाने स्पर्धेचा निरोप घेऊ, असे लखनौ संघाचा कर्णधार ऋषभ पंत म्हणाला. आपल्या प्रतिष्ठेसाठी



ऋषभ पंत- श्रेयस अय्यर

खेळताना, लखनौ सुपर जायंट्स या हंगामातील आपला पाचवा विजय नोंदवून, स्पर्धेचा शेवट दिमाखात करण्याचा प्रयत्न करतील.

नुकत्याच जयपूर येथे झालेल्या राजस्थान रॉयल्स विरुद्धच्या सामन्यात आम्हाला सात गडी राखून पराभवाला सामोरे जावे लागले. मिच मार्शची ५७ चेंडूंतील ९६ धावांची आणखी एक वादळी खेळी आणि जोश इंग्लिसची २९ चेंडूंतील ६० धावांची धडाकेबाज फलंदाजीयांच्या जोरावर आमच्या फलंदाजांनी २० षटकांत ५ बाद २२० अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारली होती. मात्र, प्रतिस्पर्धी संघाने पाच चेंडू शिल्लक असतानाच हे लक्ष्य गाठले.

दुसरीकडे, पंजाब किंग्सचा संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून २३ धावांनी पराभूत झाल्यानंतर या सामन्यात उतरत आहे; हा त्यांचा सलग सहावा पराभव ठरला आहे.

या हंगामाच्या सुरुवातीला पंजाब किंग्स विरुद्ध झालेल्या आमच्या सामन्यात, त्यांनी ५४ धावांनी विजय मिळविला होता. प्रिन्स यादव (२५ धावांत २ बळी) व ऋषभ पंत (२३ चेंडूंत ४३ धावा) हे लखनौ संघाचे सर्वोत्तम कामगिरी करणारे खेळाडू ठरले होते.

आमचे खेळाडू १९ व्या आयपीएलमध्ये शेवटच्या वेळी मैदानात उतरतील व विजयाचेच ध्येय बाळगतील. हा हंगाम कदाचित आमच्या नियोजनानुसार गेला नसेल, परंतु प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी दाखवलेली जिद्द आणि झुंजार वृत्ती अतुलनीय होती, असेही तो म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायंट्स वि. पंजाब किंग्स**

**स्थळ :** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकना स्टेडियम, लखनौ
**वेळ :** सायं. ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

## स्पर्धेत लांब पल्ल्याचा धावपटू बेशुद्ध पडला

**रांची :** शुक्रवारी वरिष्ठ गट राष्ट्रीय ॲथ्लेटिक्स फेडरेशन स्पर्धेच्या पहिल्या दिवशी, पहाटे ५.४० वाजताच सुरू झालेली पुरुषांची १०,००० मीटर अंतिम शर्यत एका नाट्यमय वळणावर संपली. बिरसा मुंडा फुटबॉल स्टेडियमवरील शर्यतीच्या अंतिम रेषेजवळ पोहोचताच एक धावपटू कोसळला. कर्नाटकचा शिवाजी एम. याने शर्यतीची सुरुवात दमदार केली होती आणि अंतिम १०० मीटरपर्यंत तो पहिल्या क्रमांकावर राहण्याच्या स्थितीत होता, मात्र शेवटच्या क्षणी त्याला इतर धावपटूंनी मागे टाकले आणि तो बेशुद्ध पडला. त्याला अधिकारी आणि प्रशिक्षक उचलून नेत असल्याचे दिसून आले. सुरुवातीला, इतर धावपटू शर्यत पूर्ण करत असताना, ट्रॅकवरून त्याला बाजूला करण्याचा प्रयत्न काही अधिकाऱ्यांनी केला. शिवाजीचा दिवस आणखीच दुर्दैवी ठरला. सीमेचे नियम मोडल्याप्रकरणी त्याला स्पर्धेतून अपात्र ठरवण्यात आले. ■

# ख्रिस्तियानो रोनाल्डोचे दोन महत्त्वपूर्ण गोल

**अल-नसर संघाला सौदीमधील मोठे विजेतेपद ● विजेतेपदाचा दुष्काळ संपविला**

◆ **रियाध, २२ मे**

ख्रिस्तियानो रोनाल्डोने अखेर अल-नसर संघासोबत एक मोठे विजेतेपद पटकावले आहे. ४१ वर्षीय पोर्तुगीज स्टारने दमाक विरुद्धच्या सामन्यात दोन गोल करत, अल-नसरला ४-१ ने विजय मिळवून दिला आणि संघाला सौदी प्रो-लीगचे विजेतेपद जिंकून देण्यात मोलाची मदत केली. रोनाल्डो तीन वर्षांहून अधिक काळापूर्वी संघात सहभागी झाल्यापासून अल-नसरने जिंकलेले हे पहिलेच मोठे विजेतेपद आहे. हे अल-नसरचे ११ वे लीग विजेतेपद असून, २०१९ नंतर त्यांनी मिळवलेले हे पहिलेच विजेतेपद आहे.

विश्वचषकासाठीच्या पोर्तुगालच्या संघात निवड झाल्याच्या अवघ्या दोनच दिवसांनंतर रोनाल्डोने हे विजेतेपद उंचावले. या विश्वचषकाद्वारे रोनाल्डो या स्पर्धेत सहभागी होण्याचा आपला सहावा विक्रम प्रस्थापित करेल.

१४३ गोलच्या जोरावर आंतरराष्ट्रीय पुरुष फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल करणारा खेळाडू म्हणून त्याचा विक्रम अबाधित आहे. या विजयामुळे अल-नसरने गुणतालिकेत अव्वल स्थान निश्चित केले. त्यांनी आपलेच शहरातील प्रतिस्पर्धी संघ असलेल्या अल-हिलालवर दोन गुणांची आघाडी घेतली. अल-हिलालने ३४ सामन्यांचा हा संपूर्ण हंगाम एकही सामना न हरता पूर्ण केला असूनही, त्यांना दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. ◂(वृत्तसंस्था)



विजेतेपदाच्या चषकासह रोनाल्डो व अल-नासर संघातील खेळाडू

## बाळे येथे रविवारपासून मोफत योग शिबिर

**योगतज्ज्ञ मनमोहन भुतडा करणार मार्गदर्शन**

**सोलापूर, दि. २२ मे-**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून योग सेवा मंडळ शिवस्मारक यांच्या वतीने बाळे येथील ब्रह्मपुरी गृहनिर्माण सोसायटीमध्ये योग शिबिर रविवारपासून २४ मे २०२६ दररोज सकाळी ६ वाजता होणार आहे.

या शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या नागरिकांना योगासने, सूक्ष्म व्यायाम, प्राणायाम, ध्यान आणि तणावमुक्ती यांसह आरोग्याशी संबंधित विविध प्रकार शिकवले जाणार आहेत. प्रसिद्ध योगतज्ज्ञ मनमोहन भुतडा हे उपस्थित राहून शिबिरार्थींना मार्गदर्शन करणार आहेत, तर कालिदास कोंडा, लता माळगे आणि विद्या होनमोडे हे योगासनांची प्रात्यक्षिके दाखवणार आहेत.

हे शिबिर सर्व स्त्री-पुरुषांसाठी पूर्णपणे खुले आणि मोफत आहे. शिबिरात नाव नोंदणी करण्यासाठी सुभाष जोशी (७०२०५००४१९) यांच्याशी संपर्क साधावा. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कुसुम दायमा, राणी जोशी, रजनी शर्मा आणि नीता तिवारी परिश्रम घेत आहेत. बाळे आणि परिसरातील नागरिकांनी या शिबिरामध्ये सहभागी होऊन आपले आरोग्य संवर्धन करावे, असे आवाहन योग सेवा मंडळाचे अध्यक्ष संतोष सासवडे व सचिव दत्तगुरु वेदपाठक यांनी केले आहे.

# परेल क्लबची रॉयल फ्रेंड्स क्लबवर मात

**रेल्वेची ७९वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा; प्रेम देवकर सामनावीर**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मे -**

रेल्वेच्या ७९व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत सेंट्रल रेल्वे मेकॅनिक इन्स्टिट्यूट परेल क्लबने रॉयल फ्रेंड्स क्रिकेट क्लबचा २३ धावांनी पराभव करत विजयी घोडदौड सुरू केली. परेल क्लबच्या या विजयात अष्टपैलू कामगिरी करणारा भारताचा माजी १९ वर्षांखालील खेळाडू प्रेम देवकर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात शुक्रवारी झालेल्या सामन्यात रॉयल फ्रेंड्स क्रिकेट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना सेंट्रल रेल्वे मेकॅनिक इन्स्टिट्यूट परेल क्लबने निर्धारित २० षटकांत ७ बाद १७३ धावांचा आव्हानात्मक धावफलक उभारला. यामध्ये अमित यादव याने ३५, प्रेम देवकर याने ३२ आणि सूरज कुर्मी याने २१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. रॉयल फ्रेंड्स क्लबकडून गोलंदाजीत शुभम देवरकोंडा याने २४ धावांत २ बळी, राजकुमार हिरेमत याने ३२ धावांत २ बळी आणि रोहित देशमुख याने १ बळी घेतला.



१७४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना रॉयल फ्रेंड्स क्रिकेट क्लबचा डाव १९.५ षटकांत १५० धावांवर आटोपला. रॉयल फ्रेंड्सकडून रोहित देशमुख याने ३८, राजकुमार हिरेमत याने २३ आणि आदर्श पाटील याने २० धावा करत प्रतिकार केला, मात्र तो अपुरा पडला. परेल क्लबच्या प्रभावी गोलंदाजीसमोर त्यांचा डाव पत्त्यासारखा कोसळला. परेल क्लबकडून अनिल कोकरे याने ३१ धावांत ३ बळी, मोहम्मद हाशिम याने ११ धावांत २ बळी, सुरज कुर्मी याने १३ धावांत २ बळी आणि प्रेम देवकर याने ४१ धावांत २ बळी घेत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

सामन्यात ३२ धावा आणि २ बळी घेणाऱ्या प्रेम देवकरला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. लियाकत शेख यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी वासुदेव दोरनाळ, अंबादास तोरा, परेल इन्स्टिट्यूट कमिटीचे सदस्य रामसुभाष मालव आणि सचिन गायकवाड उपस्थित होते. या स्पर्धेतील सामनावीरचे सर्व पुरस्कार सुदेश मालप आणि सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. सामन्याचे पंच म्हणून सोहेल शेख व दया नवले यांनी काम पाहिले, तर गुणलेखन सचिन गायकवाड यांनी केले.

**आजचे सामने**

**सकाळी :** सेंट्रल रेल्वे मेकॅनिकल इन्स्टिट्युट परेल विरुद्ध ॲडव्होकेट इलेव्हन

**दुपारी :** कर्नाटका क्रिकेट क्लब कलबुर्गी विरुद्ध मारिया क्रिकेट क्लब ठाणे

## महत्वाचे...

### आईला मारल्याचा जाब विचारल्याने तिघाजणांकडून तरुणीस मारहाण

**सोलापूर, दि. २२ मे-**

माझ्या आईला का मारलास अशी विचारणा केल्याने एका तरुणीला तिघा जणांनी लाथाबुक्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील नागूरतांडा येथे आज शुक्रवारी सकाळी नऊ वाजता घडली. कविता देविदास राठोड (वय २७, रा. नागुर तांडा ) असे त्या जखमी तरुणीचे नाव आहे. आज सकाळी राहत्या घराजवळ तिला चेतन लालू चव्हाण, कविता सुरेश राठोड व इतर एकाने मिळून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. ढकलून दिल्याने डोके भिंतीवर आदळून ती जखमी झाली. अक्कलकोटच्या आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून ती येथील शासकीय रुग्णालयात दुपारी एक वाजता स्वतः दाखल झाली.

---

### बहिणीबरोबर तक्रार झाल्याने दुसऱ्या बहिणीने खाल्ल्या झोपेच्या ३० गोळ्या

**सोलापूर, दि. २२ मे -**



बहिणीबरोबर तक्रार झाल्याच्या रागात दुसऱ्या बहिणीने झोपेच्या एकदम ३० गोळ्या खाल्ल्याची घटना सरस बार समोर आज शुक्रवारी दुपारी बारा वाजता घडली. आरती विलास हब्बू (वय २७, रा. अशोक चौक सोलापूर) असे त्या बहिणीचे नाव आहे. तिचे आज सकाळी बहिणीबरोबर भांडण झाले होते. रागाच्या भरात तिने झोपेच्या एकदम तीस गोळ्या खाल्ल्या. याचा त्रास होऊ लागल्याने तिला उशासकीय रुग्णालयात वडील विलास यांनी दाखल केले.

---

### तापमान वाढीमुळे मजुरीवर परिणाम

**दक्षिण सोलापूर, दि. २२ मे -**

एप्रिल महिन्यात ऊन्हाचा तारा ४४ अंशापर्यंत गेल्यामुळे ग्रामीणमधील शेतमजूर व इतर ठिकाणी कामासाठी जाणाऱ्या मजूरांच्या वेळेत बदल झाला आहे. सकाळी सहा ते अकरा वाजेपर्यंत शेतमजूर कामावर काम करताना दिसून येत आहेत. ऊन्हामुळे मजूरांची तुटवडा जाणवत असल्यामुळे मजूरीमध्येही वाढ झाली आहे. त्यामुळे सध्या शेतीकामासह अनेक बांधकाम कामावर परीणाम होत आहे. महिला मजूरही द्राक्षबागांसह इतर सावलीच्या ठिकाणी कामांना प्राधान्य देत आहेत. ने आण करण्यासाठी वाहनांची व्यवस्था केल्यानंतर मजूरांचे नियम स्वीकारल्यानंतर मजूर कामावर येत असल्यामुळे मालकांचे तारांबळ होत आहे.

---

### पोलिसात केस का केली म्हणून सत्तुर व सळईने मारहाण; तरुण जखमी

**सोलापूर, दि. २२ मे-**

मागील भांडणाचा राग व पोलिसात केस का केली या कारणावरून एका तरुणाला लोखंडी सळई व सत्तूरने मारहाण करून जखमी केल्याची घटना मोहोळ तालुक्यातील वडवळ पाठीजवळ आज शुक्रवारी सकाळी दहा वाजता घडली. उल्हास अशोक धनवे (वय २१ वर्षे , रा. वडवळ ) असे त्या जखमी तरुणाचे नाव आहे. आज शुक्रवारी सकाळी त्याला दीपक पवार , नागेश लांडगे व इतर तिघांनी मिळून सळई व सत्तूरने मारहाण केली . यात डोक्याला , पाठीला व हातापायास मार लागून जखमी झाल्याने त्याला मोहोळच्या आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात वडील अशोक धनवे यांनी दुपारी बारा वाजता दाखल केले.

---

### नांगरणीची मजुरी मागितल्याने एकाच कुटुंबातील तिघाजणांना मारहाण

**सोलापूर, दि. २२ मे-**



नांगरणीचे पैसे मागितल्याच्या कारणावरून एकाच कुटुंबातील तिघा जणांना काठी व लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना प्रताप नगर तांडा जवळ आज शुक्रवारी सकाळी ११ वाजता घडली. शांता रमेश पवार (वय ४६ वर्ष), रमेश मेघा पवार (वय ५३ वर्ष) आणि त्यांची मुलगी आदिती रमेश पवार (वय १७ वर्ष, तिघे रा. मेघराज उद्यान, प्रताप नगर तांडा रोड,सोलापूर) अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. आज सकाळी या तिघांना प्रताप नगरच्या कॉर्नरला चन्नप्पा वस्तीजवळ अप्पू चन्नप्पा बचाटे व निलाबाई चन्नप्पा बचाटे यांनी लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण केली. त्यात सर्वांना मुकामार लागल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात जावई सुनील राठोड यांनी दुपारी बारा वाजता दाखल केले.

---

### नाईक दादासो लवटे यांचा आज सेवानिवृत्ती निमित्त होणार सत्कार

**सांगोला, दि.२२ मे -**

नाईक दादासो मोहन लवटे हे भारतीय सेनेमध्ये १६ वर्षे सेवा करून निवृत्त झाल्याबद्दल सांगोला तालुक्यातील माजी सैनिक संस्था, निजामपूर आणि ग्रामस्थ यांचे वतीने शनिवार दि.२३ मे रोजी निजामपूर हायस्कूल पटांगण येथे सायं.५ ते ९ या वेळेत जाहीर सत्कार होणार आहे. आमदार गोपीचंद पडळकर, मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक सचिन लवटे हे यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेच्या वतीने केले आहे. दादासो लवटे यांनी जम्मू काश्मीर, राजस्थान, पुणे येथे आपली सेवा बजावली आहे.

---

### पाऊस अधिक होऊनही पाण्याची टंचाई

**दक्षिण सोलापूर, दि.२२ मे -**

गतवर्षी अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. दिवाळीपर्यंत पावसाने हजेरी लावल्यामुळे विहीर व बोअरच्या पाणी पातळीत वाढ झाली होती. परिणामी शेतकऱ्यांनी ऊस, केळी, द्राक्षांसह बागायती पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे. पाऊस जास्त झाल्याने उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवणार नसल्याचे गृहीत धरुन शेतकऱ्यांनी बागायत क्षेत्रात वाढ केली. मात्र एप्रिल अखेरमध्ये पाणीटंचाई जाणवण्यास सुरूवात झाली आहे. त्यामुळे ऊस, द्राक्षे व केळी उत्पादक शेतकऱ्यांना पाण्यासाठी बोअरसह इतर पर्यायी व्यवस्था करण्याची वेळ आली आहे. अधिक पाऊस होऊनही पाणीटंचाई जाणवत असल्यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत.

# पाचवी, आठवी शिष्यवृत्ती परीक्षेला अखेरचा निरोप

- जिल्ह्यात ८,८२८ विद्यार्थी पात्र
- पुढील वर्षापासून चौथी व सातवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा
- गुणवंतांचा जि.प.कडून होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेतलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. जिल्ह्यात एकूण ८ हजार ८२८ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, शासनाने पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा बंद करण्याचा निर्णय घेतल्याने ही परीक्षा अखेरची ठरली आहे. परिणामी यंदाच्या निकालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



सोलापूर जिल्ह्यातील इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल २२.६९ टक्के लागला आहे. परीक्षेसाठी बसलेल्या २७ हजार ४९५ विद्यार्थ्यांपैकी ६ हजार १४० विद्यार्थी पात्र ठरले आहेत. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल २१.६२ टक्के लागला. १३ हजार ६० विद्यार्थ्यांपैकी २ हजार ६८८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्तेसह पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडून विशेष सन्मान करणार असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

दरम्यान, राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने शिष्यवृत्ती परीक्षेच्या रचनेत बदलाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार यापुढे पाचवी व आठवीऐवजी चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून असलेली पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा इतिहासजमा झाली आहे. या बदलामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासपद्धतीसोबतच शाळांच्या तयारीच्या धोरणातही बदल होणार असल्याचे बोलले जात आहे. पाचवी व आठवीच्या अखेरच्या शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांनी मात्र आपल्या यशाने या परीक्षेला संस्मरणीय निरोप दिला आहे.

#### यापुढे चौथी, सातवी शिष्यवृत्ती परीक्षा

पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने बंद केली आहे. पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षे आयोजि आता चौथी व सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे पाचवी व आठवीची ही शेवटची शिष्यवृत्ती परीक्षा होती.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सोलापूर**

## बार्शीत महिलेचा विनयभंग; आईसह मुलावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ मे-**

बार्शी शहरातील बाशिंगे प्लॉट परिसरात एका महिलेचा विनयभंग झाल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात आईसह मुलावर गुन्हा दाखल केला आहे.

यांदी महिला आपल्या आई, मुली व बहिणीसह वाड्यात वास्तव्यास आहे. मजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. काही दिवसांपासून तीव्र उष्णतेमुळे परिसरातील महिला वाड्यात लाईटच्या उजेडात झोपत होत्या. शुक्रवार दि. २२ मे रोजी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास फिर्यादी महिला झोपेत असताना सदानंद उर्फ गोट्या पिंगळे याने विनयभंग केला.

घाबरुन व लज्जा वाटल्याने संबंधित महिलेने आरडाओरडा केला. त्यानंतर तिची बहीण व आरोपीची आई सविता पिंगळे या जाग्या झाल्या. फिर्यादीच्या बहिणीने आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता तो पळून गेला. त्यानंतर आरोपीच्या आईने 'माझ्या मुलावर खोटा आळ घेता का' असे म्हणत फिर्यादी व तिच्या बहिणीस शिवीगाळ केली. माहेरच्या लोकांना बोलावून घेऊन गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत केला आहे.

घटनेनंतर सकाळी फिर्यादी महिलेने डायल ११२ वर संपर्क साधल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत संबंधित महिलेला पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास सांगितले. या प्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात आरोपी सदानंद उर्फ गोट्या पिंगळे व सविता पिंगळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे तपास पोलिस नाईक अडसुळ करीत आहेत.

## पाच भावंडांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला अमाप उत्साह

### भाळवणीतील कलढोणे परिवार; ग्रामस्थ, आप्तेष्टांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २२ मे-**

भाळवणी येथे कलढोणे परिवाराच्या वतीने पाच भावंडांचा एकत्रित अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. सोहळ्याला भाळवणी ग्रामस्थांसह कलढोणे परिवाराच्या आप्तेष्ट मित्रमंडळींनी मोठी गर्दी केली होती.

प्रारंभी एकनाथ महाराज नामदास, कलढोणे बंधू, बाळासाहेब काळे, संभाजीराजे शिंदे यांच्याहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.कलढोणे परिवारातील पाच बंधूंचे ८१ दिव्यांनी औक्षण करून लेक,लेकींच्याहस्ते आई, वडीलांची पाद्यपूजा केली. मान्यवरांच्या हस्ते कलढोणे बंधूंचा सत्कार करण्यात आला. राधा इदाते, राजू करपे, डॉ.बाळकृष्ण नष्टे, दीपक कलढोणे, सांगली जि.प.



#### समाजाला प्रेरणा देणारा उत्सव

पाच भावंडांचा एकत्रित अभिष्टचिंतन सोहळा हा समाजाला प्रेरणा देणारा, सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव आहे. असे उत्सव समाजात सातत्याने होणे आवश्यक आहे. **- कल्याण कलढोणे, निवृत्त प्राध्यापक.**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी सोमनाथ रसाळ, अंजली रसाळ, राहुल कलढोणे यांनी मनोगते व्यक्त केली.एकनाथ महाराज नामदास यांनी जीवनात सुख,दुःख येतच असते. त्यातून कलढोणे परिवाराचे रामनाम चे संस्कार दिसत असल्याचे जाणवल्याची भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी तर आभार गोविंद कलढोणे यांनी मानले. कार्यक्रमासाठी शुभम कलढोणे, प्रथमेश कलढोणे, नवल कलढोणे, गोविंद कलढोणे, दत्तप्रसाद दुधाणे, कौस्तुभ कलढोणे, प्रणव कलढोणे,संतोष कलढोणे परिवारातील लेकी-सुनांनी परिश्रम घेतले. सुंदर कार्यक्रमाला आल्याचा भाव प्रत्येकांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

## प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या वाढदिवसानिमित्त ९८१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ मे -**

माजी नगराध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त विद्यामंदिर परिवार व लायन्स क्लब सांगोला यांच्यावतीने भव्य रक्तदान शिबिर पार पडले. तीन दिवसात तब्बल ९८१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. दि.२० मे लोणविरे १३८, दि.२१ मे नाझरा १६५ व दि.२२ मे रोजी कोळा १४१ व सांगोला येथे ५३७ असे करून मानवतेच्या कल्याणाचे अनमोल कार्य केले.




सांगोला येथील शिबिराचे उद्घाटन लायन्स विभागीय सभापती ॲड.श्रीनिवास कटकुर, उपविभागीय सभापती सोमशेखर भोगडे, नगराध्यक्ष आनंदा माने, सां.ता.उ.शि.मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड यांचे हस्ते व डॉ.शैलेश डोंबे, सुहास होनराव, विलास क्षीरसागर, सी.ए.उत्तम बनकर, संस्था सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य चंद्रशेखर अंकलगी, प्राचार्य बिभीषण माने, उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप, लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रा.नवनाथ बंडगर यांच्या उपस्थितीत फीत कापून व श्रीफळ वाढवून झाले.

या प्रसंगी संस्था उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकर सावंत, सदस्य दिगंबर जगताप, प्रसाद झपके उपस्थित होते.

शिबिराला जि.प.शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार, नगरसेवक ज्ञानेश्वर तेली, गिरीश नष्टे, ॲड. संजीव शिंदे यांनी भेट दिली. शिबिरासाठी रेवनील ब्लड बँक सांगोला, सिद्धेश्वर ब्लड बँक सोलापूर, एम.एस.आय सांगली, सांगोला ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले.

प्रास्ताविक बिभिषण माने, सूत्रसंचालन उन्मेश आटपाडीकर यांनी केले. आभार प्रशुद्धचंद्र झपके यांनी मानले. शिबिरामध्ये जास्तीत जास्त रक्तदाते उपलब्ध केल्याबद्दल प्रा.नवनाथ बंडगर, प्रा.मोहन भोसले यांचा सन्मान करण्यात आला.

## बार्शीतील प्रसिद्ध हॉस्पिटलवर कारवाईची टांगती तलवार?

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ मे-**

**जिल्हा शल्य चिकित्सकांचे ७ दिवसांत खुलासा देण्याचे आदेश**

बार्शी शहरातील अलिपूर रस्त्यावरील प्रसिद्ध हॉस्पिटलविरोधात गंभीर तक्रार दाखल झाल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सकांनी संबंधित हॉस्पिटल प्रशासनाला नोटीस बजावत सात दिवसांत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. समाधानकारक खुलासा न केल्यास हॉस्पिटलचा परवाना रद्द करण्याचा इशाराही दिला आहे.

याबाबत बार्शी येथील संदीप सुतार यांनी दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी संबंधित हॉस्पिटलचा नोंदणी परवाना रद्द करण्याची मागणी करत तक्रार दाखल केली होती. तक्रारीत कायद्यानूसार आवश्यक असलेले अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केले नसल्याचा आरोप केला आहे. तसेच मुंबई उच्च न्यायालयातील रिट याचिके संदर्भातील सद्यस्थितीबाबत माहिती सादर करण्याची म ागणीही केली आहे.

तक्रारीची दखल घेत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी संबंधित हॉस्पिटल प्रशासनाला सात दिवसांत पुराव्यानिशी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. संबंधित खुलासा वेळेत आणि समाधानकारक न झाल्यास हॉस्पिटलविरोधात कायदेशीर कारवाई करुन नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल, असे पत्रात नमूद केले आहे. या पत्राची प्रत ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षकांनाही पाठवली आहे.

दरम्यान, याबाबत संबंधित डॉक्टरांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. हॉस्पिटल प्रशासनाने जिल्हा शल्य चिकित्सकांचे पत्र शुक्रवारी प्राप्त झाल्याचे सांगत सर्व बाबींचा खुलासा वेळेत आणि आवश्यक पुराव्यानिशी सादर करण्यात येईल, असे सांगितले.

## प्रदीप गायकवाड एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध; येरवडा कारागृहात रवानगी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे -**

शहरातील वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे १२ गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार प्रदीप मौला गायकवाड (वय ३३, रा.सेटलमेंट फ्री कॉलनी क्र. ६, सलगर वस्ती सोलापूर) यास एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध केले असून त्याची रवानगी पुण्याच्या येरवडा कारागृहात केली आहे.

प्रदीप गायकवाड हा आपल्या साथीदारांच्या म दतीने अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी गुन्हेगारी कृत्य करत होता. त्याच्याविरुद्ध विजापूर नाका, फौजदार चावडी, सदर बाजार आणि सलगर वस्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी, गंभीर दुखापत यासारखे तब्बल १२ गंभीर गुन्हे दाखल आहेत.



पोलिसांनी त्याच्यावर २०१२, २०१४, २०१६ आणि २०२४ मध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियम व फौजदारी प्रक्रिया संहितेच्या विविध कलमांन्वये प्रतिबंधक कारवाया केल्या होत्या. मात्र, वर्तनात कोणताही बदल न झाल्याने पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी २१ मे रोजी दिलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशानूसार ही कारवाई केली. पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी पदभार स्वीकारल्यापासूनची ही ५६ वी एमपीडीएची कारवाई आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, तत्कालीन पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त प्रीतम यावलकर यांच्या म ार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त राजन माने, दिलीप पवार, शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने,सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, सपोनि तुकाराम घाडगे, एमपीडीए पथकाचे हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव आणि विशाल नवले यांनी पार पाडली आहे.

# बेवारस मृतदेहाची समस्या पंढरपुरात जटील

## माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांचा आंदोलनाचा इशारा

### चंद्रभागा नदी पात्रात पुन्हा सापडले दोन मृतदेह

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ मे -**

पंढरपुरात बेवारस मृतदेहाची समस्या जटील होवून बसली आहे. बेवारस मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी ना मंदिर समिती, ना पालिका पुढे येत आहे. पोलिस खात्याचे देखील सवडीशास्त्र असल्यामुळे बेवारस मृतदेहांची समस्या जटील झाली आहे. या समस्येबाबत मंदिर समिती आणि पालिकेने योग्य तोडगा न काढल्यास येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांनी आंदोलनाचा इशारा देखील दिला आहे.

चंद्रभागा नदीपात्रात दररोज एक तरी बेवारस मृतदेह सापडत आहे. दोन दिवसापूर्वी नदीपात्रात दोन बेवारस मृतदेह सापडल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. याची माहिती समजताच भाजपचे माजी शहराध्यक्ष विक्रमशिरसाट यांनी त्या ठिकाणी तात्काळ धाव घेत त्या बेवारस मृतदेहाबाबत पंढरपूर शहर पोलीस प्रशासनाला माहिती देऊन एक शववाहिका उपलब्ध करून दिली. नदी पात्रात दररोज अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व नगरपालिका प्रशासनाने याची दखल घेतली पाहिजे.

कारण येथे भाविकांबरोबरच अनेक भिक्षेकरी, वेडे मंडळींची देखील म ांदियाळी असते. त्यामध्ये नदीपात्रात बुडून किंवा पात्रातील पाण्याचा अंदाज न आल्यामुळे अनेकांचा मृत्यु होत असतो. अनेक भिक्षेकरी, अपंग, वेडीमाणसे चंद्रभागेच्या वाळवंटात आश्रय घेत उदरनिर्वाह करीत असतात. त्यांचाही विविध कारणांनी मृत्यु होतो. अशा बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याची जबाबदारी मंदिर समितीने तसेच पालिकेने उचलली पाहिजे.

या पुढे अशा बेवारस मृतदेहाची दखल न घेतल्यास आम्ही ते मृतदेह नगरपालिकेच्या दारात आणून ठेवून तीव्र आंदोलन छेडू असा देखील इशारा विक्रम शिरसट यांनी दिला.



#### परमार, सर्वगोड यांना मानधन द्या : शिरसट

नदीपात्रात सामाजिक कार्यकर्ते मनोज परमार व सर्वगोड बेवारस मृतदेहांचे अंत्यसंस्कार करण्याचे काम करतात. असे बेवारस मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात नेवून त्याचे शवविच्छेदन तसेच अंतिमविधी ते पार पाडतात.हे सामाजिक काम असून ते पवित्र कार्य करतात. त्यामुळे मनोज परमार व सर्वगोड यांना मंदिर समितीच्या वतीने काहीतरी मानधन सुरू करावे अशीही मागणी यावेळी विक्रम शिरसट यांनी केली.

#### मंदिर समिती आणि पालिका प्रशासन सुन्न

पंढरपूरात नेहमी असे प्रकार घडत असताना येथील नगरपालिका प्रशासन आणि मंदिर प्रशासन मात्र सुस्त आहे. या दोन्ही विभागांनी अशा घटनेत परस्परांमध्ये समन्वय राखत काहीतरी जबाबदारी उचलण्याची गरज आहे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## महत्वाचे...



### रामभाऊ जोशी हायस्कूलमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**करकंब, दि.२२ मे-**

करकंब ता. पंढरपूर येथील रामभाऊ जोशी हायस्कूलमधील इयत्ता दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. प्रशालेतील अथर्व शिंदे याने ९३.३० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक, विनीत शिंदे याने ९१.८० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय तर वैष्णवी शेटे व श्रेया डांगे यांनी संयुक्तपणे ९१.६० गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक प्राप्त केला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा पर्यवेक्षक धनवंत करळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक हेमंत कदम होते. यावेळी ॲड. जालिंदर शिंदे, रत्नमाला शिंदे, विष्णू शेटे, अतुल अभंगराव, पुजा मोरे, नामदेव सलगर, अश्विनी शिंगटे आदी उपस्थित होते.



### चुनाविक्री करणाऱ्या महिलांना मोठ्या छत्र्यांचे वाटप

**सोलापूर, दि. २२ मे-**

वाढत्या उन्हाच्या कडाक्यात रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या महिलांना दिलासा देण्याच्या उद्देशाने दिवंगत श्रीनिवास गुंडेली यांच्या स्मरणार्थ टिळक चौक परिसरातील चुनाविक्री करणाऱ्या महिलांना मोठ्या छत्र्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम सुधाकर गुंडेली यांच्या वतीने राबविण्यात आला.टिळक चौक परिसरात दिवसभर उन्हात बसून उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना उन्हापासून संरक्षण मिळावे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेत व्यवसाय करणे सुलभ व्हावे, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यामुळे उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. महापालिका कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष राम दुधाळ यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. यावेळी राऊत, सुरेश मलाव आदी उपस्थित होते.



### लोकमंगल परिवारातर्फे प्रभाग २२ मध्ये मोफत आरोग्य शिबीर उत्साहात

**सोलापूर, दि. २२ मे-**

प्रभाग क्र. २२ मधील श्री हनुमान मंदिर, गरिबी हटाव झोपडपट्टी क्र.२ येथे लोकमंगल परिवाराच्या वतीने आयोजित मोफत सर्वरोग निदान तपासणी शिबीर, मोफत नेत्र तपासणी शिबीर तसेच मोफत रक्त तपासणी शिबीर उत्साहपूर्ण संपन्न झाला. या शिबिरामध्ये परिसरातील एकूण १२० नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी करण्यात आली. तसेच रुग्णांना आवश्यकतेनुसार मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. नेत्र तपासणी अंतर्गत अनेक नागरिकांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली असून गरजूंना अल्पदरात चष्मा उपलब्ध करून देण्याची माहिती देण्यात आली. या शिबिरासाठी महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. बाळराज म्हेत्रे यांनी नागरिकांना आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच डॉ. सुप्रिया पाटील (डेंटिस्ट) यांनी दातांच्या आरोग्याविषयी माहिती दिली. डॉ. किरण कीर्तने यांनी सर्वरोग तपासणी केली तर नेत्र तज्ञ सोमनाथ शेटे यांनी नेत्र तपासणी केली. जयश्री कोळी (स्टाफ नर्स), शिवराज चलवादी तसेच आरोग्य सेविका यांनी शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन शैलेश अहिवळे यांनी केले.

### महिलांवरील अत्याचार व फसवणूक प्रकरणातील आरोपी अ.कय्युम शेख २ वर्षाकरीता तडीपार

**सोलापूर, दि. २२ मे-**



महिलांवरील अत्याचार व सामान्य नागरिकांची फसवणूक प्रकरणी गुन्हे दाखल असलेला आरोपी अब्दुल कय्युम इब्राहिम शेख, (वय-४७ वर्षे, रा. घर नं. ९३, साई नगर, स्वामी विवेकानंद योगा प्रशिक्षण केंद्राच्या पाठीमागे, जुळे सोलापूर) यास शहर व सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे. या आरोपीविरुद्ध सन २०२३ व २०२५ या कालावधीत महिला अत्याचाराचे गुन्हे करणे, सामान्य नागरीकांना व्यवसायामध्ये गुंतवणुक केल्यास चांगला परतावा देण्याचे अमिष दाखवून पैसे घेवून फसवणुक करणे, बनावट पावती तयार करुन फ्लॅट न देता फसवणुक करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने विजापूर नाका पोलीस ठाणेकडून तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता. त्यानुसार पोलीस उप-आयुक्त प्रितम यावलकर यांनी शुक्रवारी कार्यवाही करुन या आरोपीला सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

# मराठा आरक्षणाच्या चिंतेतून शेतकरी तरुणाची आत्महत्या

## डोकेवाडीत हळहळ

**तभा वृत्तसेवा,**
**भूम, दि. २२ मे-**

डोकेवाडी येथे एका २५ वर्षीय शेतकरी तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याची चिंता, कर्जबाजारीपणा आणि नापिकीमुळे नैराश्यातून हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मयत तरुणाचे नाव पद्माकर अशोक आहेर (वय २५) असे आहे. ते आपल्या राहत्या घराच्या वरच्या मजल्यावर लोखंडी अँगलला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. ही घटना २२ मे रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. पोलिसांना याबाबत आनंद आहेर यांनी माहिती दिली. गळफास घेतल्यानंतर थोडा जीव असल्याचा भास झाल्याने नातेवाईकांनी त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र ईट येथे उपचारासाठी नेले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पोलिसांच्या माहितीनुसार, पद्माकर आहेर यांच्या खिशात एक चिठ्ठी आढळून आली. त्यामध्ये कर्जबाजारीपणाला, नापिकीला कंटाळून आणि मराठा समाजाला आरक्षण नसल्यामुळे मी आत्महत्या करत आहे, असा मजकूर लिहिलेला होता.

पद्माकर आहेर हे मराठा आरक्षण आंदोलनात सक्रिय सहभागी होते. मुंबई, बीड, धाराशिवसह विविध ठिकाणी झालेल्या मराठा मोर्चांमध्ये त्यांनी सहभाग नोंदवला होता. मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याची चिंता त्यांना सतावत असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.या प्रकरणी वाशी पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. पद्माकर आहेर यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे. या घटनेमुळे भूम तालुक्यात शोककळा पसरली असून मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा तीव्र भावना व्यक्त होत आहेत.

# बार्शी न्यायालयाचा 'नवरोबाला' दणका

## आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मे-**

फिर्यादीबरोबर आपले कोर्ट मॅरेज झाले असल्यामुळे बलात्काराचा गुन्हा निष्पन्न होत नाही असा दावा करणाऱ्या तथाकथित नवऱ्याचा जामीन अर्ज बार्शी न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

माढा तालुक्यातील 'त्या' तरुणीने मार्च २०२६ मध्ये कुर्डूवाडी पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत असा आरोप केला होता की २०१६ मध्ये तिच्या घराजवळ राहत असलेल्या परधर्मीय तरुणाबरोबर तिची ओळख झाली. त्यानंतर तो तिच्या मागे लागला. १० वी चे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर सन २०१८ मध्ये तिने सोलापूर शहरातील नामांकीत महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथे देखील तो आरोपी तिला भेटायला येत होता. सन २०१८ मध्ये आरोपीने तिला सोलापूर शहरातील एका लॉजवर नेऊन तिचे इच्छेविरुध्द शरीरसंबंध केला. सन २०२५ मध्ये ती शिक्षणासाठी पुणे येथे राहत असताना आरोपी तेथे आला व तिला तुझे फोटो व्हायरल करेन असा दम देऊन तिला मुंबई, गुजरात, राजस्थान येथे पळवुन नेले. पुण्यात परतल्यानंतर 'लिव्ह इन रिलेशनशिप' दस्त तयार केला. त्यानंतर काही दिवसानंतर तिला दमदाटी देऊन अंतरधर्मीय असल्याने कोर्ट मॅरेजसुध्दा केले. त्रास असह्य झाल्यानंतर तिने तिच्या आईवडिलांना सर्व हकीकत सांगून आरोपीविरुध्द कुर्डूवाडी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आरोपीविरुध्द पोक्सो अंतर्गत बलात्कार व बी.एन.एस. अंतर्गत गुन्हा दाखल झाला. आरोपीस पोलिसांनी अटक केली. आरोपीने बार्शी न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. फिर्यादीबरोबर आपले कायदेशीर लग्न झाले आहे त्यामुळे कोणताही गुन्हा निष्पन्न होत नाही असा दावा करत जामीन अर्ज दाखल केला. सदर जामीन अर्जास मुळ फिर्यादी पिडीत तरुणीतर्फे प्रतिज्ञापत्र दाखल करुन प्रखर विरोध करण्यात आला.

आरोपीविरुध्द सकृत दर्शनी पुरावा आहे, आरोपीने फिर्यादीवर २०१६ साली लॉजमध्ये शरीरसंबंध केले त्यावेळी ती अज्ञान होती असे मत व्यक्त करुन न्यायाधिशांनी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळून लावला. या प्रकरणी सरकारतर्फे ॲड. डी. डी. देशमुख, मुळ फिर्यादी पिडीत तरुणीतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. शरद झाल्टे यांनी काम पाहिले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचे सुयश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूलच्या ७ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश संपादन केले.

यात इ.५ वीचे पाच विद्यार्थी समृद्धी माने(१६६),सचिता जाधव(१५०), मुसाअली मुल्ला (१६०), गायत्री स्वामी(१२२), पर्णश्री माळवदकर(१३०)व इ.८ वीचे दोन विद्यार्थी वेदांत बगले(२०४) व संदेशकुमार चव्हाण(१४०) हे विद्यार्थी पात्र झाले आहेत.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक आप्पासाहेब हत्तुरे ,अध्यक्ष सद्धप्पा वरनाळ, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, प्र.मुख्याध्यापक रमेश दिंडोरे व प्रशालेतील शिक्षकांनी अभिनंदन व कौतुक केले.

# जुळे सोलापुरातील उखडलेले रस्ते दुरुस्त करण्याची मागणी

## राजश्री चव्हाण; महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मे-**



जुळे सोलापूर व प्रभाग क्रमांक २६ मध्ये ड्रेनेज कामांनंतर उखडून ठेवलेल्या रस्त्यांच्या प्रश्नाबाबत भाजप अनुसूचित जमाती मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांनी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांना निवेदन देत पावसाळ्यापूर्वी तातडीने रस्ते दुरुस्तीची मागणी केली.

पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण न झाल्यास जुळे सोलापुरातील नागरिकांना सोबत घेऊन महापालिकेवर मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही दिला आहे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शनकडून जुळे सोलापूर व प्रभाग २६ मध्ये ड्रेनेजची कामे केली. मात्र, कामांनंतर अनेक ठिकाणी रस्ते खोदून तसेच ठेवल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. इस्टिमेटनुसार काम पूर्ण झाल्यानंतर रस्ते पूर्वस्थितीत करून देणे अपेक्षित असतानाही अद्याप डांबरीकरण व कॉंक्रिटीकरण केले नसल्याचा आरोप निवेदनात केला आहे.

ओम गर्जना चौक ते बॉम्बे पार्क, कृष्णा कॉलनी, शिक्षक सोसायटी, गुरुदेवदत्तनगर भाग १ ते ५, प्रियांका नगर, पंचवटी नगर, विश्वनगर, रोहिणी नगर भाग १ आदी भागांतील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या संदर्भात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, महापौर विनायक कोंड्याल व सभागृह नेते नरेंद्र काळे यांना निवेदन दिले आहे.

अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी याची गंभीर दखल घेत संबंधित अधिकारी व ठेकेदारांना दूरध्वनीवरून तातडीच्या सूचना दिल्या. आठवडाभरात संबंधित कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण यांनीही प्रभागातील समस्यांकडे लक्ष वेधले.

## 'स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' येथे शासनमान्य सुविधा केंद्र सुरु

**सोलापूर, दि. २२ मे-**

तंत्रशिक्षण संचालनालयाकडून (डीटीई) डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रियेसाठी स्वेरी पंढरपूर व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखाली व संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे तंत्रनिकेतन महाराष्ट्र शासनमान्य सुविधा केंद्र ( Facilitation Center -६४६७) म्हणून कार्यरत झाले आहे. प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व सुविधा विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

तंत्रशिक्षण संचालनालयाकडून जाहीर झालेल्या वेळापत्रकानुसार २० मे ते २२ जून या कालावधीत प्रवेश अर्ज निश्चिती करायची आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आणि त्यांना प्रवेश प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये यासाठी इन्स्टिट्यूटने विशेष नियोजन केले आहे. ही प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रविवारसह सर्व दिवस हे सुविधा केंद्र सुरू असेल.

या केंद्रामध्ये सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, उपलब्ध सर्व शिष्यवृत्ती आणि विविध शासकीय योजना यांची सविस्तर माहिती दिली जात आहे. तसेच डिप्लोमा नंतरच्या व्यवसाय व नोकरीच्या संधी आणि 'कॅम राउंड'ची संपूर्ण माहिती तज्ज्ञ प्राध्यापकांमार्फत दिली जात आहे. इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. यु. एस. सुतार आणि कॅम्पस इनचार्ज कीर्ती भोसले यांनी सर्व इच्छुक विद्यार्थी व पालकांना या मोफत सुविधा केंद्राचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.



# सह्याद्री फार्मसीच्या पूल कॅम्पसने ८१ विद्यार्थ्यांना नोकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ मे -**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये तब्बल ८१ विद्यार्थ्यांची निवड नामांकित फार्मा कंपन्यांमध्ये झाल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले यांनी दिली.

पूल कॅम्पसमध्ये मार्कसन फार्मास्युटिकल लि. गोवा, एव्हरसुयर पोलीबॉन्ड इंडिया प्रा.लि. पुणे, दाटवायलर फार्मा प्रा.लि. पुणे, एमकुयर फार्मासुटिकल लि.पुणे, निपरो फार्मा पॅकेजिंग प्रा.लि. खंडाळा, सातारा या नामांकित कंपन्यांनी भाग घेतला होता. २६ फार्मसी कॉलेजच्या एकूण ५३६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

विद्यार्थ्यांची प्रथम फार्मा व एप्टीट्यूड परीक्षा घेण्यात आली. त्यामधून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन अंतिम निवड केली. सह्याद्री फार्मसी कॉलेजच्या २६ तर इतर कॉलेजच्या ५५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्रांचे वाटप प्रमुख मान्यवरांच्या हस्ते केल्याचे संस्थेचे विश्वस्त विश्वजीत इंगवले यांनी सांगितले. अंतिम वर्षात शिक्षण चालू असताना आम्हास उत्तम अशा करियरची संधी या पूल कॅम्पसद्वारे मिळाली त्यामुळे आम्ही संस्था वरिष्ठांचे खूप आभारी असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एन.ए.तांबोळी यांनी केले. पूल कॅम्पस यशस्वी करण्यासाठी अद्वित सर्विसेसचे संतोष स्वामी यांचे सहकार्य तर कॉलेज ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर प्रा.एस. एस.काळे, प्रा.एस.पी.जोकार, प्रकाश पाटील यांचे योगदान लाभले.

# अर्बन स्ट्रीट पार्क उत्तम ठिकाण ठरावे : आ. देवेंद्र कोठे

## महापौर विनायक कोंड्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत अर्बन स्ट्रीट पार्कची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

अर्बन स्ट्रीट पार्क हे सोलापुरातील नागरिकांना फिरण्यासाठी उत्तम ठिकाण ठरावे असा प्रयत्न आहे. त्यासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. शासनाचा हेतू साध्य होण्यासाठी सोलापूर महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने याकडे लक्ष देण्याबाबत सूचना आ. देवेंद्र कोठे यांनी दिल्या


अक्कलकोट रस्त्यावरील अर्बन स्ट्रीट पार्कच्या सुशोभीकरण आणि सुरक्षेबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी महापौर विनायक कोंड्याल यांच्या समवेत पाहणी करून प्रशासनाला सूचना केल्या. नागरिकांच्या सोयीसाठी पाच कोटी रुपयांचा निधी देऊन अर्बन स्ट्रीट पार्क विकसित करण्यात आले आहे. या पार्कमुळे परिसरातील नागरिकांना फिरण्यासाठी अत्यंत चांगली सोय उपलब्ध झाली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून या परिसरात चोऱ्या तसेच अनेक



गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे केल्या होत्या. याची तात्काळ दखल घेऊन आमदार कोठे आणि महापौर कोंड्याल यांनी अर्बन स्ट्रीट पार्क परिसराची पाहणी करत महापालिका तसेच पोलीस प्रशासनाला सूचना देत नागरिकांच्या सुविधांमध्ये तडजोड न करण्याबाबत सांगितले.

सोलापूर महानगरपालिकेने अर्बन स्ट्रीट पार्क मधील सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने या ठिकाणी पूर्णवेळ सुरक्षारक्षक नियुक्त करावेत, उद्यानात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना बसण्यासाठी पुरेशा प्रमाणात लोखंडी बाकडे बसवावेत, येथील झाडांना नियमितपणे पाणी देऊन येथील झाडांची निगा राखावी अशा सूचना सोलापूर महानगरपालिका प्रशासनाला यावेळी आ. कोठे यांनी केल्या. तसेच रात्री होणारे गैरप्रकार आणि चोऱ्या थांबवण्यासाठी पोलिसांनी या भागात रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत यांना फोन करून केली. पोलीस प्रशासनाने यावर तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत अर्बन स्ट्रीट पार्क परिसरात कायमस्वरूपी क्यूआर कोड बसवून पोलिसांची रोजची गस्त निश्चित करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, अजय पोन्नम, अक्षय अंजीखाने, ज्ञानेश्वर म्याकल, ऋषिकेश मेट्रे, भाजपा शहर चिटणीस नागेश सरगम, सोलापूर महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### राष्ट्रीय बंजारा परिषद; जिल्हाध्यक्षपदी डॉ. राठोड

**सोलापूर, दि. २२ मे-**



येथील डॉ. भाग्यश्री शाम राठोड यांची राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. गोर बंजारा समाजाला केंद्रबिंदू समजून त्यांच्या न्याय, हक्क, अधिकार, मानसन्मान सोबत परिस्थितीनुसार उद्भवणा-या समस्यांसाठी कार्यरत राहावे. गोर बंजारा समाजाच्या सामाजिक, शैक्षणीक, सांस्कृतीक, साहित्यक, धार्मिक, आर्थिक व राजकिय समस्या सोडवाल असे त्यांच्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे. धर्मगुरु महंत जितेंद्र महाराज, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे समन्वयक किसनराव राठोड, राष्ट्रीय बंजारा परिषद राष्ट्रीय संघटक डॉ. तुषार राठोड, राष्ट्रीय बंजारा परिषद महिला प्रदेशाध्यक्ष सीमा राठोड, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे सर्व पदाधिकारी यांनी डॉ. राठोड यांचे कौतुक केले आहे.

### भारतीय अवकाश संशोधन संस्था; काकडेची निवड

**सोलापूर, दि. २२ मे-**



भारत टॅलेंट सर्च परीक्षा २०२६ उमाबाई श्राविका विद्यालयाच्या इयत्ता सातवीतील विद्यार्थी प्रतीक प्रकाश काकडे याने १५० पैकी १४८ गुण मिळवत राज्यात द्वितीय क्रमांक तसेच जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कामगिरीच्या जोरावर त्याची प्रतिष्ठित भारतीय अवकाश संशोधन संस्था शैक्षणिक दौऱ्यासाठी निवड झाली आहे. तसेच इयत्ता सहावीतील आयान हरून तांबोळी याने १३८ गुण मिळवत राज्यात ३५वा क्रमांक व जिल्ह्यात तृतीय क्रमांक तर अथर्व विजयसिंह पाटील याने १३४ गुण मिळवत केंद्रस्तरावर प्रथम क्रमांक संपादन केला. त्यांचे संस्थेचे सचिव यतिन शहा, विश्वस्त अंजली शहा, देवई शहा, करण शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका आश्विनी पंडीत, पर्यवेक्षिक बाळासाहेब पौळ, शिक्षिका माधवी खोत व सोनाली उंडे यांनी अभिनंदन केले.

### फवारणीचे औषध पिलेल्या इसमाचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २२ मे-**

पिकावर फवारणी करण्याचे औषध पिलेल्या फुल चिंचोली गावच्या इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज शुक्रवारी सकाळी साडेनऊ वाजता मृत्यू झाला. दत्तात्रय रामचंद्र पवार (वय ४५ वर्ष, रा. फुल चिंचोली, ता पंढरपूर) असे त्या मयत इसमाचे नाव आहे. त्यांनी १९ मे रोजी सकाळी साडे आठ वाजता राहत्या घरामध्ये अज्ञात कारणावरून पिकावर फवारणी करण्याचे औषध पिले होते . याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना पंढरपूरच्या आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मुलगा अभिषेक यांनी दुपारी दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज शुक्रवारी सकाळी मृत्यू झाला.

# डिजिटल प्रणालीचा फज्जा

## अकरावी प्रवेशाचा पहिल्याच दिवशी बोजवारा

**‘अंडर मेंटेनन्स’च्या फटक्याने विद्यार्थी-पालक हैराण; रात्री उशिरापर्यंत महा-ई-सेवा केंद्रांवर गर्दी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

दहावीचा निकाल यंदा वेळेआधी जाहीर झाल्याने अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरळीत आणि वेगाने पार पडेल, अशी अपेक्षा विद्यार्थी व पालकांनी व्यक्त केली होती. मात्र, ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक बिघाडामुळे प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा उत्साह मावळला. शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर दिवसभर ‘अंडर मेंटेनन्स’चा संदेश झळकत राहिल्याने विद्यार्थ्यांना फॉर्म भरताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

अकरावी प्रवेशासाठी नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, ‘भाग-१’ फॉर्ममधील बदल तसेच कनिष्ठ महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. सकाळपासूनच विद्यार्थी आणि पालकांनी ऑनलाईन प्रक्रियेला सुरुवात केली; मात्र महाविद्यालय निवडीच्या टप्प्यावर वेबसाईट अचानक संथ झाली. काही वेळातच संपूर्ण प्रणाली ठप्प पडली आणि स्क्रीनवर ‘अंडर मेंटेनन्स’चा संदेश दिसू लागला.

दिवसभर सर्व्हर सुरळीत न झाल्याने अनेक पालक आणि विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला. घरच्या संगणकावर किंवा मोबाईलवर प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने अखेर अनेकांनी रात्री उशिरा महा-ई-सेवा केंद्रे आणि सायबर कॅफेकडे धाव घेतली. शहरातील अनेक केंद्रांवर मध्यरात्रीपर्यंत विद्यार्थ्यांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. सर्व्हरवरील ताण कमी झाल्यानंतर उशिरापर्यंत जागून पालकांनी फॉर्म भरून घेतले.

दहावीचा निकाल जाहीर होऊनही विद्यार्थ्यांना अद्याप मूळ गुणपत्रिका आणि शाळा सोडल्याचा दाखला मिळालेला नाही. त्यामुळे अंतिम प्रवेशावेळी कागदपत्रांची पूर्तता करताना आणखी अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, डिजिटल प्रणालीवर अवलंबून असलेल्या प्रवेश प्रक्रियेत नियोजनाचा अभाव आणि तांत्रिक अपयश पुन्हा एकदा समोर आले असून, विद्यार्थ्यांच्या महत्त्वाच्या शैक्षणिक टप्प्यावर प्रशासनाची ऑनलाइन व्यवस्था किती सक्षम आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे

> **विद्यार्थ्यांची फरफट**
>
> दहावीचा निकाल लवकर लावून शिक्षण विभागाने चांगले काम केले; मात्र ऑनलाइन यंत्रणा सक्षम नसेल तर विद्यार्थ्यांची अशी फरफट होत आहे. दिवसभर प्रयत्न करूनही फॉर्म भरता आला नाही. शेवटी रात्री सायबर कॅफेमध्ये जाऊन प्रक्रिया पूर्ण करावी लागली
>
> **- सौरभ पाटील, विद्यार्थी**

> **महाविद्यालय निवडीची संधी आज सायंकाळी ६ वाजेपर्यंत**
>
> दरम्यान, निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींची दखल घेत शिक्षण संचालकांनी महाविद्यालय पसंतीक्रम भरण्यासाठी मुदतवाढ जाहीर केली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांना आता २३ मे रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत महाविद्यालय निवडीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### फोटो व्हायरल करण्याची धमकी देवून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**दोघा तरुणांवर पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल**

**सोलापूर, दि. २२ मे-**

‘‘मै तुझसे प्यार करता हु ,अगर तु मुझसे बात नही करोगी तो मै तेरे फोटो व्हायरल कर दूंगा,‘‘ अशी धमकी देऊन एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना नई जिंदगी परिसरात घडली. दरम्यान या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पॉक्सोअंतर्गत दोघा तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जाफर फिरोज पठाण व शादाब शायरअली शेख ऊर्फ शादाब इरफान मुल्ला (दोघे राहणार मजरेवाडी, सोलापूर )अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत पीडित मुलीच्या आईने फिर्यादी आहे. हा प्रकार नई जिंदगी रोडवरील हॉटेलसमोर मार्च २०२६ ते ११ मे २०२६ दरम्यान घडला. आरोपी जाफर पठाण याने अल्पवयीन मुलीला भीती दाखवून प्रेमसंबंधातून बोलण्यास भाग पाडले. तसेच तिचा दुसरा साथीदार शादाब शायरअली शेख ऊर्फ शादाब इरफान मुल्ला यानेही, ‘‘तुझे आणि जाफरचे फोटो माझ्याकडे आहेत, तू त्याच्याशी बोलली नाहीस तर फोटो व्हायरल करेन,‘‘ अशी धमकी देऊन तिला मानसिक त्रास दिला व तिची छेड काढल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार गाढवे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### दुकानातून रोख रकमेसह ३५ हजाराचे साहित्य चोरीस

**सोलापूर, दि. २२ मे-**

अज्ञात चोरट्याने बंद दुकान आणि इंडस्ट्रीजमधून रोख चिल्लर पैशांसह मोटार, ग्रँडर आणि टूलबॉक्स असा एकूण ३५ हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना २१ मे रोजी सकाळी उघडकीस आली . दरम्यान याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत भरत राजू सामल (रा. लक्ष्मी नगर, नक्का वस्ती , सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.यातील फिर्यादीचे दुकान व सिद्धेश्वर इंडस्ट्रीज दि. २० मे च्या रात्री ते दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत बंद होते. ही संधी साधून अज्ञात चोरट्याने अज्ञात वेळी दुकानातील चलनी नाणी, इंडस्ट्रीज मधील ४ नग सव्हो मोटार, १ हॅन्ड ग्रँडर, जेकपाना, टुलबॉक्स मिळून एकूण ३५ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार उबाळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.



## उद्या मराठा वधू-वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

दरवर्षीप्रमाणे मराठा सेवा संघ व वधुवर परिचय कक्षाच्या वतीने रविवार दिनांक २४ मे रोजी मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा सिध्देश्वर पेठेतील डॉ निर्मलकुमार फडकुले सभागृहात सकाळी ११ ते २ या वेळेत हा मेळावा संपन्न होणार आहे.

गेल्या काही वर्षात मुलामुलींचे विवाह जमविने पालकांसाठी जिकिरीचे झाले आहे म्हणून मराठा सेवा संघ व वधू वर कक्षाच्या वतीने दरवर्षी वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. रविवारी होणारा मेळावा बत्तीसावा आहे. यावेळी वधू वरांच्या नोंदी घेऊन बायोडाटा वाचन केले जाते. उपस्थित वधू वर स्वतःचा परिचय स्वतः करून देतात या सर्व नोंदणी धारक वधू वरांची पुस्तिका तयार करू सर्वांना मोफत दिली जाते. या उपक्रमामुळे सर्वसामान्य समाजाला मदत होते. तरी सर्व समाज बांधवांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष प्रशांत पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव पवार, महानगराध्यक्ष सूर्यकांत पाटील, वधुवर कक्षाचे जिल्हाध्यक्ष अंबादास सपकाळे, शहराध्यक्ष राम माने, संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष प्रकाश ननवरे, जिल्हा सचिव लक्ष्मण महाडिक यांनी केले आहे.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी रमेश जाधव, प्रिती कदम, राजू व्यवहारे, आर पी पाटील, दत्ता जाधव, अभिंजली जाधव, वासुदेव घाटगे, अजित सगरे नवनाथ कदम,परशुराम पवार, गोवर्धन गुंड आदी प्रयत्न करत आहेत.

## १ हजार टक्के परताव्याच्या आमिषाने सोलापूरच्या व्यापाऱ्याला ६८ लाखाला गंडविले

**दोघांवर गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

शेअर मार्केट ट्रेडिंगच्या व्यवसायातून एक हजार टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून शहरातील एका व्यापाऱ्याला तब्बल ६८ लाख २६ हजार रुपयांचा गंडा घातल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला असून याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्ती व बँक खातेधारकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत किरण नागनाथ कोटा (रा. ६६ ब, रंगराज नगर, मार्केट यार्ड मागे, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली असून हा फसवणुकीचा प्रकार दि.१९ एप्रिल २०२६ रोजी ते दि. २१ मे २०२६ दरम्यान फिर्यादीच्या राहते घरी घडला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून आरोपी आशिष आणि टीना मल्होत्रा नावाच्या व्यक्तींनी फिर्यादीशी ओळख वाढवली. त्यांना जास्त नफ्याचे आमिष दाखवले. विश्वास बसावा म्हणून आरोपींनी फिर्यादीला व्हॉट्सॲपवरील १०२ इन्व्हेस्टमेंट स्ट्रॅटेजी रिसर्च इन्स्टिट्यूट या ग्रुपमध्ये घेतले. त्यानंतर आशिष आणि टीना मल्होत्रा नावाच्या व्यक्तींनी बनावट मोबाईल ॲप्लिकेशन लिंक्स पाठवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

शेअर आणि आयपीओची किंमत वाढल्याचे खोटे चित्र दाखवून आरोपींनी फिर्यादीकडून वेगवेगळ्या बँक खात्यांवर एकूण ६८ लाख २६ हजार रुपये वर्ग करून घेतले. महिनाभर रक्कम घेऊनही परतावा तर दिलाच नाही.

आरोपींनी मुद्दल रक्कम ही न दिल्याने शेवटी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादीने सायबर पोलीस ठाण्यात जाऊन संबंधित आरोपींविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने हे करत आहेत.

## विजापूर रोडवासीयांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे धाव

**महापालिकेच्या पाडकाम मोहिमेविरोधात निवेदन, कोणावर अन्याय होणार नसल्याचे आश्वासन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

सोलापूर महापालिकेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेतील पाडकाम नोटीसांविरोधात जुना विजापूर नाका ते ए.जी. पाटील कॉलेज रोड परिसरातील नागरिकांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली हे शिष्टमंडळ उपमुख्यमंत्र्यांना भेटले.



रहिवाशांनी निवेदनात म्हटले आहे की, सद्यस्थितीत रस्ता आधीच ४२ ते ५० मीटर रुंद आहे. तरीही ३०-४० वर्षे जुन्या घरांना व दुकानांना कलम ४७८ अंतर्गत नोटिसा बजावून छळ सुरू आहे. अनेक नागरिकांनी जागा रिकामी ठेवल्यास त्यावर अतिक्रमणधारक कब्जा करतात, अशी भीतीही व्यक्त केली. झोन दाखल्यात स्पष्टपणे जागा 'रस्त्याने बाधित' असल्याचे नमूद असूनही टीडीआर किंवा कोणताही मोबदला न देता पाडकाम सुरू आहे. शासन निर्णय दि. ५ ऑगस्ट २०१९ मधील तरतुदींना डावलले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवेदन स्वीकारून प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे व नागरिकांना न्याय देण्याचे व कोणावर ही अन्याय होणार नाही, असे आश्वासन महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील उप मुख्यमंत्री यांनी दिल्याचे शिष्टमंडळाने सांगितले. यावेळी शिवसेना उप शहर प्रमुख वैभव जवळकोटे, सईद तांबोळी, रमेश भोसले, दयानंद वाघमारे, विजय इंडिकर, उमेश भोसले, मिलिंद ठोंबरे, दीपक गायगवळी, राजू माने, रोहन शेलार, राहुल कुमावत, अस्लम शेख, इलियास पटवेकर आदी उपस्थित होते.

> **सामान्य माणसाची घरे पाडणे अन्यायकारक**
>
> ही वसाहत १९७६ पासून शासनमान्य झोपडपट्टी आहे. सामान्य माणसाची घरे पाडणे अन्यायकारक आहे. नियमानुसार आधी टीडीआर द्या किंवा योग्य मोबदला द्या, त्यानंतरच पुढील कारवाई करावी. गरीब व मध्यमवर्गीयांना बेघर करणे सहन केले जाणार नाही.
>
> **-डॉ. ज्योती वाघमारे, खासदार**

## अखेर विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक, कर्मचाऱ्यांचे कोट्यवधी रुपये जमा

**तरुण भारतच्या वृत्ताची वरिष्ठ कार्यालयाकडून दखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील सर्व अनुदानित महाविद्यालय व विद्यापीठातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय पेन्शन योजना आणि परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे पैसे मागील ऑगस्ट २०२५ पासून त्यांच्या खात्यावर जमा झाले नसल्याची धक्कादायक माहिती सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनने समोर आणली होती. तसे निवेदनही युनियनचे सरचिटणीस राजेंद्र गिड्डे यांच्या नेतृत्वाखाली उच्च शिक्षण सोलापूर विभागाचे सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांना दिले होते.

त्यानुसार‘‘विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक, कर्मचाऱ्यांचे कोट्यवधी रुपये रखडले,’’ असे वृत्त २० मे रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाने याची दखल घेत २१ मे रोजी कार्यवाहीही केली. एका विभागातून दुसऱ्या विभागात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत तफावत असल्यामुळे चलन जनरेट होत नव्हते.




ही त्रुटी त्यांनी दूर केली. आणि सर्वांची ही रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सोलापूर विभागीय सहसंचालक कार्यालयाने २१ व २२ मे रोजी पूर्ण केली.

१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दरमहा वेतनातून कर्मचारी हिस्सा १० टक्के आणि शासन हिस्सा १४ टक्के अशी एकूण २४ टक्के रक्कम कपात केली जाते. मात्र, मागील ९ महिन्यांपासून ही रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक ‘प्रान’ खात्यावर जमा झालेली नव्हती. यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान आणि त्यांच्यात तीव्र संतापाचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

याची दखल कॉलेज कर्मचारी युनियनने निवेदन देऊन केली होती तसेच सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांनीही एका पत्राद्वारे लक्ष वेधले होते. याची कार्यवाही न झाल्यास २७ मे पासून विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयासमोर विविध टप्प्यावर आंदोलन सुरू करण्याचा ईशारा सुटाचे अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे व प्रमुख कार्यवाह डॉ. भगवान आदटराव यांनी दिला होता.

> **वृत्तपत्रातील प्रसिद्धीमुळे न्याय**
>
> 
>
> सोलापूर विभागातील प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुमारे ७३० जणांची दरमहा पाऊने दोन कोटीची रक्कम ऑगस्ट २०२५ पासून चलन जनरेट होत नसल्यामुळे वरिष्ठ कार्यालयाकडे जमा होती नव्हती. या त्रुटीसाठी ९ महिने झाले होते. परंतु याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाची यंत्रणा हलली. अखेर ही रक्कम जमा झाली आणि आम्हांला न्याय मिळाला. याबद्दल कॉलेज कर्मचारी युनियनच्या वतीने आभार
>
> **-दत्ता भोसले, अध्यक्ष कॉलेज कर्मचारी युनियन, सोलापूर**

## ‘आयत्या वेळच्या विषयां’वरून खळबळ

**जि.प. आरोग्य, कृषी व पशुसंवर्धन विभाग रडारवर तर प्रशासन सतर्क**

**अध्यक्ष दीपक वैद्य नाराज; विभागप्रमुखांच्या कार्यपद्धतीची होणार चौकशी?**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ऐनवेळी मांडण्यात आलेल्या विषयांवरून आता प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. जिल्हा आरोग्य, कृषी आणि पशुसंवर्धन विभागांनी आयत्या वेळचे विषय सभेपुढे आणल्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, संबंधित विभाग प्रमुखांच्या कार्यपद्धतीची चौकशी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत मूळ अजेंड्यावर अकरा विषय होते. मात्र प्रत्यक्ष कामकाजादरम्यान अतिरिक्त आणि महत्त्वाचे विषय आयत्या वेळेस सभेपुढे मांडण्यात आले. विशेष म्हणजे या विषयांमध्ये आरोग्य, कृषी आणि पशुसंवर्धन विभागांचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणावर होते. यानंतर अध्यक्ष दीपक वैद्य यांनी माहिती न देता विषय सभेकडे कसे आले? असा सवाल उपस्थित करत नाराजी जाहीरपणे व्यक्त केली.



जिल्हा परिषद प्रशासनात आता सर्वाधिक चर्चा होत आहे ती आषाढी वारीसाठी प्रस्तावित औषध खरेदीच्या विषयाची. तब्बल दहा कोटी रुपयांच्या औषध खरेदीचा विषय आयत्या वेळेस आणला गेल्याने प्रशासनिक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. इतक्या मोठ्या आर्थिक बाबीचा प्रस्ताव अध्यक्षांना पूर्वकल्पना न देता सभेत कसा मांडला गेला, याबाबत पडद्यामागे जोरदार चर्चा सुरू आहे.

कृषी विभागाचाही प्रस्ताव वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. खत व बियाणे विक्री परवान्याचे अधिकार जिल्हा परिषदेला देण्याबाबतचा ठराव आयत्या वेळच्या विषयात समाविष्ट करण्यात आला. हा विषय राज्य शासनाच्या धोरणात्मक अधिकारक्षेत्राशी संबंधित असताना तो अचानक सभेत आणण्याची नेमकी गरज काय होती, असा सवाल सदस्यांमधून उपस्थित होत आहे.

दरम्यान, पशुसंवर्धन विभागानेदेखील अनेक विषय शेवटच्या क्षणी सभेत सादर केल्याने प्रशासनिक नियोजनावर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सभेची तारीख आधीच निश्चित असताना संबंधित विभागांनी वेळेत प्रस्ताव का सादर केले नाहीत, याचीही पडताळणी होण्याची शक्यता आहे. अध्यक्षांच्या नाराजीनंतर आता जिल्हा परिषद प्रशासन सतर्क झाले असून, अध्यक्षांना विश्वासात न घेता महत्त्वाचे विषय सभेत आणण्यामागे नेमकी प्रक्रिया पाळली गेली का? याची अंतर्गत चौकशी होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

जिल्हा परिषद सभागृहाच्या सचिव स्मिता पाटील यांनीही यासंदर्भात स्पष्ट केले की, आयत्या वेळचे विषय हे अध्यक्षांच्या कार्यक्षेत्रात येतात. विभाग प्रमुखांनी हे विषय सभेपुढे ठेवले आणि ते घेण्यात आले. यावर अंतिम निर्णय अध्यक्षच घेतील.या संपूर्ण प्रकरणामुळे जिल्हा परिषदेत प्रशासन विरुद्ध पदाधिकारी असा नवा वाद उभा राहण्याची चिन्हे दिसत असून, आगामी काळात विभागीय कामकाजावर अधिक नियंत्रण आणि शिस्तीची शक्यता व्यक्त केली जात आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापूर जिल्हा परिषद : पशुसंवर्धन विभागात लवकरच मेगाभरती

## ९० रिक्त पदे भरणार पशुपालकांना आणि बेरोजगार तरुणांना दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागात दीर्घकाळापासून रिक्त असलेल्या पदांमुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवा विस्कळीत होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आता भरती प्रक्रियेची आशादायक माहिती समोर आली आहे.

सोलापूर जिल्हा परिषद पशुसंवर्धन व कृषी समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी पशुसंवर्धन विभागातील सुमारे ६६ पशुवैद्यकीय अधिकारी तसेच वर्ग दोन आणि तीन या पदांचे सुमारे ९० रिक्त पदांची भरती लवकरच सुरू होणार असल्याची माहिती दिली असून, यामुळे बेरोजगार युवकांसह पशुपालकांमध्येही सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्ह्यातील अनेक पशुवैद्यकीय केंद्रांमध्ये पशुवैद्यकीय अधिकारी, परिचर तसेच इतर कर्मचाऱ्यांची पदे दीर्घकाळ रिक्त आहेत. परिणामी, जनावरांच्या उपचारासाठी शेतकरी व पशुपालकांना वेळेत सेवा मिळण्यात अडचणी येत आहेत. काही ठिकाणी एकाच अधिकाऱ्यावर अनेक केंद्रांची जबाबदारी असल्याने विभागाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याची तक्रार सातत्याने पुढे येत होती. याच प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी संबंधित पशुसंवर्धन विभागाशी चर्चा करून रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी केली आहे. शासन स्तरावर याबाबत सकारात्मक हालचाली सुरू असून भरतीबाबतची अधिकृत प्रक्रिया लवकरच सुरू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सभापती चिवडशेट्टी म्हणाले, ग्रामीण भागातील पशुपालकांना वेळेवर आणि दर्जेदार सेवा मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रिक्त पदांमुळे विभागाचे कामकाज प्रभावित होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी भरती प्रक्रिया तातडीने राबविणे आवश्यक होते आणि त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आचारसंहिता संपल्यानंतर साधारणपणे जून महिन्यानंतर भरती प्रक्रिया राबवली जाईल असे सांगितले.

दरम्यान, याबाबत पशुसंवर्धन आयुक्त डॉ.अनिल तांबे यांनी मात्र त्या पदासाठी आवश्यक असलेली पात्रता उमेदवारांमध्ये नसल्याने नोकर भरती रखडलेली आहे. वर्ग एक पशुवैद्यकीय अधिकारी हे पद शासन स्तरावर भरले जाते. त्यामुळे पदे अधिक रिक्त आहेत. त्या शैक्षणिक पात्रतेचे उमेदवार उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे सांगितले. संभाव्य भरतीमुळे पशुसंवर्धन विभागात नोकरीची तयारी करणाऱ्या युवकांमध्ये नव्याने उत्साह निर्माण झाला आहे. दुसरीकडे, ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम होऊन जनावरांच्या आरोग्य व्यवस्थेला बळ मिळेल, अशी अपेक्षा पशुपालकांकडून व्यक्त होत आहे.




एकीकडे रोजगाराच्या संधी आणि दुसरीकडे ग्रामीण सेवांची गुणवत्ता सुधारण्याची गरज या दोन्ही दृष्टिकोनातून पशुसंवर्धन विभागातील प्रस्तावित भरतीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. शासनाच्या अधिकृत निर्णयानंतर या प्रक्रियेला नेमकी किती गती मिळते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी १४४९

**जे कां सचिदानंदीं नित्यानंदू ।**
**जे कां मोक्षसिध्दी तीर्थां वंदु रे ।।**

जन्मत: कोणी लहान-मोठा असत नाही. सुदैवाने, दुर्दैवाने श्रीमंत-गरीब कुटुंबात जन्म झाला म्हणून तो जन्मानेच मोठा-लहान झाला असे मानने चुकीचे आहे. माणूस त्याच्या कर्तव्याने मोठा होतो किंवा कर्तव्याकडे पाठ फिरवल्याने लहान होतो. मानवाला मोठे होण्यासाठी कष्ट करावी लागतात. ही कष्ट योग्य दिशेने होण्यासाठी चांगल्याचा सहवास, मार्गदर्शन लाभावे लागते. अन्यथा कष्ट दिशाहिन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जगाच्या पाठीवर आपल्यांपैकीच कांही माणसं अत्यंत उच्चकोटीला पोहचलेली पहायला मिळतात. त्यांचे मोठेपण गगनालाही ठेंगणे करणारे असते. स्वकतृत्वातून ही माणसं महात्मा पदाला पोहचतात. अशाचा सहवास, अशांचे मार्गदर्शन आपणाला मानवतेच्या मार्गावर आणू शकते. असे सच्चिदानंद स्वरूप महात्मे तीर्थक्षेत्राच्या पवित्रतेला बळकटी आणतात. त्यामुळे अशा महात्म्यांना वंदन करून त्यांच्या पाऊलावर पाऊल टाकण्याचा आपण प्रयत्न करायला हवा. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**जे कां सच्चिदानंदी नित्यानंदू ।**
**जे कां मोक्षसिध्दी तीर्थां वंदू रे ।।**

दगडा-धोंड्याला गंध लावून त्याच्या पूजा पाठापेक्षा अशा चालत्या बोलत्या तीर्थक्षेत्राचे वंदन करणे, त्यांची पूजा करणे, त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळविणे योग्य असते. संसारात अडकलेल्या जीवाला माया, मोह, मत्सर, ईर्षा, द्वेष, अहंकार कांही केल्या सोडत नाहीत. आज नाही उद्यापासून चांगले वागणार आहे किंवा उद्यापासून, एक तारखेपासून, सोमवारपासून, नवीन वर्षापासून चांगले वागायचे आहे, अशी खुळचट किंवा वेळमारू वृत्ती जोपासणाऱ्या या जीवाला महात्म्यांचा सहवास लाभला पाहिजे. व्यक्तिश: त्यांचा सहवास लाभणे शक्य नसले तरी किमान त्यांनी लिहून ठेवलेल्या किंवा सांगीतलेल्या ज्ञानमार्गाचा सहवास लाभला पाहिजे. संसार बंधनातून म्हणजे आपणच बांधून घेतलेल्या नको त्या बंधनातून मुक्त झाल्याशिवाय आपणाला मानवी जीवनाचा खरा अर्थ कळणे शक्य नाही. जीवनाचा अर्थच आपल्या लक्षात आला नसेल तर खरे सुख-समाधान समजणार कसे? तीर्थक्षेत्राच्या पावित्र्याला पुष्टी देणारे किंवा बळकटी आणणारे अनेक संत महात्मे जगाच्या पाठीवर आजही आहेत. हे महात्मे आपणाला शोधत येणार नाहीत. तर आपणालाच त्यांचा शोध घ्यावा लागणार आहे. आपल्या मनाचा दृढ निश्चय झाला असेल तर अशा महात्म्यांचा शोध आपोआप लागू शकेल. मानसिकता किंवा दृढनिश्चयता हाच, यशाचा, प्राप्तीचा खरा आधारस्तंभ असल्याने व तो आपल्याच हातात असल्याने आपण त्याला पक्के केले पाहिजे. ज्ञानोबा-तुकोबांवर विश्वास असणाऱ्यांना यासाठी वेगळे काही करावे लागेल, असे मला वाटत नाही. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार,
दि. २३ मे २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अधिक, शु. तृतीया
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- अश्विनी (२४.३७)
योग - ऐंद्र (१९.०१)
करण - तैतिल (१३.१५)
राहू काल : शनिवार
स. ९.०० ते १०.३०

दिनविशेष :
१५६८: नेदरलँडचे स्पेनपासून स्वातंत्र्य मिळाले.
१७३७: पेशव्यांनी पोर्तुगीजांकडून जिंकून घेतलेला वसईचा किल्ला (किल्ल्यात) ताबा मिळवला.
१८०५: नेपोलियन बोनापार्टचा इटलीचा राजा म्हणून राज्याभिषेक झाला.
१९९५: सन मायक्रोसिस्टिम्सने 'जावा' प्रोग्रामिंग भाषा प्रकाशित केली.



# लाडकी बहिणींची ई-केवायसी प्रक्रिया बंद असून, अफवेवर विश्वास ठेवू नये

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने महिलांना आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

सोशल मीडियावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय येथे सुरू असल्याच्या अफवेमुळे नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती; त्यामुळे आज संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना भेट घेऊन प्रत्यक्ष माहिती घेऊन परिस्थिती जाणून घेतली तरी नागरिकांनी अफवावर विश्वास ठेवून या कार्यालयात गर्दी करू नये, असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे वतीने करण्यात आले.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामध्ये या योजनेच्या लाभार्थी महिलांमध्ये संभ्रम निर्माण होऊन या ठिकाणी शहर व तालुक्यातील असंख्य महिला गर्दी करीत होत्या. त्याचबरोबर तेथील झेरॉक्स दुकानदार तीन रुपयेचा केवायसी फॉर्म २५ रुपयाला विक्री करताना आढळून आले. प्रत्यक्षात त्या कार्यालयामध्ये दोन पोर्टल सुरू असून, त्या पोर्टलवर केवायसी केले आहे का? हे चेक करण्याचे काम सुरू आहे. शासनाने अडीच लाखाच्या वर उत्पन्न असेल किंवा सरकारी नोकरदार असेल किंवा ज्यांच्याकडे चार चाकी वाहन आहे व एकाच घरातील फक्त दोन महिलांना या मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजनेचा लाभ बंद करण्यात आल्याचे दाखवत आहे हे सुद्धा तेथे चेक करून सांगण्यात येत होते. जिल्हा महिला व बालकल्याण समिती कार्यालय सात रस्त्याला एका सोसायटीमध्ये भाड्याने असून, ते नागरिकांच्या गैरसोयीचे आहे. त्यामुळे हे कार्यालय जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हलवण्याची मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांना करण्यात येणार आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष मीनल दास, जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी, उत्तर तालुका प्रमुख विक्रम वानकर, जिल्हा संघटक विशाल साळुंखे उपस्थित होते.

# शस्त्र परवान्याची पडताळणी करून अनावश्यक व गरज नसलेले परवाने रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२२ मे-**

मंद्रूप पोलीस स्टेशन हद्दीत अवैध शस्त्र धारकामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हद्दीत सध्या अस्तित्वात असलेले सर्व शस्त्र परवाने तपासून त्यांच्या वैधतेची व शस्त्र धारकाच्या पात्रतेची चौकशी करण्यात यावी, तसेच वेळेत नूतनीकरण न केलेल्या धारकांचे व नूतनीकरण न केलेल्या धारकांचे परवाने व शस्त्र जप्त करण्यात यावेत, तसेच वयोवृद्ध व्यक्ती, ज्यांना आता परवान्याची गरज नाही, किंवा मयत व्यक्तीच्या नावाने शस्त्र परवाना असेल तर तो रद्द करण्यात यावा, किंवा ज्यांनी शस्त्राचा गैरवापर केलेला आहे, शस्त्राचा गैरवापर करून लोकांना दमदाटी करणे,किंवा खंडणी मागणे, खंडणीचे गुन्हे दाखल आहेत, किंवा जे लोक वैद्यकीय दृष्ट्या शस्त्र चालविण्यास सक्षम नाहीत, गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींची माहिती घेवून त्यांचा शस्त्र परवाना रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात यावा, आणि अवैध शस्त्रावर विशेष मोहीम राबवून हद्दीतील अवैध शस्त्रे जप्त करून कारवाई करावी. अशी तक्रार छावाचे तालुका अध्यक्ष गणेश मोरे यांनी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडे दिली आहे.

# मोफत सुवर्णबिंदू प्राशन कार्यक्रमास मुलांची झुंबड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

'बालकांचे आरोग्य हे उद्याच्या समाजाच्या दृष्टीने उज्वल भविष्य असून भविष्यात पुढच्या पिढीच्या आरोग्यासाठी उचललेला 'आयुर्वेदिक शिबिर' हे पहिले पाऊल म्हणायला हरकत नाही. सुवर्णबिंदू प्राशन हा आयुर्वेदिक दिव्य औषधी असून यामध्ये आयुर्वेदिक वनस्पतीचे 'ब्राम्ही', 'शंखपुष्पी', 'वचा' यांचे मिश्रण करुन यामध्ये 'मध' आणि 'तूप' घालून अत्यल्प प्रमाणात 'सुवर्णभस्म' मिश्रण केला जातो, यालाच 'सुवर्णबिंदू' म्हटले जाते.

'सुवर्णबिंदू' प्रत्येक महिन्यात 'पुष्यनक्षत्र' दिवशी आणि ठरलेल्या मुहूर्तावर देतात. जन्मलेल्या बाळापासून ते वयाच्या सोळा वर्षांपर्यंत दिले जाते. 'सुवर्णबिंदू प्राशन' याचे फायदे मुलांना लहान वयात दिल्याने बुध्दी, स्मरणशक्ती, रोग प्रतिकारशक्ती वाढून अभ्यासावरती लक्ष केंद्रित होतो. यासाठी प्रत्येक महिन्याला येणा-या 'पुष्यनक्षत्र' रोजी आपल्या मुलांना न चुकता 'सुवर्णबिंदू' पाजवावे, असे मत डॉ. शिवानी सोमा यांनी व्यक्त केल्या.

गुरुवारी गुरुपुष्यामृताचे औचित्य साधून सोलापूरातील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम व कौशल्या बहुउद्देशीय व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोमा क्लिनिक, वैष्णव मारुती मेडिकल यांच्या सहकार्याने मोफत सुवर्णबिंदू प्राशन कार्यक्रम आयोजित केले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर नगरसेवक प्रथमेश कोठे, नगरसेविका दिपीका यलदंडी, डॉ. सोमा, महापालिका परिवहनचे माजी सदस्य परशुराम भिसे, वैष्णव मारुती देवस्थानाचे अध्यक्ष भास्कर राऊळ, खजिनदार दीपक परदेशी, विश्वस्त नारायण दुभाषी, अरुण बोध्दूल, फाउंडेशन व सखी संघम'चे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी 'लकी ड्रॉ' काढून आदित्य आडम, संस्कृती दिड्डी, सुमीत फलमारी, वरुण राऊळ आणि अभिनव म्याकल या पाच विजेत्यांना प्रत्येकी एक सुवर्णबिंदू बाटली वैष्णव मारुती मेडिकल तर्फे देण्यात आले. नगरसेविका दिपीका यलदंडी यांनी स्वागत केले. वासुदेव यलदंडी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत, प्रास्ताविक करुन आभार मानले. याप्रसंगी फाउंडेशनचे श्रीनिवास कामूर्ती, किशोर व्यंकटगिरी, पुरोहित सुधीर सोमा, मल्लेशम जोगू, सतीश चिटमील, अमर सामल, पल्लवी संगा, वनिता सुरम, गीता भूदत्त, भाग्यलक्ष्मी तुम्मा, कृष्णवेणी दिड्डी, उमा परशी यांचे कार्यक्रम यशस्वीसाठी सहकार्य मिळाले. यावेळी ॲड. रोहन सोमा, भास्कर मरगल, राजेंद्र सोमा, श्रीनिवास काडगी, दर्शना सोमा, वर्षा सोमा, भावना एक्कलदेवी, नवल फलमारी आदी उपस्थित होते.



# ऑर्किड महाविद्यालयाचा प्रतिक भगवत जागतिक पातळीवर चमकला

## तीन लाखांच्या गुगल इंटर्नशीपसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

तळे हिप्परगा येथील नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, सोलापूर येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या तृतीय वर्षाचा विद्यार्थी प्रतीक भगवत याची गुगल समर कोड २०२६ या जागतिक इंटर्नशिप कार्यक्रमासाठी निवड झाली आहे.



'गुगल समर कोड २०२६' हा गुगलतर्फे आयोजित करण्यात येणारा जागतिक ऑनलाइन कार्यक्रम असून, विद्यार्थ्यांना ओपन-सोर्स सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट क्षेत्रात काम करण्याची संधी देतो, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय ओपन सोर्स संस्थांमध्ये अनुभवी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाइन पद्धतीने काम करण्याची संधी मिळते.

या ऑनलाईन कार्यक्रमामध्ये यावर्षी विद्यार्थ्यांचा विक्रमी सहभाग नोंदविण्यात आला होता. जगभरातील मधून तब्बल १५,२४५ प्रस्ताव आले होते, यापैकी केवळ १,१५४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. भारतातुन या संस्थेसाठी निवडण्यात आलेल्या ४०१ विद्यार्थ्यांमध्ये प्रतीक भागवत याचा समावेश आहे. प्रतीक भगवत यांची निवड स्टँर्डड लायब्ररी या नामांकित ओपन-सोर्स संस्थेमध्ये 'लिनीयर अलजिब्रा' पॅकेज या प्रोजेक्टसाठी निवड झाली आहे. लिनीयर अलजिब्रा पॅकेजचा उपयोग मॅट्रिक्स आधारित गणितीय समस्या आणि लिनीयर इक्वेशन्स सोडविण्यासाठी केला जातो. या इंटर्नशिपचा कालावधी सुमारे ३ महिने असून, गुगलतर्फे यशस्वी मूल्यमापनानंतर अंदाजे ३ लाख विद्यावेतन दिले जाणार आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व सचिव प्रतीक भगवत प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. एस. एस. मेतन, उपप्राचार्य डॉ. व्ही. के. पत्की तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकॉम्युनिकेशन विभागाचे विभागप्रमुख प्रा. एस. एस. धोत्रे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी

## सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत पाटील

## जिल्ह्यात विधान परिषद निवडणुकीसाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ निवडणूकचा कार्यक्रम १८ मे रोजी जाहीर झालेला आहे. या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात निवडणूक काम काजासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या आदेशान्वये नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

निवडणुकीदरम्यान सर्व काम काज पारदर्शक व सुरळीत पार पडावे यासाठी आवश्यक ती जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्या जबाबदारीची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत पाटील यांनी देऊन सर्व नोडल अधिकाऱ्यांनी परस्परात समन्वय ठेवून काटेकोरपणे कामे करावीत, असे आवाहन केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित विधान परिषद निवडणूक नोडल अधिकारी आढावा बैठकीत पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, पोलीस उपयुक्त अश्विनी पाटील, समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त विना पवार, जिल्हा प्रशासनाधिकारी नगरपालिका योगेश डोके, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी रवी पवार, तहसीलदार दिनेश पारगे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. निवडणुकीदरम्यान मनुष्यबळ व्यवस्थापन, प्रशिक्षण, साहित्य, वाहतूक, सायबर सुरक्षा, SVEEP योजना, कायदा व सुव्यवस्था, आचारसंहिता पालन, खर्च निरीक्षण, मतपत्रिका व पोस्टल बॅलेट, माध्यम व्यवस्थापन, तक्रार निवारण, निरीक्षक समन्वय, दिव्यांग मतदार सुविधा, एएमएफ, स्ट्रॉंग रूम व मतमोजणी केंद्र, सीमा व्यवस्थापन, दारू नियंत्रण, अन्न व्यवस्थापन, वन विंडो प्रणाली, जिल्हा नियंत्रण केंद्र, सूक्ष्म निरीक्षक, सोशल मीडिया निरीक्षण व वैद्यकीय सुविधा अशा २८ क्षेत्रांसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत, असे पाटील यांनी सांगून सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांना दिलेल्या जबाबदाऱ्याची माहिती दिली.

# सोलापूरला अखेर मिळाले पूर्णवेळ जिल्हा क्रीडाधिकारी

## प्रकाश मोहारे यांच्यासमोर क्रीडा विकासाचे आव्हान



गेल्या वर्षभरापासून सोलापूरला पूर्णवेळ जिल्हा क्रीडाधिकारी नसल्यामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रातील अनेक महत्त्वाचे प्रकल्प आणि निर्णय रखडले होते. क्रीडाप्रेमींच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर अखेर सोलापूरला पूर्णवेळ जिल्हा क्रीडाधिकारी मिळाले आहेत. आंतरराष्ट्रीय दिव्यांग पॉवरलिफ्टिंग खेळाडू व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रकाश मोहारे हे पदोन्नतीने जिल्हा क्रीडाधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. एक खेळाडू म्हणून त्यांच्या नियुक्तीचे स्वागत होत असले, तरी सोलापूरच्या क्रीडा क्षेत्रातील रखडलेल्या बाबी मार्गी लावण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे.

### विजापूर रस्त्यावरील जलतरण तलाव तातडीने सुरू करणे

२५ ऑगस्ट २०२५ रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनुसार जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या मालकीचा विजापूर रस्त्यावरील सुंदरम नगर येथील जलतरण तलाव बीओटी तत्त्वावर चालवण्याचा निर्णय झाला. त्यानुसार ५ डिसेंबर २०२५ रोजी हा तलाव ठाण्याच्या फिनिक्स फाउंडेशनकडे हस्तांतरित करण्यात आला. संस्थेने दुरुस्तीचे काम सुरू केले खरे; मात्र आवश्यक सुरक्षा ठेव भरण्याचे पत्र मिळताच त्यांनी काम बंद करून तलावाला कुलूप ठोकले. जिल्हा क्रीडा कार्यालयाने १० मार्च २०२६ रोजी स्मरणपत्र पाठवूनही प्रतिसाद न मिळाल्याने, १६ मार्च २०२६ रोजी या संस्थेला ब्लॅक लिस्ट (काळ्या यादीत) का टाकू नये? अशी नोटीस बजावण्यात आली आहे. आता पुढील कायदेशीर प्रक्रिया गतिमान करून हा तलाव नागरिकांसाठी आणि खेळाडूंसाठी लवकर सुरू करण्याचे आव्हान मोहारे यांच्यासमोर आहे.

### जिल्हा युवा व क्रीडा पुरस्कारांचे रखडलेले वितरण

नियमाप्रमाणे जिल्हा क्रीडा पुरस्कार २६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होऊन त्यांचे वितरण होणे गरजेचे होते, परंतु आचारसंहितेमुळे ते रखडले. त्यानंतर १ मे २०२६ रोजी हे पुरस्कार दिले जातील अशी अपेक्षा होती. मात्र, जिल्हा युवा पुरस्कारांसाठी पुरेसे अर्ज न आल्याचे कारण पुढे करत क्रीडा पुरस्कारही पुढे ढकलण्यात आले. वास्तव पाहता, दोन्ही पुरस्कार वेगळे असताना क्रीडा पुरस्कार रोखण्याची गरज नव्हती. आता हे दोन्ही पुरस्कार आगामी १५ ऑगस्ट २०२६ रोजी सन्मानाने वितरित व्हावेत, अशी क्रीडा क्षेत्रातून अपेक्षा आहे.

### मोहोळ तालुका क्रीडा संकुलाचा तिढा सोडवणे

सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी मोहोळ वगळता १० तालुक्यांमध्ये क्रीडा संकुले अस्तित्वात आहेत. सर्व आमदार या संकुलांचे अध्यक्ष आहेत. सर्वात आधी सुरू झालेल्या पंढरपूर क्रीडा संकुलाचा योग्य वापर होत नाही, तर सांगोला, मंगळवेढा आणि अक्कलकोट या तीन संकुलांचा वापर उत्तम सुरू आहे. मोहोळ संकुलासाठी शहरातील डंपिंग यार्डची ७ एकर जागा मंजूर झाली होती आणि ५ कोटींपैकी ३ कोटींचा निधीही आला होता. मात्र, या जागेतून शक्तीपीठ महामार्ग गेल्यामुळे आता महात्मा फुले कृषी विद्यापीठाची जागा मागण्यात आली आहे. सोलापूरला आता राहुल गायकवाड व सचिन रणदिवे हे २ नवीन तालुका क्रीडाधिकारी मिळाले आहेत. त्यांच्या मदतीने मोहोळच्या जागेचा तिढा सोडवणे आणि इतर संकुलांच्या कामाला गती देणे आवश्यक आहे.



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**



### व्यायामशाळा अनुदान मंजुरीत पारदर्शकता आणणे

क्रीडांगण व व्यायामशाळा विकास अनुदानासाठी आलेल्या प्रस्तावांची तपासणी करून विभागीय उपसंचालकांकडून तांत्रिक मान्यता घेणे, त्यानंतर सेवाज्येष्ठतेनुसार यादी तयार करून जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक आहे. मात्र, तत्कालीन जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी ही कायदेशीर क्रमवारी डावलून केवळ आमदारांचे शिफारस पत्र असलेल्या संस्थांच्या प्रस्तावांना मंजुरी दिल्याचा आरोप झाला होता. या गैरप्रकाराला आळा घालून पारदर्शक पद्धतीने काम करणे मोहाळे यांच्यासाठी गरजेचे आहे.

### रिक्त पदांचे ग्रहण आणि जबाबदारी

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये ४९ अनुदानित आणि ४४ विनाअनुदानित अशा एकूण ९३ खेळांच्या आयोजनाची मोठी जबाबदारी या कार्यालयावर असते. असे असतानाही सध्या कार्यालयात ३ क्रीडा मार्गदर्शक, २ क्रीडा अधिकारी, १ बार्शी तालुका क्रीडा अधिकारी आणि १ वरिष्ठ लिपिक अशी एकूण ७ पदे रिक्त आहेत. हॉकीच्या क्रीडा मार्गर्शिका वैशाली सुळ या डेप्युटेशनवर पुण्यात काम करत आहेत. त्यामुळे जिल्हा क्रीडाधिकारी प्रकाश मोहारे यांना सध्या उपलब्ध असलेल्या तोकड्या मनुष्यबळाच्या जोरावरच जिल्ह्याच्या क्रीडा विकासाचा गाडा हाकावा लागणार आहे.

## महत्वाचे...



## पंढरपुरात अवैधवाळू विरुद्ध कारवाई; ४७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पंढरपूर, दि. २२ मे-**

येथील तालुका पोलिसांनीअवैध वाळू माफियाविरुद्ध मोठी कारवाई केली असून या कारवाईमध्ये तब्बल ४७ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली. या कारवाई संदर्भात माहिती देतानापोलिस निरीक्षक मुजावर यांनी सांगितले की, येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत दगडे यांच्या मार्गदर्शनाखालीपंढरपूर तालुका पोलिसांनी तालुक्यातील शेगाव दुमला गावात एक टेम्पो गाडी, एक ट्रॅक्टर व वाळू उपसा करण्यासाठी लागणारी यारी किंमत ११ लाख ५० हजार तसेच तालुक्यातील आंबे गावातून ५० हजाररुपये किंमतीचा १२५ ब्रास वाळूचासाठा या बरोबरच एक टिप्पर किंमत २८ लाख रुपये त्यामध्ये पाच ब्रास वाळूकिंमत ३० हजार तसेच एकटिप्पर, एक एंट्रा टेम्पो, एक ट्रॅक्टर वएकूण १३० ब्रास वाळू असा एकूण किंमत रुपये ४७ लाख रुपयांचा वाहने व वाळूसाठा पंढरपूर तालुका पोलिस आणि जप्त करून मोठी कारवाई केली आहे. पंढरपूर तालुका पोलिसांनी टेम्पो, ट्रॅक्टर आणि टिप्पर याचे चालक आणि मालक व वाळू साठा करणारे आरोपी विरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी गोसावी, अक्षय सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, एएसआयआबा शेंडगे, पोलीस हवालदार सुहास देशमुख, दीपक मंगेश रोकडे, भोसले, सचिन गावडे सागर गवळी, पोलीस चालक राम चाटे, हसन नदाफ व गोडसे यांच्या पथकाने केली.



## सर्वंकष लैंगिकता शिक्षणाने कृतिशील तरुणाईला मिळाला सक्षम मार्ग

**सोलापूर, दि. २२ मे-**

आजच्या तरुण पिढीसमोर सोशल मीडियाचे वाढते व्यसन, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, सायबर गुन्हे, लैंगिक शोषण आणि मानसिक तणाव यांसारखी गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. अशा परिस्थितीत युवकांना योग्य दिशा देण्यासाठी सर्वंकष लैंगिकता शिक्षण अत्यंत आवश्यक असून, हे शिक्षणच सजग, सुदृढ आणि जबाबदार समाज घडविण्यासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, असे मत युवा (तरुणाई) शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सहभागी युवक-युवतींनी व्यक्त केले. सोलापूर शहरातील कामगार वसाहतीमध्ये राहणाऱ्या युवक युवतींसाठी दहा दिवशीय युवा शिबिराचे आयोजन सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र विनायक नगर येथे सारथी युथ फाऊंडेशन यांच्यावतीने करण्यात आले आहे. प्रिसिजन फाउंडेशन, सोलापूर आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने सारथी युथ फाऊंडेशन येथे शिबीराच्या दुसऱ्या दिवशी सर्वंकष लैंगिकता शिक्षण प्रशिक्षण घेण्यात आले. कार्यक्रमास सारथी युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष जावेद नगारे, सचिव रामचंद्र वाघमारे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या दूरदृष्टीतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, आरोग्याविषयी जागरूकता आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होत असल्याचे मत वीरेंद्र परदेशी यांनी व्यक्त केले. शिबिरात कम्युनिटी मोबिलायझर सत्यभामा कांबळे, विकी शिवशरण, संध्या वाघमारे तसेच लॅब टेक्निशियन प्रीती चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणीही करण्यात आली. प्रिसिजन फाउंडेशनचे जनसंपर्क व्यवस्थापक नितीन फलटणकर आणि वैशाली बनसोडे यांच्या नियोजनातून कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक रामचंद्र वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन कांचनी सुरवसे यांनी केले तर आभार योगेश हसरभावे यांनी मानले.

## कळमन येथे फवारणीचे औषध पिऊन एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. २२ मे-**

दारूच्या नशेत फवारणीचे औषध पिऊन एका ५५ वर्षीय इसमाने आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावात घडली. रमेश नागनाथ लंबे (वय ५५ वर्ष, रा. कळमन, उत्तर सोलापूर) असे त्या मयत व्यक्तीचे नाव असून त्यांनी गुरुवारी सकाळी राहत्या घरामध्ये दारूच्या नशेत पिकावर फवारणी करण्याचे औषध पिले होते. याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना वडाळा येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मुलगा शिवाजी लंबे याने दुपारी दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान शुक्रवारी पहाटे एक वाजता मृत्यू झाला.

## लग्नाच्या आमिषाने तरुणीवर अत्याचार; तरुणावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ मे-**

लग्न करण्याचे आमिष दाखवून एका तीस वर्षांच्या तरुणीवर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी सलगर वस्ती पोलिस ठाण्यात एका तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल शशीकांत गायकवाड (वय ३२, रा. वसंत जाधव पार्क, आरटीओ रोड, सोलापूर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत खुद्द पीडित तरुणीने फिर्याद दिली आहे. २०२२ मध्ये यातील आरोपी व यातील फिर्यादी तरुणीची ओळख झाली होती. या ओळखीतून आरोपीने जवळीकता वाढवून लग्नाचे आमिष दाखवून २०२२ ते २०२६ या दरम्यान फिर्यादीच्या घरी, शहरा जवळील लॉज येथे नेऊन लैंगिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे .दरम्यान या प्रकरणी बलात्काराचा गुन्हा दाखल होताच संबंधित आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे . सहाय्यक पोलीस निरीक्षक खामकर या गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# बकरी ईद निमित्त जनावरांच्या वाहतुकीसाठी प्रमाणपत्र बंधनकारक

**निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील; सण शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

बकरी ईद हा सण दि. २७ मे रोजी साजरा होत असून दि. २७ ते दि. २९ मे २०२६ या कालावधीत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जनावरांची खरेदी-विक्री होणार आहे. यासाठी बाजार भरविण्यात येणार असून जनावरांच्या वाहतुकीसाठी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी म्हटले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बकरी ईद २०२६ निमित्त महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा १९७६ व महाराष्ट्र प्रार्य रक्षण सुधारणा कायदा १९९५ च्या अमलबजावणीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत निवासी जिल्हाधिकारी पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वसीम बुऱ्हाण, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. अनिल तांबे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अत्तिक मुलानी, महापालिकेचे मंडई नियंत्रण अधिकारी तपन डंके, पशुसंवर्धनचे डॉ. डी. ए. गिड्डे, सामाजिक संघटनाचे प्रतिनिधी हबीब भाई नदाफ, हाजी कुरेशी, इस्माईल पठाण आदी उपस्थित होते.

जनावरांची अवैध कत्तल व अवैध वाहतूक रोखण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलिस विभाग, पर्यावरण विभाग व पशुसंवर्धन विभाग यांनी समन्वय साधून कार्यवाही करावी. ईद सणाच्या काळात मार्गदर्शक सूचना व शासन निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक असून कायदा व स्वास्थ्य तपासणी बाबत राहणाऱ्या त्रुटीचे निराकरण करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करणे गरजेचे आहे, असे पाटील यांनी सांगितले.




महापालिकेचे मंडई नियंत्रण अधिकारी डंके यांनी बकरी ईद निमित्त लहान मोठ्या जनावरांची कुर्बानी देण्यासाठी फॉरेस्ट मटन मार्केट येथे व्यवस्था करण्यात आली असून पाण्याचे टँकरही उपलब्ध करून देण्यात येतील, असे सांगितले. जिल्हा उपयुक्त पशुसंवर्धन डॉक्टर तांबे म्हणाले की, महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) कायदा, १९९५ अंतर्गत गाय, वळू, बैल यांच्या कत्तलीस व वाहतुकीस बंदी आहे. जनावरांची वाहतूक करत असताना जनावरांची वाहतूक अधिनियम, २००१मधील नियम क्र.१६ नुसार वाहतूक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. प्राणी छळ प्रतिबंधक कायदा, १९६० व वाहतूक अधिनियम १९७८ मधील नियम ४७ नुसार जनावरांची स्वास्थ्य तपासणी करून न्यायालयीन प्रेषण आवश्यक आहे. ईद सणाच्या वाहतूक करत असताना प्राणी छळ प्रतिबंधक कायदा, १९६० मधील वाहतूक नियमांमधील तसेच पशुसंवर्धन विभाग, पर्यावरण विभाग व पशुसंवर्धन विभाग यांच्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे, असे सांगितले. अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य बुऱ्हाण यांनी छोट्या बकऱ्यांना घरीच कुर्बानी देण्याची परवानगी प्रशासनाकडे मागितली. तसेच हसीफ भाई नदाफ यांनी सोलापूर महापालिकेने मोठ्या जनावर साठी पुढील काळात त्वरित आधुनिक कत्तलखाना निर्माण करण्याची मागणी केली. तसेच अन्य सदस्यांनी बकरी ईद सण शांततेत साजरा करण्यासाठी विविध सूचना मांडल्या.

## सोलापुरात नारी पॅड बँकचे उद्घाटन

**कष्टकरी महिलांना वर्षभर १०० रुपयांत सॅनिटरी पॅड**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

शहरी झोपडपट्टी व ग्रामीण भागातील कष्टकरी, असंघटित श्रमिक महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी सोलापुरात 'नारी पॅड बँक' सुरू करण्यात आली. VCWFCF विशेष सेवा केंद्र, सक्षम फाऊंडेशन व अंधरूढी संस्था, सोलापूर यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात येत आहे.



संस्थेचे राज्य प्रबंधक रमण शर्मा यांच्या हस्ते पॅड बँकेचे औपचारिक उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी आरोग्य व स्वच्छतेचे महत्त्व विशद करून संस्थेमार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

नागपूर येथील सपना भगत यांनी मासिक पाळीदरम्यान होणारा त्रास, सॅनिटरी पॅडचे महत्त्व, घ्यावयाची काळजी व आरोग्य संरक्षण याविषयी महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या संयोजक व जिल्हा समन्वयक सुजाता यशवंत फडतरे म्हणाल्या, महिलांचे आरोग्य हाच कुटुंब व समाजाच्या विकासाचा आधार आहे. म्हणूनच कष्टकरी, असंघटित श्रमिक महिलांना नाममात्र १०० रुपयांत वर्षभर सॅनिटरी पॅड उपलब्ध करून देणार आहोत. मेळाव्यास लक्ष्मी वाघमारे, भाग्यश्री गायगवळी, क्रांती आठवले, सुषमा कांबळे, शकीला लवंगी, चंदा आठवले, सुरेखा जगताप उपस्थित होत्या.



## ग्रीन मिशन अंतर्गत ५ हजार रोपांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

प्रसिद्ध गॅस्ट्रोलॉजिस्ट डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या संकल्पनेतून मल्टिस्ट्रीट अर्बन पार्क, अक्कलकोट रोड येथे राबविण्यात आला. 'सोलापूर ग्रीन मिशन' अंतर्गत एक घर-एक झाड या संकल्पनेतून तब्बल पाच हजार रोपांचे वाटप करण्यात आले.

सोलापूर शहरातील वाढते तापमान आणि प्रदूषणाची गंभीर समस्या लक्षात घेता, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने आपल्या घरासमोर किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, नगरसेवक मेघनाथ येमूल, प्रवीण तळे(पर्यावरण अभ्यासक), ज्ञानेश्वर म्याकल, सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, शेखर ईगे, अक्षय अंजिखाने, ऋषिकेश मेट्रे, राजश्री धोडमणी, अजय पोन्नम, राजमहेंद्र कमटम, वासुदेव इप्पलपल्ली उपस्थित होते.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा अखेर मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या एका पादचारी इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज शुक्रवारी दुपारी बारा वाजता मृत्यू झाला. मदन लालप्पा माने (वय ६० वर्ष, रा. टेंभुर्णी, ता. माढा) असे त्या मयत पादचारी वृद्धाचे नाव असून ते १६ मे रोजी सायंकाळी पाच वाजता टेंभुर्णी येथे हायवेवरून चालत जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना धडक मारली होती. यात ते मार लागून गंभीर जखमी झाल्याने त्यांना टेंभुर्णी येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांचा उपचारादरम्यान शुक्रवारी दुपारी मृत्यू झाला.

### महापालिकेतील भंगार चोरी प्रकरण

## आरोपी जगन्नाथ बनसोडेचा अंतरिम जामिनाचा अर्ज माघारी

**अटकेची कारवाई टळताच आरोपी जगन्नाथ बनसोडे झाले कामावर रुजू**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

अतिक्रमण कारवाईत जप्त केलेला भंगार साहित्य महानगरपालिकेच्या भांडार कक्षामधून बेकायदा चोरून नेल्या प्रकरणी अतिक्रमण विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडेंसह आठ जणांवर सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणात अटक टाळण्यासाठी बनसोडे यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल करून अंतरिम जामिनाची मागणी केली होती. या प्रकरणी आज गुरुवारी अंतिम निर्णय येण्याची शक्यता होती.मात्र पोलिसांनी आरोपी बनसोडे यास अटकेची आवश्यकता नसल्याची नोटीस दिली. यामुळे आरोपीचे वकील निलेश जोशी यांनी बनसोडे याचा अंतरिम जामिनाचा अर्ज माघारी घेतला आहे.

याबाबत सदर बजार पोलिसांनी अतिक्रमण प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांना अटक करण्याची आवश्यकता नसल्याची नोटीस दिली. ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून त्यांचा अंतरिम जामिनाचा अर्ज बनसोडेंचे वकील ॲड. निलेश जोशी यांनी माघारी घेतला. या प्रकरणात आरोपीचे वकील ॲड. जोशी यांनी बनसोडे यांना गुंतवले असून चोरी झाल्याबाबत कोणतीही कागदपत्रे व वस्तूंची शहानिशा न करता घाईगडबडीने दबावापोटी गुन्हा दाखल केल्याचा युक्तिवाद केला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन पाटील हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

> दरम्यान या प्रकरणात आपणावर अटकेची कारवाई होणारच नसल्याचे लक्षात आल्यावर आरोपी असलेले अतिक्रमण विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे हे आज गुरुवारी सायंकाळी आपल्या कार्यालयात कामावर रुजू झाले होते.



## गुणवंत विद्यार्थ्यांचा घरी जाऊन केला सन्मान

**खुनेश्वर येथील बाबूराव पाटील विद्यालयाचा उपक्रम**

**सोलापूर, दि. २२ मे-**

गुणवंत विद्यार्थी हे शाळेचे भूषण असतात. हे लक्षात घेऊन दहावीच्या परीक्षेत ९०.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकविलेल्या अमृता संजयकुमार वाघमारे या विद्यार्थिनीचा शाळेने तिच्या घरी जाऊन सत्कार केला. खुनेश्वर येथील बाबूराव आण्णा पाटील विद्यालय हा आगळावेगळा उपक्रम राबवित आहे. अमृता वाघमारे या विद्यार्थिनीचा पहिला क्रमांक आला.मात्र ती आजोळी गेली होती. दोन दिवसांपूर्वी ती खुनेश्वर गावी परतली आणि शाळेचे मुख्याध्यापक संजय डोंगरे, शिक्षक विलास पासले, कालिदास खोत, विजय सरक, सुजितकुमार पासले हे अमृताच्या घरी गेले आणि तिचा सन्मान केला. यावेळी आमृताचे वडील संजयकुमार वाघमारे, आई सीमा वाघमारे उपस्थित होत्या. मुख्याध्यापक डोंगरे म्हणाले की, गुणवंत विद्यार्थी हे त्या शाळेची शान, आणि भूषण असतात. दहावीत पहिला क्रमांक पटकविलेल्या विद्यार्थाचा आम्ही शाळेत तर सत्कार करतो मात्र त्या विद्यार्थ्याचा विशेष सन्मान म्हणून आम्ही त्यांच्या घरी जाऊन सत्कार करतो.

## ओन्ली संस्था विशेष पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ मे-**

छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीराजे युवा मंच उपळाई रोड, बार्शी आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध वक्ते नितीन बानुगडे-पाटील यांच्या हस्ते ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी या संस्थेचा विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

ही संस्था गेल्या सहा वर्षांपासून संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. त्याचबरोबर गरजू लोकांना विविध प्रकारे मदतही करत आहेत.

नुकतेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १४ मे रोजी आयोजित रक्तदान शिबिरामध्ये या संस्थेच्या पुढाकाराने २०१ ऐच्छिक रक्तदात्यांनी रक्तदान केले म्हणून या सर्व सामाजिक, शैक्षणिक आणि राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन या संस्थेस छत्रपती संभाजीराजे युवा मंच यांच्याकडून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वीकारण्यासाठी संस्थेचे सहसचिव नागनाथ सोनवणे, सदस्य सुनील फल्ले, प्रा. रतिकांत हामणे, प्रा. डॉ. चंद्रकांत उलभगत व अनन्या उलभगत हे उपस्थित होते.

## वैरागात प्रतिबंधित गुटखा-पानमसाला जप्त; एकाला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ मे-**

वैराग पोलिसांच्या पेट्रोलिंग दरम्यान मौजे भातंबरे येथे मोठा प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. शेख हसिफ अल्लाउद्दीन (रा. आंबेहोळ, ता.जि. धाराशिव) याच्या ताब्यातून हिरो स्प्लेंडर दुचाकीवरून (क्रमांक चक-२५ ण-७३६६) विविध प्रकारचे प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचे पाकिटे आढळून आले.

दि. २१ मे रोजी सकाळी ९.२५ वाजता वैराग पोलीस ठाण्याचे निरीक्षक कुंदन गायडे यांच्या पथकाने ही कारवाई केली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे १.१८ लाख रुपये इतकी आहे. यात डायरेक्टर स्पेशल पानमसाला, केआर-१००० गुटखा, नप-०१ जाफरानी जर्दा, विनालेबल व एक्स्ट्रा फ्रेशनेश सुगंधित तंबाखू, शॉट लक्झरी चूइंग तंबाखू, बादशाह गुटखा, विमल पानमसाला आदी विविध ब्रँड्सचा समावेश आहे. अन्न सुरक्षा अधिकारी रामानंद उमाशंकर स्वामी यांनी मुद्देमालाची पाहणी केली असता तो महाराष्ट्र शासनाच्या १६ जुलै २०२५ च्या अधिसूचनेनुसार प्रतिबंधित असल्याचे स्पष्ट झाले. आरोपीने मुद्देमाल स्वतःचा असल्याचे कबूल केले, परंतु खरेदी बिल किंवा वाहन कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगितले. या प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या कलम २६(२), २७(३), ३०(२) आदी सह कलम ५९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३, २७४, २७५ आदींखालीही



कारवाई करण्यात येत आहे. आरोपीविरुद्ध वैराग पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे. पोलिसांनी मुद्देमाल व वाहन पुढील आदेशापर्यंत ताब्यात घेतले आहे. सदर कारवाईमुळे जिल्ह्यातील प्रतिबंधित तंबाखू उत्पादनांच्या अवैध वाहतूक व विक्रीवर आळा बसण्यास मदत होईल, असे अन्न सुरक्षा विभागाकडून सांगण्यात आले.



## एन.एम. वाडीया चॅरिटेबल हॉस्पिटलला रुग्णवाहीका भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

सामाजिक बांधिलकी जपत बालाजी फाऊंडेशन व एस.व्ही.एस मेडीकेअर प्रा लि यांचे वतीने एन एम वाडीया हॉस्पीटल सोलापूर यांना अत्याधुनिक ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट पेडियाट्रिक रुग्णवाहीकाभेट देण्यात आली. आपतकालीन वैदयकिय सेवेसाठी ही रुग्णवाहीका उपयुक्त ठरणार आहे. त्या मध्ये व्हेन्टीलेटर, पॅरामॉनेटर, सिरींज पंप, सक्शन मशीन, ऑक्सीजन सिलेंडर, ऑक्सीजन डिलिव्हरी सिस्टम, तसेच इतर अत्यावश्यक सुविधा आहेत. बालाजी फांऊडेशनेचे सचिव राम रेड्डी व उपाध्यक्ष जी. सृजन रेडडी यांच्या हस्ते रुग्णवाहीकेची पुजा करून एन एम वाडीया चॅरिटेबल हॉस्पीटलच्या संचालक मंडळाकडे रुग्णवाहीकेचे हस्तांरण करण्यात आले. कार्यक्रमास एन एम वाडिया चॅरिटेबल ट्रस्ट चे पदाधिकारी सचिव श्री शिरिष गोडबोले, नितिन हबीब, डॉ संदिप भागवत, डॉ शिरिष कुमठेकर, सी ए राजगोपाल मिणियार, कल्पेश झवेरी, राजेश गांधी , बालाजी फाऊडेशन चे पवन ताटी, मनोहर वलसा, दत्तप्रसाद सांजेकर, सचीन देशपांडे उपस्थित होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## टेंभुर्णीत छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

**टेंभुर्णी, दि. २२ मे -**

टेंभुर्णी येथील छावा चौकातील छत्रपती संभाजी महाराजांच्या भव्य स्मारक परिसरात यंदाही महाराजांची जयंती उत्साहात साजरी झाली.

जयंतीनिमित्त १४ मे रोजी भव्य रक्तदान शिबिर झाले. युवकांनी मोठ्या प्रमाणावर रक्तदान केले. २० मे रोजी संध्याकाळी छावा चौकातून भव्य मिरवणुक काढण्यात आली. छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती



पुतळ्याचे पूजन करून मिरवणुकीचे उद्घाटन झाले. मिरवणुकीत छत्रपती संभाजी महाराजांची भव्य मूर्ती लक्ष वेधून घेत होती. ढोल-ताशा पथके, भगवे ध्वज, पारंपरिक वेशभूषा आणि महाराजांच्या पराक्रमाचे दर्शन घडविणारे जिवंत देखावे आकर्षण ठरले. छत्रपती संभाजी महाराजांचा जिवंत देखावा पाहण्यासाठी शिवप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. ''जय भवानी, जय शिवाजी'', ''धर्मवीर संभाजी महाराज की जय'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

छत्रपती संभाजी महाराज स्मारक समितीच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



### महत्त्वाचे...



## शंभुराजांच्या जीवन चरित्रावर बानुगडे पाटील यांचे व्याख्यान

**बार्शी, दि. २२ मे -**

छत्रपती संभाजीराजे युवा मंचतर्फे बार्शीमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी झाली. यामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन होते. १४ मे रोजी युवा नेते रणवीर राऊत यांच्या हस्ते मूर्ती पूजन व महाप्रसाद आयोजित केला होता. १९ मे रोजी प्रा. नितीन बानगुडे पाटील यांचे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यानास शंभुभक्तांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. नितीन बानगुडे पाटील यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास डोळ्यासमोर उभा केला. शेवटचा प्रसंग बानगुडे पाटील यांच्या वाणीतून ऐकताना अनेकांच्या अंगावर शहारे आले होते. यावेळी सामाजिक संघटनांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख उपस्थिती म्हणून नगरसेवक विजय राऊत, प्रशांत कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, मदन गव्हाणे, महेश देशमुख, घोडके , संदेश काकडे, संतोष बारंगुळे, वैभव पाटील, विश्वरुपा शेळके, शालन झांबरे, प्रतिष्ठित नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीराजे युवा मंच अध्यक्ष ऋषिकेश कदम, भैय्या सांगडे, बबलू पाटील, बाळा बोधले, अमित गुरव, चंदन लांडगे, विजय कोलगे, प्रेम जगदाळे, ओंकार मिसाळ, ओंकार भांडवलकर, पवन कदम, आदित्य कदम, मनीष कदम, आमय जगताप, ऋषी काकडे, सुमित गुरव, समर्थ नलावडे, अमोल गुंड, अमित जगदाळे, श्रेयस जेवरे, विराज शेळके, अनुज कांदे, स्वप्नील गव्हाणे, सुमित गायकवाड, अनिकेत बेडकुटे, रोहित वायकर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संदीप मिरगणे व पंकज ठाकरे यांनी केले.

## स्वीकृत सदस्यांच्या निवडीला ब्रेक

### जिल्हा परिषद; आचारसंहितेमुळे प्रक्रिया स्थगित, इच्छुक पुन्हा 'वेट अँड वॉच' मोडमध्ये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे -**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून वर्णी लागण्याची अपेक्षा बाळगून राजकीय मोर्चेबांधणी करणाऱ्या इच्छुकांना विधान परिषद आचारसंहितेचा मोठा फटका बसला आहे. राज्य सरकारने स्वीकृत सदस्य निवडीसाठी आवश्यक राजपत्र, नियमावली आणि प्रक्रिया अंतिम टप्प्यात आणली असतानाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाली. परिणामी, लागू आचारसंहितेमुळे स्वीकृत सदस्य निवडीची प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.

मे अखेरीस जिल्हा परिषद व पंचायत समित्यांतील स्वीकृत सदस्यांची निवड होईल, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात होती. अनेक इच्छुकांनी आपल्या पक्षीय नेत्यांमार्फत लॉबिंगही सुरू केले होते. मात्र, निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने प्रशासनाला ही प्रक्रिया थांबवावी लागली आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले असून, आता त्यांना निकालानंतरच नव्या हालचालींची वाट पाहावी लागणार आहे.

राज्य सरकारने ग्रामीण भागातील पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये संधी मिळावी याउद्देशाने स्वीकृत सदस्य निवडीचा निर्णय घेतला होता. जिल्हा परिषदेत ७ तर पंचायत समित्यांमध्ये ५ सदस्यांची नियुक्ती अपेक्षित होती. या माध्यमातून अनेकांना

> आचारसंहिता लागू असल्याने कोणत्याही प्रकारच्या नियुक्त्या अथवा निर्णय होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. आचारसंहिता संपल्यानंतर वरिष्ठांच्या सूचनांनुसार पुढील कार्यक्रम जाहीर केला जाईल.
> **- स्मिता पाटील,** उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), जिल्हा परिषद, सोलापूर




थेट सत्तेच्या केंद्रात प्रवेशाची संधी मिळणार होती. त्यामुळे जिल्हाभरातील राजकीय गट सक्रिय झाले होते.

जिल्हा परिषदेत सध्या विविध पक्षांचे राजकीय गणितही महत्त्वाचे ठरत आहे. जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), भाजप, शिंदेसेना आणि इतर पक्षांच्या सदस्य संख्येमुळे स्वीकृत सदस्य निवडीत मोठी रस्सीखेच अपेक्षित होती. मात्र, आचारसंहितेमुळे हे सर्व गणित सध्या थंड्या बस्त्यात गेले आहे.

विशेष म्हणजे, आगामी विधानपरिषद निवडणुकीत जिल्हा परिषदेचे ६८ सदस्य आणि पंचायत समितीचे सभापती हे महत्त्वाचे मतदार ठरणार आहेत. त्यामुळे या निवडणुकीपूर्वी कोणतीही राजकीय नियुक्ती किंवा धोरणात्मक निर्णय घेण्यावर निवडणूक आयोगाचे निर्बंध आले आहेत. याच कारणामुळे स्वीकृत सदस्य निवडीची फाइल सध्या 'तात्पुरती बंद' ठेवल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

दरम्यान, या घडामोडीमुळे अनेक इच्छुकांनी आता विधानपरिषद निवडणुकीच्या निकालाकडे लक्ष केंद्रित केले असून, निकालानंतरच स्वीकृत सदस्य निवडीच्या हालचालींना पुन्हा वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## बार्शीत जलतारा प्रकल्पाविषयी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक

### कृषि विभाग व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालयाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ मे -**

जलसंधारण, भूजल पातळीत वाढ व पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने, कृषी विभाग बार्शी व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालय बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जलतारा प्रकल्प' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले उपस्थित होते. कार्यक्रम श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार आणि खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या संकल्पनेतून आयोजित केला होता. याप्रसंगी कृषी अधिकारी गणेश पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. बी. शिंदे, कार्यालयीन अधीक्षक मोरे टी. एस. आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष शेंडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वक्त्यांनी जलतारा शेतखड्डा संकल्पनेचे महत्त्व समजावून सांगितले. महाविद्यालय परिसरात मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उपक्रमात भाग घेतला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे तज्ज्ञांनी निरसन केले. कृषी महाविद्यालय व तालुका कृषी विभाग यांच्या संयुक्त सहकार्याने उपक्रम पार पडला.

> **जलतारा प्रकल्प म्हणजे नक्की काय?**
> जेसीबीच्या मदतीने ५ फूट लांब, ५ फूट रुंद आणि ६ फूट खोल शोषखड्डा घेण्यात आला. त्यामध्ये काळे दगड ५.५ फूट उंचीपर्यंत रचून हा खड्डा पूर्णपणे भरून घेतला. या संकल्पनेनुसार, ७०० मिमी पाऊस पडल्यास अशा एका खड्ड्याद्वारे सुमारे ३ लाख ४० हजार लिटर पाणी जमिनीत मुरते.



## अधिकमासनिमित्त भक्त निवास येथे बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ मे-**

अधिकमासनिमित्त श्रीविठ्ठल- रुक्मिणी भक्त निवासात आज बैठक झाली. यावेळी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना वाहतुक कोंडीचा त्रास होवू नये यासाठी अवजड वाहने बाह्यवळणाने वळवा. अनाधिकृत होर्डिंग्ज काढा, अशा सुचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

बैठकीस सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे, टी.वाय. मुजावर, मंदीर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा, पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते. नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ दुरुस्त करा. मंदीर परिसर, प्रदक्षिणामार्ग येथील अतिक्रमण मोहीम सुरु ठेवावी. वाळवंटात फिरते विक्रेते, वाहने जाणार नाहीत याची काळजी घ्या. राजकीय होर्डिंग तात्काळ काढा, असेही इथापे यावेळी म्हणाले.

सहायक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी आवश्यक पोलिस बंदोबस्त नेमला आहे. फिरते विक्रेत्यांचा व अतिक्रमणाचा त्रास होऊ नये यासाठी नगरपालिका व पोलिस मोहिम राबवित असल्याचे सांगितले. नगरपालिका प्रशासनाकडून आरोग्य, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, अतिक्रमण मोहिम आदीबाबतची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

मंदीर समितीमार्फत भाविकांना विविध सुविधा दिल्या आहेत, एकूण १ हजार २०० कर्मचारी व स्वयंसेवकांची नेमणूक केल्याचे मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

## पंढरपुरात चिल्लर व छोट्या नोटांचा तुटवडा

### व्यापाऱ्यांना व्यवहारात अडचणी; व्यापारी महासंघाचे स्टेट बँकेला निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ मे -**

पंढरपूर शहरात गेल्या दोन,तीन महिन्यापासून ५,१० आणि २० रुपयांची नाणी तसेच १०,२० आणि ५० रुपयांच्या नोटांचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांना व्यवहार करताना अडचणी येत आहेत. यासाठी येथील व्यापारी महासंघाने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या व्यवस्थापकांना निवेदन दिल्याचे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सत्यविजय मोहोळकर यांनी सांगितले.

सत्यविजय मोहोळकर यांनी सांगितले की, पंढरपूर शहर हे तीर्थक्षेत्राचे ठिकाण आहे. या ठिकाणी रोज सुमारे १ लाखाहून अधिक भाविकांची ये-जा असते. शहरातील हॉटेल व्यवसायिक, छोटे दुकानदार, फळ विक्रेते, प्रासादिक दुकाने व अन्य छोट्या व्यवसायिकांना सुट्टे पैसे व १० रू., २० रू., ५० रू. च्यानोटा व्यवहारासाठी गरजेच्या असतात. मात्र पंढरपूर शहरात गेल्या ४ महिन्यांपासून चिल्लर व सुट्ट्या पैशांची अत्यधिक कमतरता भासत आहे. दोन महिन्यावर आषाढी यात्रा येवून ठेपली आहे. यात्रेत तर सुट्ट्या पैशांची अत्यंत गरज भासते. तरी लवकरात लवकर सुमारे १ कोटी रूपयांची चिल्लर व १० रू., २० रू., ५० रू. च्या नोटांची उपलब्धता आपल्या शाखेतून सर्व व्यापाऱ्यांना हवी तेवढी रक्कम उपलब्ध करून द्यावी, असे निवेदन दिले आहे.

निवेदन स्टेट बँकेचे व्यवस्थापक



आश्रय दीक्षित यांना देण्यात आले. यावेळी व्यापारी महासंघाचे सदस्य सोमनाथ डोंबे, रा.पां.कटेकर, राजू भट्टड, कौस्तुभ गुंडेवार, शिरीष पारसवार उपस्थित होते.

> **दर शनिवारी बँकेत मिळतील नाणी, छोट्या नोटा**
> शाखाधिकारी दिक्षित यांनी बेलापूर येथील रिझर्व्ह बँकेच्या शाखेतून लवकरात लवकर चिल्लर मागवून घेऊन व्यापाऱ्यांना देण्यात येईल. बँकेने या अगोदरच दर शनिवारी अशी सुट्टी नाणी व्यापाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ज्यांना गरज आहे अशा व्यापाऱ्यांनी दर शनिवारी बँकेच्या कामकाज वेळेत नाणी घेऊन जावीत असे सांगितल्याचे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सत्यविजय मोहोळकर यांनी दिली.



## भागाईवाडी गावठाण प्रस्तावाबाबत वस्तुनिष्ठ अहवाल देणार : भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे -**

वाळुंज हद्दीत राहणाऱ्या क्षेत्राचा भागाईवाडी गावठाणात समावेश करण्याची मागणी केली होती. यासंदर्भात वडाळा मंडल अधिकारी स्नेहल भोसले यांनी पहाणी केली. यासंदर्भात वस्तुनिष्ठ अहवाल देईन असे सांगितल्याने या भागातील नागरिकांसाठी आशेचा किरण निर्माण झाला आहे

भागाईवाडीगावठाणात जागा नसल्याने गावातील साधारण ५० कुटुंब गावालगत असलेल्या वाळुंज हद्दीत २० वर्षापासून राहत आहेत. शासकीय घरकुलही या क्षेत्रात बांधली आहेत. मात्र हा भाग वाळुंज हद्दीत असल्याने मुलभूत सुविधा देता येत नसल्याने या रहिवाशी क्षेत्राचा भागाईवाडी गावठाणात समावेशाची मागणी तत्कालीन सरपंच कविता घोडके पाटील यांनी १ डिसेंबर २०१८ रोजी केली होती.

मोहोळ तहसील कार्यालयांतर्गत नरखेड मंडल अधिकाऱ्यांनी रहिवासी क्षेत्र समाविष्ट करण्यास हरकत नाही असा अहवाल दिला. त्यानंतर उत्तर सोलापूर तहसील कार्यालयांतर्गत वडाळा मंडल अधिकारी स्नेहल भोसले यांनी आज या क्षेत्राची, रहिवाशी क्षेत्राची पाहणी करुन पंचनामा केला. यावेळी गाव कामगार तलाठी वैष्णवी कोंथींबिरे, बालाजी घोडके, लहु घोडके, देविदास घोडके, रेशमा मोरे, शोभा शिंदे, विकास घोडके, अनंत हावळे, नेताजी घोडके आदी उपस्थित होते.

> **गावठाण निर्णय लवकर व्हावा : घोडके-पाटील**
> भागाईवाडी गावातील नागरिक गावालगत २०० मीटर अंतरावर असलेल्या वाळुंज हद्दीत राहतात. मी सरपंच असताना आठ वर्षांपूर्वी प्रस्ताव सादर केला पाठपुरावा केला. आता मुर्त स्वरुप आले असून जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या सोयीसाठी वाळुंज हद्दीतील रहिवासी क्षेत्र भागाईवाडी गावठाणमध्ये समाविष्ट करावा.
> **- कविता घोडके पाटील,** माजी सरपंच, ग्रामपंचायत भागाईवाडी.

> **वस्तुनिष्ठ अहवाल सादर करेन : भोसले**
> भागाईवाडी गावास गावठाण जागा नसल्याने गावालगत असलेल्या वाळुज हद्दीत वास्तव्यास असलेली रहिवासी कुटुंब संख्या व सुविधा देण्यासाठी ग्रामपंचायतीस येणारी अडचण या वस्तुस्थितीनुसार अहवाल सादर करेन.
> **- स्नेहल भोसले,** मंडल अधिकारी वडाळा.

## विधानपरिषदेच्या आखाड्यात भाजपकडून परिचारकच

### समर्थकांना विश्वास; गत निवडणूकीत जिल्ह्यात भाजपची ताकद नसतानाही मिळवलेल्या विजयाची घेणार दखल

- भाजप धोरणानुसारही परिचारकांच्या जागेवर परिचारकांचाच हक्क असल्याचा दावा
- दुसरीकडे भाजप विरोधात सर्वपक्षीय आघाडीची चाचपणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ मे -**

सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपकडून पुन्हा माजी आमदार प्रशांत परिचारक यांनाच निवडणूकीच्या आखाड्यात उतरविले जाण्याचा विश्वास परिचारक समर्थकांकडून व्यक्त होत आहे. त्यासाठी त्यांच्याकडून वेगवेगळे दावे केले जात आहेत.

परिचारक समर्थकांच्या दाव्यानूसार भाजप हा शिस्तप्रिय पक्ष आहे. त्यामुळे भाजपमध्ये ज्या मतदारसंघात भाजपचा जो उमेदवार प्रतिनिधीत्व करीत असतो, त्याच्याच नावाचा पुन्हा निवडणूकीत उमेदवारी देताना पहिल्यांदा विचार केला जात असतो. त्यामुळे सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था





मतदारसंघातून यावेळेला भाजपकडून उमेदवार म्हणून प्रशांत परिचारकांनाच पुन्हा संधी दिली जाण्याचा विश्वास परिचारक समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे. दुसऱ्या दाव्यानूसार २०१६ मध्ये प्रशांत परिचारक हे महायुती पुरस्कृत अपक्ष उमेदवार म्हणून भाजप व मित्रपक्षाची कमी मते असतानाही विजयी झाले होते. दिवंगत सुधाकरपंत परिचारक यांचा करिष्मा त्यावेळी जिल्ह्याने अनुभवला होता. वास्तविकत: काँग्रेस, राष्ट्रवादी, शेकाप या पक्षांची जिल्ह्यात त्यावेळी ताकद मोठी असतानाही प्रशांत परिचारक आमदार म्हणून निवडले गेले होते. अनेक अदृश्य शक्तींनी त्यांना साथ केली होती. २०१४ पूर्वीपासून परिचारक यांनी राष्ट्रवादीपासून फारकत घेत देवेंद्र फडणवीस यांची साथ केली. त्यामुळेच भाजपला जिल्ह्यात राजकीय बस्तान बसविण्यासाठी मदत झाल्याचे भाजपाचे वरिष्ठ नेतेही खासगीत बोलत असतात.

भाजपच्या वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी त्यांच्या मित्रपक्षांसह महाविकास आघाडीकडूनही पडद्यामागून काही हालचाली सुरू असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. येथून भैरवनाथ शुगरचे अध्यक्ष अनिल सावंत हे निवडणूक लढविण्याची तयारी करत असल्याचे समजते. ते माजी मंत्री व शिंदे शिवसेनेचे नेते डॉ. तानाजी सावंत यांचे पुतणे आहेत. अनिल सावंत यांचे मोहिते पाटील, आ. अभिजीत पाटील आदींसह भाजपमधील काहीजणांशीही जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

> **भाजपाकडून उमेदवारीबाबत परिचारकांना शब्द**
> २०२४ मध्ये प्रशांत परिचारक यांनी पंढरपूर विधानसभा लढविण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र, तेव्हा परिचारक यांना विधानपरिषद दिली जाईल, असे सांगितले जात होते. नुकत्याच विधानपरिषदेच्या नऊ जागा भरल्या गेल्या आहेत, त्यावेळीही परिचारक यांचे नाव आघाडीवर होते. मात्र, त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून संधी मिळेल, असे आश्वासन भाजपच्या वरिष्ठांनी दिल्याचे परिचारकांचे समर्थक सांगतात.

> **मित्रपक्षांची भूमिकाही महत्वाची**
> सोलापूर जिल्ह्यात विधानपरिषदेसाठी ५०१ मतदार असून यापैकी २६२ हे भाजपचे आहेत. तर महाविकास आघाडीचे संख्याबळ हे ७० इतके आहे. महायुतीमधील घटकपक्ष शिंदेशिवसेनेचे ७१ तर अजित पवार राष्ट्रवादीचे ४७ सदस्य आहेत. यामुळे ही निवडणूक भाजपसाठी सोपी मानली जात असली तरी अन्य पक्षांची भूमिकाही महत्त्वाची ठरणार आहे. भाजपने ऑपरेशन लोटस राबविताना नगरपरिषद, महापालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत मित्रपक्षांनाही सोडले नाही. अनेक ठिकाणी तर शिंदे शिवसेनेबरोबर त्यांच्या लढती झाल्या आहेत. यामुळे आता विधान परिषद निवडणुकीत मित्रपक्ष कोणती भूमिका घेणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.